१३७

# एम. ए. भाग दोन
# मराठी अभ्यासपत्रिका क्र. ८
# लोकसाहित्य भाग - २
## (नेमलेल्या साहित्यकृती)

(शैक्षणिक वर्ष २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२ करिता)

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. संजय देशमुख**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ.

**डॉ. अंबुजा साळगावकर**
प्रभारी संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. धनेश्वर हरिचंदन**
प्रभारी, अभ्यास साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**समन्वयक** : **डॉ. पुष्पलता राजापुरे-तापस, सहयोगी प्राध्यापक**
विभाग प्रमुख, मराठी विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०९८

**लेखन** : **डॉ. किसन पाटील**
विभाग प्रमुख, मराठी विभाग,
मुळजी जेठा महाविद्यालय,
जळगांव - ४२५ ००२

**डॉ. सूर्यकांत आजगांवकर**
साहाय्यक प्राध्यापक व प्रमुख, मराठी विभाग,
गुरूनानक खालसा महाविद्यालय,
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९

**पुर्नमुद्रण ऑक्टोबर २०१६, एम. ए. भाग दोन, मराठी अभ्यासपत्रिका क्र. ८,**
**लोकसाहित्य भाग - २** नेमलेल्या साहित्यकृती

**प्रकाशक :** प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई-४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** : ACME PACKS AND PRINTS (INDIA) PRIVATE LIMITED
A Wing, Gala No. 28, Ground Floor, Virwani Industrial Estate,
Vishweshwar Nagar Road, Goregaon (East), Mumbai 400 063.
Tel. : 91 - 22 - 4099 7676

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | लेखन | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते | - डॉ. किसन पाटील | ०१ |
| २) | मराठी लोककथा | - डॉ. किसन पाटील | २३ |
| ३) | रानभूल | - डॉ. सूर्यकांत आजगांवकर | ७६ |


❖❖❖❖

# १

# लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते

**[(रामचंद्र वरक, रश्मी शेट्ये – तुपे, जगदीश संसारे (संपा.)]**

**- डॉ. किसन पाटील**

## उद्दिष्टे :-

१) लोकगीतांचे स्वरूप –वैशिष्ट्ये समजून घेणे.

२) लोकगीतांचे प्रकार – वर्गीकरण अभ्यासणे.

३) 'कोळीगीते' या लोकगीतांचा व्यापक दृष्टीने अभ्यास करणे.

४) 'लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते' या नियुक्त संकलनाचा लोकसाहित्यदृष्टीने अभ्यास करणे.

## प्रास्ताविक :-

'लोकसाहित्य' (Folklore) म्हणून जी ज्ञानशाखा अभ्यासली जाते. त्यामध्ये 'लोक' या शब्दाचा (पदाचा) अर्थ परंपरा जोपसणारे आणि पिढ्यान्पिढ्यांचा जात, धर्म, प्रदेश, राष्ट्र, इतिहास आणि सांस्कृतिकदृष्ट्या जगणारे 'लोक' (समूह). 'Folk' या इंग्रजी पदाचा अर्थ खूप व्यापक आहे. त्यातील 'Lore' हे दुसरे पद विविध परंपरांच्या संदर्भात (मौखिक) उपयोजिलेले आहे. लोकसमूहाने शतकानुशतके प्रचलित ठेवलेल्या लोकरूढी, लोकसमजुती, लोकश्रद्धा, लोकप्रथा, यातुविधि, लोकदैवते आणि त्यांचे लोकविधी, लोककला, लोकसंगीत इत्यादी सर्व परंपरा पिढ्यान्पिढ्या चालत असतात, त्या सर्वच 'शाब्द' आणि 'शारीर' परंपरा असतात. त्याला व्यापक अर्थाने 'लोकसाहित्य' (Floklore) असे एकत्रित पद उपयोजिलेले आहे. त्यामुळे पिढ्यांच्या प्राचीनतम लोकसंस्कृती, लोकविद्या, लोकवाङ्मय, लोककला इत्यादी लोकजीवनात प्रचलित असलेल्या परंपरांना लोकसाहित्यातील 'साहित्य' (Lore) म्हणून उपयोजिलेले आहे असे जाणवते. त्यातील 'शाब्द' वाङ्मयाला 'लोकवाङ्मय' (Folk literature) म्हटले जाते. लोकवाङ्मयात लोकजीवनाचा 'शब्दरूप' आणि 'मौखिक' (oral) स्वरूपाचा आविष्कार असतो. 'लोकांचे' असते ते 'लोकवाङ्मय' असेच त्याबाबत म्हटले जाते. त्या अंतर्गत पुढील वाङ्मयप्रकार येतात.

## लोकवाङ्मय

लोकगीत, लोककथा, लोककथा गीत, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, आहाणे, कोडी (प्रहेलिका), शिव्या (अपशब्द) इत्यादी.

**लोकगीताचे वर्गीकरण:**

स्त्रियांची लोकगीते, पुरुषांची लोकगीते, बालकांची लोकगीते.

लोकगीतांबरोबरच लोककथा गीतांचेही असेच वर्गीकरण करता येईल. त्यामध्ये १) देवदेवतांच्या उपासनेची गीते, आरत्या २) सामाजिक – कौटुंबिक आशयाची लोकगीते ३) प्रणय (प्रेम) गीते ४) नृत्य-खेळगीते ५) श्रम(कष्टकरी)गीते ६) विधीगीते ७) विनोदी गीते ८) बालगीते (बडबडगीते) असे स्थूलमानाने वर्गीकरण करता येते. याचे अधिक सूक्ष्मपणे वर्गीकरण प्रादेशिक होऊ शकते. लोकगीते आणि लोककथागीते या दोन वर्गात त्यांचे वर्गीकरण केल्यावर थोड विस्तृत वर्गीकरण स्त्रीगीते, पुरुषगीते आणि बालगीते असे करण्यात येऊ लागले.

१) स्त्रीगीते :- श्रमगीते, विधी गीते, नृत्यखेळगीते, सण-उत्सवांची गाणी, उपासना गीते आणि इतर गीते.

२) पुरुषगीते :-श्रमगीते, विधीगीते, भगतांची उपासना गीते, सण-उत्सवांची गाणी आणि इतर गीते (संकीर्ण)

३) बालगीते :- बडबड गीते, तालगीते, नृत्यखेळ गीते, इतर गीते महत्त्वाची ठरतात.

'लोकगीत' (Folk songs) हे समूहाची निर्मिती आणि गायन वादनासह आलेला सामूहिक आविष्कार असतो. मौखिक परंपरेने लोकजीवनात प्रचलित ओव्या, आरत्या, धवळे, भूपाळ्या, पाळणे, समूहगीते, श्रमगीते, शाहिरी गीते, नृत्यगीते, इत्यादी प्रकारची गाणी पिढ्यान्‌पिढ्या जोपासली गेली आहेत. ती लोकांची निर्मिती आणि लोकांची भावनिक, मानसिक, आंतरिक श्रद्धाशील भावना असते. श्रमगीते आणि देवदैवतांची श्रद्धाशील असंख्य गाणी ही लोकजीवनात श्रमसंस्कृतीच्या संस्कारातून प्रचलित झाली. कष्टकरी वेदना, श्रमपरिहार आणि लोकश्रद्धाशील भावना यांमुळे ही गीते समूहाच्या एकत्रित गायन, वादन आणि नृत्य वगैरे दृष्टीने प्रचलित झाली. श्रमसंस्कृतीच्या अंगाने विचार करता शेतकऱ्यांची भलरी गीते, मोटवरची गाणी, इर्जिकाची गीते, आदिवासींच्या सण-उत्सव आणि लोकदैवतांच्या संदर्भातील नृत्यगीते तसेच दर्यावर्दी कोळी समाजाचे सण, उत्सव तसेच मासेमारी व्यवसायानिमित्ताने आलेली 'कोळीगीते' महत्त्वाची ठरतात. श्रम-कष्टांची परंपरा, लोकदैवतांविषयीची श्रध्दा आणि सण उत्सवांसह जीवनातील दैववादीवृतीच्या मानसिकतेतून आलेली गाणी ही लोकसमूहाची निर्मिती ठरते. 'कोळीसमाज' ही स्वतंत्र लोकपरंपरा, चालीरीती, श्रध्दा आणि सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्ट्ये जोपासणारा लोकसमूह ठरतो. त्यांची ही लोकगीते ‘कोळीगीते’ या शीर्षकाखाली प्रचलित आहेत.

विशेषतः श्रमगीते ही कष्टकऱ्यांची सामूहिक गीते शेतीभातीच्या विविध कामे करताना गायली जातात, विधीगीते ही देवदेवतांची उपासना, आरत्या, भक्तीभाव व्यक्त करताना गायली जातात तर सणउत्सवांची गाणी ही सामाजिक कौटुंबिक आणि सांस्कृतिक संदर्भात गायन-वादन आणि नर्तनासह सादर केली जातात.

## लोकगीते (folk songs) परंपरा :-

महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीत अनेक सण, उत्सव, लोकदैवते श्रमसंस्कृतीच्या परंपरा, शेतीभातीच्या रीती, लग्न आणि जन्ममृत्यू अशा अनेक परंपरा रूढ आहेत, गोंधळ, जागरण, भारूड, लळित, दंडार, लोकनाट्य, इत्यादी. लोकसंस्कृतीचे उपासक आणि त्यांच्या लोककला

याद्वारे लोकगीतांचा प्रवाह प्रचलित आहे, लोकजीवनाच्या भाव-भावना, सुख-दुःखे, जीवनानुभूती, छंद, आवडी-निवडी, धार्मिक-भावनिक श्रद्धाशीलता यांचे चित्रण लोकगीतात केलेले असते अशा प्रकारे लोकगीते म्हणजे लोकजीवनाची गाथाच असते. स्त्रियांच्या गीतातून भावरम्यता, हृदयस्पर्शी भावना, मनाची विविध स्पंदने दर्शविणाऱ्या भावछटा, आंतरिक स्पंदने आणि मोहकता यांचे दर्शन घडते तर पुरुषांच्या गीतातून रंगलेपणा, रगेल पुरुषार्थ आणि युयुत्सुवृत्ती तसेच आनंदमयता सहज उत्स्फूर्तभाव म्हणून व्यक्त होतो, एकूणच स्त्री-पुरुषांच्या लोकसमूहातील लोकसंस्कृतीचा हा आविष्कार विविधता आणि वेगळेपणासह संपन्नता यांची निर्मिती असतो. लोकगीते अशा प्रकारे लोकांचे लोकांनी लोकांसाठी निर्मिलेले आणि पिढ्यांनी जतन केलेले असते.

लोकगीतांची निर्मिती आदिम अवस्थेतील मानवी संस्कृतीच्या प्रेरणेतून झाली. समूहाची प्राचीनता जितकी जुनी तितकी लोकगीतांची निर्मितीही प्राचीन असते. या निर्मितीविषयी ना.रा.शेंडे यांनी मांडलेले विचार महत्त्वाचे ठरतात.

"शून्यातून ध्वनी निर्माण झाला. पुढे त्यांतून अक्षरे निनादली. अक्षरांनी शब्द बनला. शब्दांनी आकार घेऊन एक वेगळे रूप प्रकट केले आणि त्यातून मनुष्य व्यक्त होऊ लागला. त्याने आपल्या सहजस्फूर्त भावनांद्वारे आविष्कार घडला. त्या आविष्कारातून लोकगीताचा जन्म झाला. तो संगीतबद्ध झाला. त्याने वातावरणात चैतन्य निर्माण केले."

(लोकसाहित्य संपदा, शेंडे ना.रा., पृ.२३)

लोकगीतांच्या निर्मितीबाबत काही अभ्यासकांची मते लक्षात घेता लोकगीतांची परंपरा आणि प्रयोजने लक्षात येतात.

१) "आदिमानवकी कंठसे जो भाव निकले थे वे गीत बन गये" ('भारतीय लोकसाहित्य', पं.द्विवेदी, पृ.५२-५४)

२) "लोकगीत म्हणजे सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती." (डॉ.सरोजिनी बाबर, 'मराठीतील स्त्रीधन' )

३) "लोकगीते उत्सव प्रसंगी, भक्तिभावाने तल्लीनता प्राप्त झाली असता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात. अर्थात कोणाही एका व्यक्तीला अशा गीतावर हक्क सांगता येत नाही." (वि.का.राजवाडे)

४) "जात्यावर दळताना, पाळणा हलविताना, मुलाला खेळवताना, थोपटताना, झोपाळ्यावर झोके घेताना, या ओव्या सहजस्फूर्तीने रचल्या गेल्या आहेत. या ओव्यातील वत्सलतेचा सिंधू आणि कोठे कोठे विनोदाची सुंदर छटाही असते."
(साने गुरूजी, 'स्त्री-जीवन दोन शब्द')

५) "ज्या लोकगीतातून लोकमानसाची अभिव्यक्ती असते तेच लोकगीत म्हणावे." (डॉ.सत्येंद्र)

६) "लोकगीत लोक समूहाच्या संस्कृतीचे चित्र असते." (वासुदेवशरण अग्रवाल)

७) "सामान्य लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवर सहजरूपाने मनोभावांची झालेली लयात्मक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत." (डॉ.चिंतामण उपाध्याय)

'स्टॅन्डर्ड डिक्शनरी ऑफ फोकलोअर मायथॉलॉजी ॲन्ड लिजेंड' (भाग-२) हा ग्रंथ अलेक्झांडर क्रॉप यांनी लिहिला. त्यांच्या आधारावरच सर्वत्र लोकसाहित्य, लोकवाङ्मय यांचा अभ्यास केला जातो. त्यांच्या विचारांचा आधार घेऊन लोकगीताचे 'स्वरूप' स्पष्ट करता येईल.

१) लोकगीत लोकसमूहाची निर्मिती असते.

२) ते लोकांच्या मौखिक शाब्दपरंपरेतून येत असते.

३) त्याचा कर्ता अज्ञात (अनामिक) असतो.

४) त्याची निर्मिती भूतकालीन असली तरी ते मौखिक परंपरेने पुढच्या पिढीत रूढ होऊन जतन केले जाते.

५) त्याची भाषा ही बोलीभाषा असते.

६) लोकगीतात ताल-लय अशी तत्त्वे असतात.

७) विधी-पूजा आणि श्रद्धाशीलता यामुळे लोकगीते निर्माण होतात.

८) स्त्रियांची आणि पुरुषांची अशी स्वतंत्र तसेच सामूहिक (एकत्रित) गीते ही प्रचलित असतात.

९) ते जुन्यात जुने आणि नव्यात नवे असते.

१०) अकृत्रिमता, सहजता, स्वयंस्फूर्तता आणि संगीतमयता यांचा एकत्रित आविष्कार त्यातून होत असतो.

## मौखिक परंपरा :-

आदिम मानवीजीवनापासून ते आजपर्यंत लोकगीते ही मौखिक परंपरेने अखंडपणे लोकजीवनात रूढ झालेली आहेत. वेद वाङ्मय हेसुद्धा प्रारंभीच्या स्वरूपात मौखिकच होते. नंतरच्या काळात ते लिपीबद्ध झाले. लोकगीते ही अशीच वेदपूर्वकाळातील प्रचलित मौखिकवाङ्मयच आहे. ती पिढ्यान्‌पिढ्यांचे अनुकरण, नवनिर्मिती आणि परिवर्तनासह मौखिक रूपाने पारंपरिक पद्धतीने जतन केली जातात. त्यामुळे लोकगीतातील मौखिक परंपरा ही प्राचीनतम आणि आधुनिकतम अशी नव्या-जुन्याची सांगड घालत असते.

## लोकगीत निर्मितीच्या प्रेरणा :-

लोकसमूहाच्या (सांघिक) आणि व्यक्तिगत अशा सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक प्रेरणांमुळे लोकगीते निर्माण होतात. लोकगीत हे समूहमनाचा, लोकांच्या सुखदुःखाचा, भावभावनांचा सामूहिक आविष्कार असतो. लोकजीवनातील विधी, लोकदैवते, रूढी-प्रथा, चालिरीती, धर्म-संस्कृती यांच्या विविध संदर्भात लोकगीत निर्मितीच्या प्रेरणा सुप्तपणे आविष्कृत होतात. विधीनिमित्त गोंधळ-जागरणाची गीते निर्माण झाली आहेत. सणउत्सवानिमित्त तसेच लग्नकार्य संदर्भातील विधीकृती निमित्त अनेक गीते निर्माण झालेली आहेत. सागराची पूजाविधी आणि त्याचे रौद्ररूप शांत व्हावे यासाठी कोळीगीतांची भावपूर्ण निर्मिती झालेली आहे.

निसर्गशक्तीच्या अद्‌भुतता, गूढता, अनाकलनीयता यासंदर्भात अर्थ लावण्याच्या प्रेरणेतून लोकगीते निर्माण होतात. आदिवासी लोकगीतातून डोंगरदेव, यहाँमोगीमाता, वाघदेव, वारा-वादळ, अग्नीदेव, सूर्यचंद्र आणि ग्रहणे, भूकंप इत्यादींचा अर्थ लावण्याच्या व निसर्गशक्तीच्या स्पष्टीकरणासाठी आदिम लोकगीते निर्माण झाली. अशा विविध प्रेरणांचा विचार लक्षात घ्यावा लागतो.

## लोकगीतातील सामूहिकता :-

'लोकगीत' या पदातील 'लोक' हे पद समूहवाचक आहे. लोकांचे गीत ते 'लोकगीत' यातूनच सामूहिकता प्रदर्शित होते. लोकगीत हे समूहाच्या मनाचा, भावभावनांचा आविष्कार असते. त्यातील सामूहिकता व्यापक स्वरूपाची आणि विशिष्ट अशा विविधतेनी नटलेली असते. म्हणून लोकगीतांच्या निर्मितीत जात, धर्म, प्रदेश, संस्कृती अशा विविध लोकसमूह घटकांची भूमिका असते. कुणबी लोकगीते, कोळी लोकगीते, वारली लोकगीते, ठाकरांची लोकगीते इत्यादी प्रकारे त्यांच्या निर्मितीत 'जात-समाज' याचा लोकसमूह प्रभावित असतो. तसेच हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, इत्यादी धार्मिक स्वरूपाचा लोकसमूह त्यामागे निर्मितीप्रक्रियेत असतो. मराठवाडा, खानदेश, कोकण, डांग, विदर्भ यांच्या प्रादेशिक लोकसमूहाचा आणि विविध प्रादेशिक बोलींचा प्रभाव त्या त्या प्रदेशातील 'लोकसमूह' या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. गीतगायक, वादक, नर्तक यांचा आविष्कार होत असताना बघणारा प्रेक्षक लोकसमूह हासुद्धा लोकगीताची सामूहिकता म्हणून लक्षात घ्यावा लागतो. वासुदेवाची गाणी, गोंधळाची गाणी, वाघ्या-मुरळीची गाणी, फेरावरची गाणी, कोळी गीते, इत्यादींचा विचार करता ही समूहाची एकत्रित निर्मिती आणि प्रयोगशीलकृती असते. त्यामुळे सामूहिकता हे लोकगीतांचे महत्त्वाचे लक्षण मानले जाते.

लोकगीत निर्मितीसाठी 'क्रियासंबद्धता' म्हणजे कृतिशीलता हे महत्त्वाचे लक्षण असते. उदा. जात्यावरची ओवी, कष्ट करतानाची गाणी, श्रमकऱ्यांची गीते यांमध्ये कृतिशीलता, विधिसंबद्धता, मंत्रात्मकता यांचाही संबंध असतो. लग्नविधी, वीरपूजा, मंगलस्नान, नामकरणविधी, भुलाबाईच्या आरत्या व गाणी यामध्ये ‘विधी’चा संबंध असतो. मंत्रोच्चार आणि यातुक्रिया यांचाही संबंध या लोकगीतातून स्पष्ट होतो. लोकगीतातून काही विशिष्ट 'लोकसंकेत' प्रचलित असतात. पिंपळ, वड, औदुंबर हे वृक्ष विविध संकेत दर्शवितात. वड (सावित्री-सत्यवान), पिंपळ (मुंजोबा), औदुंबर (दत्ताचे स्थान), बेल (शंकराचा त्रिशूल) अशा सांकेतिक अर्थाने लोकगीतात हे शब्द येतात. शुभ-अशुभ तसेच शकुन-अपशकुनाचे संकेतही लोकगीतात येतात. कोळीगीतातील नारळीपौर्णिमेला सागराला अर्पण करायचा नारळ (श्रीफळ) यामागेही विधी-धर्म आणि लोकमानसातील ‘सांकेतिकता’ स्पष्ट होते. लोकसमूहाच्या भावना, श्रद्धा आणि लोकधर्म यांचा हा आविष्कार असतो.

लोकगीतांची सार्वकालिकता, स्थलविशिष्टता आणि स्थलांतरक्षमता सर्वश्रूत असते. ती आज-काल-उद्या अशा सर्व काळातील परंपरा, विधी-पूजा यांसह मानवी समूहाच्या अनुभवांसह प्रचलित होत असतात. विशेषतः स्त्रिया आणि लोकगीते यांचे अतूट नाते असते. स्त्रियांची परंपराप्रियता, संवेदनशीलता, कुटुंबवत्सलता आणि धार्मिक विचारसरणी यामुळे स्त्रियांच्या मनाचा आणि कर्मसंस्कृतीचा संबंध लोकगीतांशी खूप जवळचा असतो.

## लोकगीते आणि बोलीभाषा :-

लोकगीतांचे महत्त्वाचे लक्षण म्हणजे बोलीभाषा हे असते. कारण समूहाची बोली आणि लोकांची जीवनव्यवहाराची अनुभवसंपन्नता यामुळे लोकगीतात एक प्रकारचा जिवंतपणा येतो. बोलीतील लवचिकता, भावशीलता, स्वयंस्फूर्तता, धर्म-रूढीप्रियता, आंतरिक उमाळा, जिव्हाळा, वस्तुनिष्ठता, ग्राम्यता इत्यादींचा सरळ संबंध लोकगीतातून व्यक्त होतो. लोकसमूहाच्या भाव-भावना उत्कटपणे सहज शैलीतून बोलीभाषेच्या माध्यमातून साकारतात. आई (माय), मित्र (मैतर), बाई (बया), सखा (साजण), जातं (घरोटं), शिवशंकर (कन्हेर), पार्वती (कानोळ), होळी (शिमगा), वादळवारा (तुफान), नवरा (दादला), होळी (हौलायमाता), आंब्याचे बन (आंबिया बन), बंधु (बंदवा) अशा विविध बोलीरूप शब्दांनी लोकगीतांच्या भाषेचा गोडवा, माधुर्य वाढत असते. त्यातून ठसका, नादमयता, लय आणि छंदाचा गावठी ढंग दिसून येतो.

लोकगीतांच्या बोलीभाषेमुळे त्यातून गेयता, संगीतमयता, प्रायोगिकता आणि नृत्य-नाट्यात्मकता यांचा आगळावेगळा आविष्कार सादर करता येतो. त्याचबरोबर लोकगीतातून बोलीभाषेमुळे काही वाङ्मयीन गुणही साकार होतात. पुनरावृत्ती, ताल व लयबद्धता, अर्थसघनता, प्रासादिकता आणि नादमाधुर्य यामुळे जिवंतपणा, चेतनागुणोक्ती, अलंकारिकता यांचेही दर्शन लोकगीतातून होते.

'लोकगीत' या लोकवाङ्मयाच्या वैशिष्ट्यांचा आणि विविध लक्षणांचा विचार करता, लोकसमूहाची ही निर्मिती मौखिक परंपरा आणि लोकवाङ्मयीन आविष्कार या दृष्टीने अभ्यासता येते. लोकगीतांचा हा प्रवाह लोकजीवनात सतत खळाळत राहातो. त्याच्या प्रेरणा लोकसमूहाच्या मानसिक आणि धार्मिक-सामाजिक, सांस्कृतिक अभिसरणात आढळतात. पिढ्यान्पिढ्यांची संक्रमित मौखिक परंपरा जतन करण्याचे कार्य लोकगीते करीत असतात. परंपरा आणि संस्कृती यांचे सातत्य टिकवून ठेवण्यात लोकगीतांचा महत्त्वाचा भाग असतो. रूढी-परंपरांसह चालीरीती आणि बोलीभाषेतील जिवंत अनुभूतींचे जतन करणारी लोकगीते ही मौखिक वाङ्मयाचे आगळेवेगळे स्वरूप ठरतात. लोकगीते सादर करण्याची लोकसमूहाची प्रयोगशीलता प्रचलित असल्यामुळे लोकगीतांना प्रयोगमूल्य असते. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळातील शाश्वत जीवनमूल्ये सांस्कृतिकदृष्ट्या टिकवून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य लोकगीते करीत असतात.

लोकगीतांचे स्वरूप, वर्गीकरण, निर्मितीप्रक्रिया, सर्वसामान्य वैशिष्ट्ये इत्यादी बाबी समजून घेतल्यावर, लोकगीत प्रकारातील प्रादेशिक परंपरांच्या दृष्टीने ‘कोळीगीते’ या लोकगीत वाङ्मयप्रकाराचा परिचय आणि त्यांचा अभ्यास करणे सुलभ होऊ शकते.

## कोळीगीते :-

'कोळी' लोकसमूहाचे वेगळेपण, त्यांच्या विधीपरंपरा, लोकदैवते आणि उपासनापद्धती, प्रादेशिक वैशिष्ट्ये आणि सण-उत्सवांच्या परंपरा, लोकमानस-लोकश्रद्धा आणि लोकसंस्कृतीसह जतन केलेल्या लोककला, लोकवाङ्मय इत्यादी घटकांचा विचार 'कोळी लोकसमूह' या दृष्टीने केला जातो. महाराष्ट्रातील पश्चिम किनारपट्टीचा प्रदेश हा अरबी समुद्राचा (कोकण किनारपट्टी) परिवेश असलेला भौगोलिक पर्यावरणाचा प्रदेश आहे. त्या प्रदेशात एक प्रकारची 'सागरी संस्कृती' विविध जाती-धर्म आणि कुळांची मानवसमूहाची संस्कृती ठरते. या

'सागरी' संस्कृतीमध्ये मराठा (कुणबी), ख्रिश्चन, कोळी, मुसलमान, मांगेला, नाखवा, महादेव कोळी, स्पेन कोळी, वैती कोळी, दालदी, माच्छी, गाबीत इत्यादी जातीजमातींचा समावेश होतो. या लोकसमूहांनी आपली स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली असून त्यांचे लोकजीवन आणि व्यवसाय यामुळेच या सागरावर अवलंबित समाजसंस्कृतीला व्यापक अर्थाने 'सागरी संस्कृती' असे म्हटले जाते. पिढ्यान्पिढ्यांची ही अनुभवनिष्ठा, व्यावसायाभिमुखता, जातीजातीची सामूहिकता आणि व्यापक अर्थाने 'सागर' आणि 'सह्याद्री' या नैसर्गिक परिवेशाची पार्श्वभूमी लाभलेली ही समाज-संस्कृतीची पारंपरिक जडणघडण म्हटली पाहिजे. त्यांच्या 'लोककला' आणि 'लोकगीते' यांच्या निर्मितीचा, जतनाचा आणि सादरीकरणासह लोकश्रद्धा-लोकमानसाचा मागोवा घेण्यासाठी या गीतांचा अभ्यास करून त्यांची लोकसंस्कृती समजून घेता येते. या दृष्टीने अभ्यासाचे माध्यम म्हणून "लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते" या संपादित ग्रंथाचा आधार घेऊन हा अभ्यास करता येणे शक्य आहे. सातपाटीपासून ते तेरखोलपर्यंतचा सागर किनारा या प्रदेशाची मर्यादा आखून प्रस्तुताचा अभ्यास सिद्ध झाला आहे. या प्रदेशातील सागर किनाऱ्यावर वास्तव्यास असलेल्या पारंपरिक जीवन जगणाऱ्या मत्स्य व्यवसायावर उपजिविका करणाऱ्या जमातीचा त्यांच्या सांस्कृतिक जडणघडणीचा अभ्यास करून प्रस्तुत ग्रंथ संपादित करण्यात आला आहे. आय.एन.टी. चे संशोधक श्री.रामचंद्र वरक आणि प्रा.सौ.रश्मी शेट्ये-तुपे तसेच प्रा.जगदीश संसारे यांनी सामूहिकरित्या हे कोळीगीतांचे संकलन आणि संपादन केले आहे. त्यातील काही निवडक कोळीगीतांचा हा अमूल्य खजिना वाचकांना आणि अभ्यासकांना उपयुक्त ठरणारा आहे.

## कोळीगीतांचा प्रदेश (क्षेत्रीय अभ्यास) :-

प्रस्तुत कोळीगीतांचे संकलन करताना अभ्यासकांनी सातपाटी ते तेरखोलपर्यंतचा प्रदेश निवडला आहे. त्यामध्ये सातपाटी, वर्सोवा, वरळी, ठाणे, हर्णे, जंजीरा, मुरूड, दापोली, तुर्भे, माहिम, अलिबाग, पेण, पनवेल या प्रदेशातील कोळी वसाहती आणि लोकसमूहांचा समावेश करण्यात आला आहे. म्हणजे प्रस्तुत कार्याचे 'क्षेत्र' निश्चित करून त्याचा 'क्षेत्रीय अभ्यास' करण्यात आला आहे. हे निश्चित होते. ही क्षेत्रमर्यादा अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची असते. त्यामुळे एका ठरवलेल्या प्रदेशातील 'लोकसंस्कृती'चा हा अभ्यास उपयुक्त होतो. त्या क्षेत्रातील भौगोलिकता, लोकेतिहास, लोकपरंपरा, लोकधर्म आणि लोकदैवते-विधी, सण-उत्सवांच्या परंपरा आणि लोकजीवनाच्या विविध अंगांचा प्रादेशिकता आणि क्षेत्रीयता या दृष्टीने एक सुस्पष्ट अभ्यास निश्चित होऊन त्याचे उत्तम फलित यामुळे दृष्टीपथात येते.

## कोळीगीतांचा 'स्तरीय अभ्यास' :-

संकलन आणि संपादन ही लोकसाहित्याच्या अभ्यासाची पहिली पायरी असते. 'संकलन' प्रक्रिया खूप जटील आणि परिश्रमांची असते. संकलनकर्त्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्याचबरोबर पूर्वतयारी आणि साधनसामग्रीची जुळवाजुळव हे एक महत् कठीण कार्यच म्हणावे लागेल. बऱ्याचदा संकलकाला शारीरिक, मानसिक तसेच भौतिकतेसह स्थानिक 'लोकसंकेत', गुप्तता आणि सादरकरणाची लोककलावंतांची अनिच्छा-असहकार्य वगैरे अडचणींना तोंड देत हे सर्व कार्य करायचे असते. त्यानंतर 'संपादन प्रक्रिया' ही अभ्यासाची दिशा निश्चित करून संकलित सामग्रीचा अभ्यास करण्यासाठी चाललेली बौद्धिक आणि चिकित्सकवृत्तीची कसरत असते. त्यामध्ये संकलित सामग्रीचे वर्गीकरण, अर्थनिर्धारण,

लोकतत्त्वीय धारणांचा आणि लोकमानस-लोकसांस्कृतिक घटकांचा विविध अंगांनी विचार करावा लागतो. कोळी लोकगीते या घटकाचा अभ्यास म्हणून त्यांचे वर्गीकरण करणे क्रमप्राप्त ठरते. प्रस्तुत लोकगीतांचे सम्यक आणि वस्तुनिष्ठ वर्गीकरण करण्यात आले असून त्याला सात गटात मांडण्यात आले आहे.

## **कोळी गीतांचे वर्गीकरण** :-

| | | |
|---|---|---|
| पहिला गट | - | कोळी समूहाची दर्यावर्दी लोकजीवनाची गीते. |
| दुसरा गट | - | होळी सणासंबंधी गीते |
| तिसरा गट | - | नारळीपौर्णिमा (पुनव) सणासंबंधी गीते |
| चौथा गट | - | दसरा-दिवाळी संबंधी गीते |
| पाचवा गट | - | लग्न (विधी) गीते |
| सहावा गट | - | कोळी लोकदैवतांची गीते (भक्तीगीते) |
| सातवा गट | - | विविध भाववृत्तीची आठ गीते |

निवडक कोळी गीतांचा समावेश प्रस्तुत संकलन आणि संपादनात केला असून त्याचे सात गटातील विभाजन स्थूलपणे असले तरी समग्र कोळी लोकजीवनाचे (समूह) दर्शन आणि त्यांच्या लोकश्रद्धा, लोकमानस, लोकधारणा आणि शाब्द, शारीर तसेच भौतिक व सांस्कृतिक अवशेषांचे हे एकत्रित संमिश्र रूप असते. याचे भान प्रस्तुत अभ्यासातून येते. लोकजीवनातील विविध देवदेवता, त्यांची श्रद्धा आणि लोकधर्मीय भावना कोळीगीतातून कशाप्रकारे प्रचलित आहेत त्याचा हा अभ्यास ठरतो. तसेच नारलीपौर्णिमा, होळी, दसरा-दिवाळी इत्यादी सण उत्सवांची परंपरा पिढ्यान्पिढ्या कशी जतन करण्यात आली त्याचे चित्रण प्रस्तुत लोकगीतांतून दृष्टीपथात येते. लग्नपरंपरा आणि मार्तिकाच्या परंपरा यांना 'तोरणदारी' आणि 'मरणदारी' या लोकभावनांची पार्श्वभूमी असते. यासाठी लोकांच्या, समूहाच्या भावनाशील आणि सुखदुःखात सामील होण्याच्या परंपरा निश्चित झाल्या आहेत. त्या दृष्टीने लोकदैवतांची उपासना, आराधना, विधी-पूजा आणि त्यांना प्रसन्न करणे तसेच त्यांच्या रौद्ररूपाला शरण येऊन त्यांची आळवणी करणे ही 'परंपरा' पिढ्यान्पिढयांनी रूढ झाली. त्याचा परिपाक लोकगीतातून दिसून येतो. नारलीपौर्णिमा (पुनव), होळी आणि दसरा-दिवाळी या सण-उत्सवांची परंपरा ही प्राचीनतम लोकसमूहाची समाज, संस्कृतीसह जतन झालेली लोकमानसीय संस्कृतीच आहे. म्हणून "सन आला शिमग्याचा... हौलायचा" असा उत्स्फूर्त उद्गार उमटतो. "दिवाली दरी आयलीय गो माजे मायेस्वी याद मना झैयली गो." अशी स्त्री मनातली माहेरची आठवण सहज उद्गारातून व्यक्त होते. "गावचा नाखवा निघाला रं निघाला दर्याला... नेसून नटून सोत सुरलं कंबरेला" अशी नाखव्याची परंपरा आणि त्याची दर्यावर्दी जीवन यांचा हा सार्थ गौरव लोकगीतातून उमटतो. 'परंपरा' हा लोकगीताच्या शाब्द वाङ्मयाच्या निर्मितीचा प्रेरणा स्त्रोत असतो. त्याची प्रचिती या सर्वच कोळीगीतातून वाचकांना येते.

## **कोळीगीतांचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये** :-

'कोळी लोकगीते' ही लोकसमूहाची निर्मिती असून 'परंपरा' ही त्यांची आधारभूमी आहे. त्यामुळे या गीतांचे स्वरूप समजून घेताना त्याचा 'कर्ता' हा व्यक्तीपेक्षा 'लोकसमूह' आहे म्हणूनच

ते 'लोकगीत' आहे असे मानावे लागते. 'कोळी' आणि 'लोक' या पदांच्या अर्थातच 'Folk' परंपरा अध्याहृत असल्याने या लोकगीतांची परंपरा, समाज, संस्कृती आणि लोकदैवते-श्रद्धा-धारणांसह असलेल्या 'लोकतत्त्व' घटकांचे महत्त्व समजून घ्यावे लागते. कोळी लोकसमूहाची गीते म्हणून ती 'कोळी लोकगीते' अशी त्यांची सुटसुटीत व्याख्याच त्यांचे स्वरूप स्पष्ट करते.

- कोळी लोकमानसाची निर्मिती हे त्या लोकगीतांचे स्वरूप अधोरेखित होते.
- लोकसमूहाची आणि कोळी लोकसंस्कृतीची जडणघडण या लोकगीतातून दृष्टीस येते.
- कोळी लोकांचे सण-उत्सव, परंपरा आणि लोकाचार तसेच लोकनृत्य-लोकसंगीत यांचा एकत्रित असा आविष्कार या लोकगीतातून प्रकट होतो.
- या लोकगीतांची भाषा बोली असून ती कोळी जमातीच्या मौखिक व शाब्द परंपरेतून आविष्कृत होते.
- लय, ताल, आणि गेयता यांसह आलेला श्रद्धांचा आणि आंतरिक सुखदु:खाचा आविष्कार या लोकगीतातून होतो.
- उस्फूर्तता, अकृत्रिमता, सहजता, आपुलकी आणि परंपरांची जतन करण्याची प्राचीन मानसिकता या सर्वांचा संमिश्र आविष्कार कोळी लोकगीतातून होतो.
- विधी संबंद्धता, क्रिया-यातु इत्यादी संबंद्धता, मंत्रात्मकता आणि लयतत्त्व, नृत्य-संगीतमय प्रायोगिकता, कष्ट-श्रम संस्कृतीची आधारभूमी इत्यादींमुळे कोळी लोकगीते त्यांचे स्वरूप आणि वेगळेपण वाचकांच्या सहज लक्षात येते. दर्यावर्दी जीवन, पारंपरिक श्रद्धाळू वृत्ती, सण-उत्सवांची आंतरिक ओढ, दैवतांविषयीची लोकधर्मीय श्रद्धा, लोकजीवनातील अनुभव आणि लोकधारणांची ही निर्मिती आहे, असे जाणवते.

## कोळी लोकजीवन आणि लोकगीते :-

महाराष्ट्रातील अरबी समुद्राच्या किनारपट्टीवरील कोकण आणि परिसरात अनेक जातीजमातींचे वास्तव्य आहे. त्यामध्ये 'कोळी' समाज हा प्राचीनतम जीवन जगणारा देशी लोकांचा समूह म्हणून प्रचलित आहे. 'वाल्मिकी' (रामायणकर्ता) कोळी जमातीचा होता. 'व्यासमुनी' (महाभारतकर्ता) मासेमारी करणाऱ्या जमातीत जन्मलेला होता. हा इतिहास प्राचीन असून 'मासेमारी' करणाऱ्या जमातींमध्ये 'कोळी' समाजाच्या अनेक जातीजमातींचा समावेश होतो. हजारो जमातींच्या या पोटशाखा 'कोळी' या सर्वसमावेशक समाजाशी निगडित आहेत. महाराष्ट्रातील कोळी समाजात सोनकोळी, महादेव कोळी, धीवर कोळी, भोई कोळी, मल्हार कोळी, मांगेला कोळी, नाखवा कोळी, खाखी कोळी अशा अनेक जमातींचा उल्लेख करावा इतकी त्यांची संख्या आहे. या समाजाचा मुख्य व्यवसाय मासेमारी करणे; दर्यावर्दी होऊन नौका चालवणे; भातशेती-नारळी पोफळीची जोड व्यवसायाची शेती करणे इत्यादी प्रकारचे प्राकृतिक व्यवसाय आणि परंपरेने चालत आलेले हे व्यवसाय आहेत. कष्टकरी, दर्यावर्दी जीवन जगणारा हा समाज आहे. नैसर्गिक आपत्तींशी टक्कर देणे, समुद्राच्या रौद्ररूपाशी दोन हात करणे, मत्स्योत्पादनातून आणि अल्पशेतीतून उदरनिर्वाहाची साधने जुळविणे हा त्यांचा जीवनविषयक सिद्धांत ठरून गेला आहे.

समुद्रकिनारा, नदी, खाडी, तलाव यांच्या परिसरात कोळी समाजाची वस्ती आढळते. मासेमारीचा व्यवसाय यामुळे सुरळीतपणे करता येतो. साधी राहाणी, धर्मानुकरण करणारी जीवनपद्धती, स्त्री-पुरुषांचा विशिष्ट पेहराव, काटक शरीरयष्टी, धार्मिक-कुळाचारातील अंधश्रद्धांनाही कोळी जीवनात असलेले स्थान, होळी, नारलीपुनव आणि दसरा दिवाळीचे सण-उत्सवांची परंपरा कोळी लोकजीवनात दिसून येतात. या त्यांच्या जीवनपद्धतीला 'लोकधाटी' म्हणतात. मुंबई, ठाणे, अलिबाग, पनवेल, नवी मुंबई या शहरी प्रदेशाच्या जवळ राहूनही 'कोळी' लोकजीवनधाटी शहरी संस्कृतीपेक्षा पूर्णतः वेगळी व आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवणारी ठरते.

समुद्राच्या रौद्ररूपाशी दोन हात करताना करावी लागणारी दर्यावर्दी प्रवृत्ती, परंतु निसर्गरूपापेक्षा आपण कमी असल्याची भावना म्हणजेच 'निसर्गशरणता' कोळी समाजात म्हणजेच लोकमानसात दृढ आहे. त्यातूनच 'समुद्रपूजा' ही लोकपरंपररा रूढ झाली. मासेमारी, मासेशिकार अधिक उपलब्ध व्हावी ही मनोकामना, अन्न मिळवण्याची धडपड, वंशवृद्धीची निसर्गनिर्मित ओढ, स्वसंरक्षणासाठी आणि निसर्ग कोपापासून संरक्षित होण्यासाठी लोकदैवतांची आराधना, विधीपूजा करण्याची लोकरूढी, पराधीनता आणि जीवनाची अशाश्वतता यामुळे दैवाधीन बनलेला कोळी समाज याचे दर्शन त्यांच्या जीवनविषयक दृष्टीकोनातून घडते. त्यामुळेच डॉ.रमेश कुबल म्हणतात; "विज्ञाननिष्ठेपेक्षा दैवाधिनता प्रबळ ठरली, म्हणून मंत्रतंत्र, विधिविधाने ही कोळी जीवनाचाराच्या मुळाशी जाऊन बसली." (प्रस्तावना, पृ.२५) हे त्यांचे निरीक्षण लोकमानस आणि लोकधारणा (श्रद्धा) या दृष्टीने उपयुक्त असून त्यांच्या लोकजीवनाचे मर्म सांगणारे आहे.

## कोळीसमाजाची लोकदैवते-विधीपूजा :-

समुद्र (सागर) हे निसर्ग दैवत, त्यावर आधारित मासेमारी व्यवसाय याबद्दलच्या लोकधाटीतील लोकश्रद्धांचा प्रभाव कोळी लोकजीवनात आढळतो. 'निसर्गरूपकवादी' संप्रदायाच्या अभ्यासकांनी मानवाच्या आदिम लोकमानसात 'निसर्गदैवते' आणि लोकपरंपरा यांचे अतूट नाते स्पष्टच केले आहे. पृथ्वी, तारे, सूर्य-चंद्र, वारा, वादळ, समुद्र, नदी-पूर इत्यादी निसर्गशक्तींचा 'चमत्कार' मान्य केला तर त्याला 'नमस्कार' करण्याची परंपरा ही आदिम (प्राचीन) ठरते. कोळी समाजाच्या लोकदैवतांचा विचार करता कार्ल्याची एकवीरा माता, विरारची जीवदानी, कोल्हापूरची महालक्ष्मीआई, जेजुरीचा खंडेराव इत्यादी देवतांना ते पूजतात. त्याचे नवस-सायास करून या देवतांना मनोकामना पूर्ण करण्यासाठी 'मागणे' मागतात. देवधर्म-पूजाविधी करतात. नवसदेवतांची स्तुतीपर गीते गातात, आरत्या म्हणतात.

भूत-खेते आणि तामसदेवता (राक्षसी देवता) याबद्दलचा अंधविश्वास ही लोकजीवनात आढळतो. होळी (शिमगा) सणाला होलिकोत्सव साजरा करणे, नारळी पौर्णिमेला (नारली पुनव) समुद्राला नारळ अर्पण करून त्याची शांती करणे, गौरी-गणपतीच्या सणाच्या निमित्ताने निसर्ग, भूमी, समुद्र, आदी शक्तींची पूजाविधी करून त्यांना शांत करणे, शरण जाणे, त्यांच्या सण उत्सवाच्या निमित्ताने नृत्य-नाच, गायन-वादन करून देवतांची आराधना करणे, देवीला कौल मागणे, विधीविधान करणे ही परंपरा कोळी लोकजीवनात पूर्वापार रूढ आहे. जन्म, बारसे (नामकरण), मुंज, विवाहप्रसंगीचे विधी, मृत्यूविधी, सण-वार (उत्सव), सोयरिकसंबंध, देवतांची पूजा इत्यादी प्रसंगी विविध विधी गीते, लोकगीते सादर करून कोळी समाज आपली सांस्कृतिक परंपरा टिकवून आहे. वरील विविध प्रसंगी लोकगीतांचे गायन, नृत्य आणि

सादरीकरण ही सामूहिक लोककला परंपरा म्हणून समाजाने जतन केली आहे. 'कोळी लोकगीते' ही आता प्रसारमाध्यमे, ध्वनीचित्रफिती आणि चित्रपटातूनही प्रचलित झाली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात सर्वसंचारी अशी ही परंपरा लोकप्रिय झाली आहे. त्यामुळे ते सर्वच लोकांचे प्रिय झाले असून मराठी अस्मितेचाही अविभाज्य घटक बनले आहे.

'कोळीगीत' हे कोळी लोकजीवनधाटीचा 'आत्मा' मानले जाते. त्याची रचना, शाब्दपरंपरा, लोकजीवनातील कपडे-लत्ते, दागदागिने आणि सण-उत्सव या सर्वांना एकत्रित बांधून सादर करण्याची त्यांची आगळीवेगळी शैली यामुळे हे 'लोकगीते' लोकांची लोकांसाठी अशी प्रचलित झाली आहेत. नातीगोती, संस्कारांचे प्रसंग, लोकधारणा आणि श्रद्धांसह असलेली जीवनजाणीव, भावपूर्णता आणि लोकमनाची जडणघडण यांचा हा वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार ‘कोळी’ लोकसमूहाचा असल्यामुळे तो लोकजीवनधाटीचा 'आत्मा' ठरला आहे. कोळी जीवनातील धर्म, संस्कृती, समाज, लोकतत्त्वीय घटकांचा प्रभाव या लोकगीतातून सर्वत्र आढळतो. म्हणून ही लोकगीते कोळी लोकसमूहाच्या सांस्कृतिक जडणघडणीसह प्रस्थापित वेगळेपणाची साक्ष देणारी ठरतात.

## ‘कोळी’ लोकगीतांच्या विषयाची विविधता :-

कोळी लोकगीतांच्या विविध विषयांचा मागोवा घेतला तर त्यातून त्यांचे वैविध्य आणि स्वरूप-वैशिष्ट्यांचा सहज परिचय होतो. सागरसंस्कृती संबंधित विषयात दर्यावर्दी जीवन आणि युयुत्सुसाहसी प्रवृत्तीचे दर्शन घडते. 'आमी कोली दर्याचे राजे', 'नाखवा', 'देव मल्हारी', 'होरी बावटा', 'म्हावरं', 'बारशावीराची प्रार्थना', 'डोलकरा डोलकरा दर्याचा राजा', 'बंदरी तारू आयलय गो', 'अगो माजे शालू बायगो', 'कौलारू घर कोनी बांधलय रं', 'माज्या सारंगा', अशी किती तरी गीते सहज लक्षात येतात. या गीतातून निसर्गशक्ती, दैवते आणि दैववादी कोळीराजा यांचा भावनिक संबंध स्पष्ट होतो. दर्यावर्दी, काटक आणि साहसी लोकजीवनाचे विविध विषय हा या लोकगीतांचा प्रतिपाद्य विषय बनतो.

'होळी' सणासंबंधीच्या विषयाची काही लोकगीते प्रचलित आहेत. 'सन आयलाय ह्यो हौलायचा', 'आली रं आयली हौलाय आयली', 'हौलूचा सन आयलाय नाक्यावर', अशी लोकगीते आढळतात. तर नारळीपौर्णिमा (नारली पुनव) या सणांची गीते ही लक्षणीय ठरतात. 'सन आयलाय गो... नारली पुनवेचा', 'नारल निघालाय सोन्याचा', 'दारान मांडव कनाला नारली पुनवेचे सनाला', 'नारलपुनव आज नारलपुनव आज भरलाय गो शेंदूर' अशी नारळी पौर्णिमेच्या संबंधित विषयाची गीते ही लोकगीतात समाविष्ट आहेत.

नागपंचमी, दसरा-दिवाळी सणाच्या विषयावर आधारित काही कोळीगीते खूप लक्षणीय असून ती प्रस्तुत संकलनात समाविष्ट आहेत. 'आंबिया बनीच्या काल्यानिल्या नागा', 'नऊ ये दिवसाच्या नऊ राती सोन्याच्या' (नवरात्र), 'दिवाली दारी आयली गो, माज्या मायेस्नी याद मना झैयली गो', अशा सणांची आणि लोकजीवनाची नाळ जुळणारी विविधता या गीतातून जाणवते. 'जयपूरची चोली अन् चेंदेरी सारा' (शालू नवरी), 'बापा रे बापा देवू नको मना तू मोठे घरा' (सासर), 'जयपूरची चोली अन चंदेरी सारा' (लग्नसंबंधी-प्रेम), 'खंदेरी मुरडान गो लाल बावटा' (लग्न-सगे सोयरे), 'ढोल वाजतय रं कव्हा रं' (साखरपुडा), 'देवाधर्माची नवा नवसाची लेक माजी लाराची' (नवरी), 'घाणाकुटताना' (हळदीचे गाणे), मेढ स्थापताना, 'नवरदेवाजवळ फिरताना', 'हलदीचा अंग माजा..., आंबियाला मोहर आला', अशी लग्नाच्या विविध प्रसंगाची

वैविध्यपूर्ण विषयाची ही लोकगीते उल्लेखनीय आणि मौखिक परंपरेचा वारसा जतन करणारी आहेत. 'नमन' या विषयाअंतर्गत देवादिकांची गाणी विशेष उल्लेखपूर्ण आहेत. 'पयले नमन गणपती देवाला', 'गण नमिला नमिला गौरीचा', 'तुलशी गो बाय माजे, बाप माझा विठ्ठलू', 'सकाली देवा दिनमान उगवल रे' (खंडोबा-बानू), 'आय माझी एकवीरा देवी तू डोंगरावरी', 'हिंगलादेवी गो हिंगलाय देवा', अशी देवादिकांची आणि लोकदैवतांच्या विषयीची श्रद्धा व्यक्त करणारी कोळीगीते आढळून येतात. 'टिमक्याची चोली बाय रंगान फुलैली' (वरलीकरीन बाय), 'आला रं आला गोविंदा', 'शंकरदेव गेले वनासा', 'पोरी सांभाळ दर्याला तुफान आयलय भारी', अशी प्रसिद्ध आणि सुपरिचित विषयाची लोकगीते महाराष्ट्रात परिचित आहेत. कोळी लोकगीतांच्या विषयाची विविधता लक्षात घेता जन्म-मृत्यू, लग्नसंस्कार, मासेमारी, दर्याचे तुफान, नारळी पुनव, होळी, सण-उत्सव, गौरीगणपती, विविध दैवते, होडी बांधणे, नाखवा डोलीला जाणे, लोकमानस-लोकश्रद्धा आणि लोकभावनेचे विविध विषय या लोकगीतांचा प्रतिपाद्य विषय असून त्यातून लोकसंस्कृती आणि लोकतत्त्वीय धारणांचा परिचय होतो.

## आमी कोली दर्याचे राजे :-

कोळी लोक स्वतः दर्यावर्दी, तुफानाला सामोरे जाणारे, सागर संस्कृतीचे उपासक आणि सागरावर हुकुमत गाजवणारे शक्तीशाली असे शक्तीचे उपासक मानले जातात. सागराशी नाते सांगणारा हा समाज त्याच्या अंगाखांद्यावर वाढलेला आहे. नौका चालवणे, सागरी प्रवास आणि मासेमारी करणे, निसर्गावर आधारित व्यवसाय करताना श्रमप्रतिष्ठा आणि दैवाधीनता अशा द्विधा स्थितीत सापडलेला हा समाज आहे. त्यांची काही लोकगीते प्रस्तुत संकलनात 'आमी कोली दर्याचे राजे' या विभागात नोंदवण्यात आली आहेत.

आम्ही कोली दर्याचे राजे असून आम्ही मासेमारी करतो. होडी भरून मासे आणतो, वारा-ऊन याची तमा न करता निडरपणे वारा पाण्याशी टक्कर देऊन 'मावरं' (मासे) आम्ही बंदराला आणतो. खंडेरायाची उपासना करतो, तो आमच्या नवसाला पावतो.

आम्ही कोली दर्याचे राजे
न बारान जाऊन होरं भरून माशे आनताव...
वर्साचे वर्साला मान देताव रं
जेजूरी नगराला पालखी नेताव रं...
भंडारा खोबरं उरवू खंडेरायाला
पावेल दर्या न आज आमचे नवसाला...(पृ.३२)

लोकश्रद्धा आणि लोकदैवतांची विधीपूजा हा लोकपरंपरेचा आधार असतो. त्याची जाण या लोकगीतातून होते. आम्ही कोळी लोक चंदनाच्या लाकडाच्या फळ्या पाडतो, उत्तम सुताराकडून फळ्या पाडून त्यांना खिळे ठोकून 'नाखवा' बांधतो. होडी तयार करून त्याचा व्यवसाय करतो. हा भाव 'चोखा चंदनू कांडियला...' या गीतातून व्यक्त होतो. 'मल्हारी देवा' ची आळवणी करणारा कोळीसमाज आपल्या लोकगीतातून त्याच्या उंच डोंगराची, पायऱ्यांची, त्याला हळदीनं माखण्याची, त्याच्या कळसाला बावटा (निशाण) लावण्याची, कोंबडं-बकरं कापून त्याचा नैवेद्य चढवून विधी करण्याची अभिलाषा व्यक्त करतो हे सामूहिक गीत –

देवा तुजी पालखी सजवीन मल्हारी... हेय मल्हारी.
देवा सातपाटीच्या कोल्याला पावरं मल्हारी...हेय मल्हारी. (पृ.३३)

अशा प्रकारे सयमक, तालबद्ध आणि पुनरावृत्तीसह गायले जाते. त्यातील श्रद्धाशील लोकमानस आणि लोकदैवताची विधी-परंपरा यासह 'ऐहिक सुख' प्राप्ती व्हावी अशी भक्ताची मनिषा आहे. 'मल्हारी' कुळदैवताची आराधना, उपासना, भक्तीभाव गीतातून प्रकटतो. 'होडीचा बावटा' या गीतातून लोकमनातील वरलीचा बावटा, बावट्याची निशानी-वेताळ देवाची, परबानकाढी-चेडेदेवाची, सुकानी धीर-गोलफा देवीची आहे.

"लाटाव डुलतय, लाटाव डुलतय
डुलतय होरं वरलीचं." (पृ.३४)

संकटापासून मुक्ती, भूतपिशाच्चापासून संरक्षण देण्याऱ्या देवतांची उपासना करून मासे अधिक उपजावेत, भरपूर मासेमारी करून उत्पादन वाढवावे अशी 'ऐहिक' अभिलाषा ठेवून 'कोळीसमाज' 'बारशावीरा' ची उपासना करतो. "दैर्यात म्हावरं कमी आहेत हे देवा बारशावीरा कोल्याना पावरं." (पृ.३५) अशी विनवणी करून वसईचा हलवा, सातपाटीचा चंदेरी सरंगा, दांडावेसावचा-सिंगा तांबडा, वेंगुर्ल्याचा बांगडा, असे सर्व मासे आणि त्यांच्या प्रजाती भरपूर जन्माला याव्यात म्हणून 'बारशावीरा'ची प्रार्थना करणारा कोळीसमाज पारंपरिक व्यवसाय आणि लोकपरंपरांचे जतन करतो. 'एकवीरा' आईवर भरवसा ठेवून समुद्रात तुफानात अडकलेला कोळी बांधव तिचा धावा करतो. परतीचा प्रवास करताना संकटातून बाहेर पडताना आपल्या बांधवांना धीर देत म्हणतो-

"भरोसा राख एकवीरा आईवर
होरं आपलं जाईल भरभर." (पृ.३६)

भक्तीभावाबरोबरच प्रपंचातील पती-पत्नीमधील प्रेमभाव जपणारी ही कोळीजमात व्यवहार आणि व्यवसायाविषयी सजग असते. "डोलकरा डोलकरा माझे डोलकरा" या गीतातून आशावादी दृष्टीकोन आणि होडी-बंदर-शिकार-बाजार या आपल्या जीवनमग्न अवस्थेत डुंबून जातो. तो आपल्या पत्नीला म्हणतो

"इकावा म्हावरा वखत आवरा, बगतेस कनला सुंदरा दिरक्या दिरक्या आनून दे मना, सजवीन सोन्यानी मी तुला बोरमाल करीन या साटनीला, सजवीन सोन्यानी मी तुला हिरवी हिरवी चोरी अंगाला सारी आनीन गो नेसावला." कष्टाची कमाई करून, पैसा (दिडक्या) पैसा जमवून संसार फुलवावा, बायकोला सोन्यानं सजवावी, दागदागिने करावे आणि चांगले कपडेलत्ते द्यावेत. अशी अभिलाषा ठेवून आनंदाची पाखरण करणारा 'कोळी' (नवरा) आपल्या कष्टांची आणि परिश्रमांची शाश्वत जीवनमूल्ये जतन करून पाहातो. हे कोळीगीतांचे वैभव त्या कष्ट-श्रमसंस्कृतीचा प्रतीक आहे. 'बंदरी तारू आयलंय गो शालू' 'अगो माजे शालू बाय गो' या गीतातून प्रेम आणि प्रणयाराधनासाठी आसुसलेली नवरा दर्यावर गेल्यावर जो विरह अनुभवतो. त्याचे प्रतिपादन, लोकमनातील भाव या गीतात उमटतात.

"दर्यान गेल्यावर गो शालू जीव लय झुरतय
खाऱ्या पानामंदी तू दिसतय"
"नाव घेतल्या बिगर तुझा गो शालू
डोलीस जोर लावि नाय" (पृष्ठ - ३८)

मासे विकायला जाणारी 'शालू' (पत्नी) दिवसभर मासे विकून घरखर्चासाठी कमाई करून आणते. कामचुकार नवरा घरी बसून आयतं खातो. त्याचा निषेध या गीतातून होतो.

"घरात याला बाय थाराच नाय
भाव बापूसाचे साला बसून खाय
याच्या नावाने रडते माय
भानगडीत नको परूस बाय
हा रिकाम टेकडा, ओढतोय बिड्या, भपका भारी हाय" (पृष्ठ - ३९)

अश्विन महिन्याच्या दिवसात 'धनी' समुद्रात मासेमारीसाठी गेला असताना तो सुखाने घरी परतावा यासाठी 'कोळी स्त्री' गणपतीला नवस करते, एकवीरेला साकडं घालते, तिला कोंबडं-बकरं देईन म्हणते, शंकराला नवस करताना त्याला बेलफुलानं पूजीन म्हणते. अवचित सुटलेल्या वादळवाऱ्याने अस्वस्थ होणारी ही गृहिणी आपल्याच पतीच्या जीवासाठी अशी असहाय होऊन देवादिकांची पूजा-विधी करीत असे.

"आश्विन महिन्याच्या दिसाला ग गोमू, महिन्याच्या दिसाला
अवचित सुटला वादल वारा हे रामा सुटला वादल वारा"

या गीतातून व्यक्त होणारी ही स्त्री मनाची घालमेल, श्रद्धाशीलता आणि चिंताग्रस्त अवस्थाच दृष्टीस येते. "कौलारू घर कोनी बांधलय रं" या गीतातून बंदरावर बांधलेल्या काल्पनिक घराची प्रतिकृतीच उभी राहते. कौलारू घराची रचना त्यासाठी लागणाऱ्या डोलकाठ्या, मातीच्या भिंती, त्यांना लिंपण्यासाठी मदत करणारा हलवा-सरंग्या माशांची मदत, शिंगाडा, बोबिंल, मांदेली, जिताडा, कोलीम, पाला, भिंगा इत्यादी मासे सहकार्य करीत आहेत. याचा भावार्थ खूप आगळा वेगळा आहे. या सर्व सागराच्या संपत्तीवरच कोळी लोकांचा प्रपंच उभा राहतो. 'घर' ही प्रपंचाची प्रतिमा असून त्यातूनच आपलं कौलारू घर उभं करणारा कष्टकरी कोळी माणूस या गीतातून व्यक्त होतो. त्याच्या ऐहिक प्रपंचाची, लौकिक घराची कल्पना अशा कष्टमय वाटेतून फुलत जाते. म्हणून ही लोकगीते भौतिक संस्कृती आणि मनोमय संस्कृतीचा एकत्रित आविष्कार असतात.

## आरं माज्या सारंगा:- (तुफान उठलय):

दर्यावर्दी नवरा समुद्रात गेल्यावर जो विरह-यातना स्त्रीला भोगाव्या लागतात त्याचा प्रत्यय या लोकगीतात येतो. समुद्राची विधायकवृत्ती ही कोळी राजाला समृद्धी बहाल करते. तर त्याची विध्वंसक वृत्ती ही 'तुफान' या शब्दातून व्यक्त होते. त्याचे रौद्ररूप, त्याचा प्रकोप, त्याने केलेला विध्वंस हा सहनशीलतेच्या पलीकडचा असतो. त्या तुफानाचा काही भरवसा नाही, त्याला उधाणाला धरबंध नाही. विशेषतः स्त्रीचा जीव भांड्यात पडतो. ती म्हणते,

"आरं माज्या सारंगा, माझ्या होडीवाल्या
दर्या नको जा तुफान उठलय चल घरा"

त्यावर तिचा धीर काढू 'पुरुष' म्हणतो- "कनला घाबरतय तुफान वाऱ्याला, बेगीन बेगीन रोय्या भाजून दे मला." मी या तुफानाला धडक देऊन भरपूर मासे आणीन, तू जरा धीर धर; बघ कसा पैसा कमवतो. तुला टिमक्याची साडी आणि चंदनाची चोळी आणीन. आपण दोघं जण मुंबईला जाऊन मजा करू. सुखात जगू.

संकटात सापडलेल्या 'तारवा'ला सावरण्यासाठी देवाची विनवणी, सागराची आळवणी करणारं लोकमानस कोळीगीतात सर्वत्र आढळते. दर्यात तू लाटा आणून नकोस, वल्हं तुटलय, तारवं फुटलय, शीड फाटलय, पानी मधून घुसलय म्हणून हे देवा "नको लाट खोलू दर्यात देवा" "माझं तू किनारी लाव. बकरं वाहीन तुली लय लयलय रं" अशी विनवणी करणारा कोळी राजा आळवणी, विनवणी करतो. 'माघातला सकालचा पारा यो' या गीतातील वाट पाहणारी नवी नवरी, तिची मनोव्यथा, अवस्था व्यक्त होताना जीव घाबरा होतो. त्यावर "आई एकवीरा देवी नवसाला पावलीय ग." असा समज लोकमानसात रूढ आहे. तसेच भादव्याच्या पुनवेला, नवरा मासेमारीसाठी समुद्रात गेल्यावर स्त्रीचा 'भरोसा', विश्वास, डोंगरच्या देवीवर आहे.

"समदा संसार धन्याच्या जीवावर
भरोसा ठेविला डोंगरच्या देवीवर
सोन्याचा नारळ व्हाईन पायावर
माय धन्याचं होरं लाविस बंदराला
नारल पुनवेच्या पुनवेच्या सणाला" (पृ.४५)

'मृगाचा पाऊस' थांबतच नाही, संततधार पावसाने, तुफान वादळ वाऱ्याने काळीज कापते. त्यावेळी असाच धावा केला जातो.

"एकवीरा आई तुझा करते धावा
डोंगरच्या माऊली हांकेला धावा
सुखाने दाराला लागू दे पाय" (पृ.४६)

## होळीचा सण आणि लोकगीते:

नारळी पौर्णिमा, दसरा-दिवाळी आणि होळी हे सर्वच सण आनंदाने उत्साहपूर्ण साजरे केले जातात. 'होलीकोत्सव' हा रंगीत जीवनाचा आनंदोत्सव असतो. यादिवशी कामधंदा बंद, रंगात रंगायचं, आनंदात मौजमस्ती करायची. 'हौलाय माता'ची मिरवणूक, नाचणे-गाणे आणि साहेबाच्या नावाने शिव्या (अपशब्द) दिल्या जातात. 'शिवी' आणि 'ओवी' यांचे लोकजीवनात अतूट नाते आहे. त्यांचा उगम आंतरिक उर्मीतून उत्स्फूर्तपणे होत असतो. 'अपशब्द' हे लोकमानसातले आगळेवेगळे लोकतत्त्व आहे. त्यामुळे मानसिक विरेचन होते. 'साहेब' (इंग्रज) जुलूमी आहे. त्याचा निषेध करण्याची ही लोक निषेधाची परंपराच आहे. 'शिमगा'सणाचे महत्त्व त्या दृष्टीने अपरंपार आहे.

"आयली रं आयली हौलाय आयली
सायबाच्या पोटावर बंदुकाची गोली . . .
हौलायच्या पूजेची कर गो तयारी
नेस गो चिमू टिमक्याची सारी. . .
आ गं चल चल सीमा आ गं नाचव चल
लखलखताय लखलखताय समदा कोलीवारा लखलखताय." (पृष्ठ ५३)

होळीच्या बोंबा मारणे, होळीआईचा होम पेटवणे, होळीसाठी लाकूडफाटा मिळवणे, होळीआईला आणण्यासाठी वाजतगाजत मिरवणूक काढणे, रंगात होळीआईला रंगविणे अशी लोकमानसातील होलीकोत्सवाची प्रतिमा या लोकगीतातून स्पष्ट होते.

"हौलूचा सन आयलाय नाक्यावर
ढोलताशे वाजतानं धक्क्यावर" (पृष्ठ ५४)

'नारळी पौर्णिमेची' विपुल गाणी कोळीगीतात समाविष्ट आहेत.

"सन आयलाय गो नारली पुनवेचा
मनी आनंद मावेना कोल्यांच्या दुनियेचा
अरे बेगीन बेगीन चला किनारी जावू देवाच्या पूंजेला
हात जोरीनी नारल सोन्याचा देवू या दर्याला" (पृष्ठ ५५)

दसरा-नवरात्र आणि दिवाळीच्या सणांची लोकगीते ही बरीच आहेत.

नवरात्रीच्या नऊ दिवसाच्या नऊ राती म्हणजे सोन्याच्या रात्री आहेत. देवी अंबाबाईच्याच उपासनेची ही लोकमनातील प्रतिमा आहे. 'घटस्थापना' आणि 'देवीची उपासना' करणारा कोळी समाज अंबा, तुळजा भवानी, कार्ल्याची एकवीरा माता, जीवदानी माता, जेजुरीचा खंडोबा यांच्या भेटीचा नऊ रात्रीचा वृत्तांत गीतात मांडण्यात आला आहे. नवव्या रात्रीला आईचा 'गोंधळ मांडिला, भंडारा वाटला, पालखीत मिरवणूक काढला' अशी ही 'नवरात्रीची' लोकपरंपरा या गीतातून व्यक्त झाली आहे.

"नऊ ये दिवसाच्या नऊ राती सोन्याच्या. . .
घटिया मांडुनी अंबा आई पुजिली." (पृ. ६१)

'दिवाळी'च्या सणाला माहेरची आठवण ही स्त्री मनाची आंतरिक घालमेल असते, ओढ असते आईच्या भेटीची आणि माहेरच्या सर्व जुन्या आठवणींची मालिकाच 'स्त्री' मनात उभी राहते. “बंधु मुऱ्हाई येईल, लाराच्या सोकरीला घेऊन जाईन,” "कावळा सकाळीच काव काव करतोय माझा माहेरचं कोणी तरी घ्यायला येते आहे." (पृ. ४७) असे भाव स्त्रीगीतातून व्यक्त होतात. 'कावळ्याचे कोकलणे' हे शकून मानले जाते. संत ज्ञानेश्वरांनी "पैल तो गे काऊ

कोकताहे शकून न ग माये सांगत आहे." अशी विराणीतून भेटीसाठी आतुरलेल्या भक्ताची भावावस्था मांडली आहे. शकूनाची ही खूण लोकमानसातील श्रद्धाशीलता आहे.

"दिवाली दारी आयली गो
माजे मायेस्नी याद मना झैली गो." (पृ. ६२)

भावा बहिणीचं नातं, दिवाळी आणि भाऊबीजेचं महत्त्व आणि माहेराची आठवण ही स्त्री मनाची आंतरिक उर्मीच म्हणावी लागेल. कोळीगीतातील 'दिवाळी' ही अशी लोकपरंपरेतील सण-उत्सवांची परंपरा जतन करणारी ठरते.

## कोळी गीतातील लग्नपरंपरा:

लग्नपरंपरा या लोकजीवनातील विधी आणि लौकिक परंपराच म्हटल्या जातात. लग्नातील नवरा (पुरुष) आणि नवरी (स्त्री) यांच्यातील भावनिक-शारीरिक नाते प्राचीनतम मानवी संस्कृतीचा आविष्कार म्हणावे लागेल. 'लग्न' हा विधी आणि त्या मागच्या सर्व कृतिशील परंपरांचा आढावाच स्त्री-पुरुषांच्या मनात यानिमित्ताने घेतला जातो. 'मासेमारी' करणारा कोळी समाज त्यांची जीवनपद्धती आणि कल्पनामय भावविश्व उलगडणारी ही 'लग्नगीते' लक्षणीय ठरतात. विविध मासे, त्यांचा परिवार आणि माशांचे लग्न लावण्याची कल्पनारम्य घटना लोकगीतात साकारते.

"शिंगाला नवरा झालाय गो
कोळंबी नवरी झयली गो बाय" (पृ. ६३)

शिंगाडा (मासा) नवरा आणि कोळंबी नवरी यांचा कल्पनेतला विवाहसोहळा या लोकगीतात मांडला आहे. सरंगा दादा, घोलू, चिंबोऱ्या, निवटा, माकलीन, केंडो, दोम्या, देवमासा, मुशी असे विविध मासे या लग्नाला वऱ्हाडी आले आहेत. त्यांची गुणवैशिष्ट्ये, साजधाज आणि वृत्तिप्रवृत्तींचा संदर्भ घेऊन मानवी प्रवृत्तींचा आरोप लोकप्रतिभेतून या लोकगीतात झाला आहे. या 'लोकप्रतिमा' मासे वऱ्हाडी मंडळीच्या रूपाने समाजजीवनाचे चिंतन व्यक्त करतात. लग्नासाठी दोनचार बकरं कापणं, सातआठ कोबडं कापणं, वऱ्हाडाची बडदास्त ठेवणं, मिरवणूक आणि कपड्यालत्त्यांची छानशोकी, करवल्यांचा नाच, पंमपंम गाडी, वाजंत्री असे लग्नपरंपरेचे दर्शन या लोकगीतातून घडते. (पृ. ६४)

"बापारे बापा देवू नको मना तू मोठ्या घरा बाय" (पृ. ६५) गरीबाघरीच मी सुखी राहीन. बड्या घरचे पोकळ वासे, मुलगा चांगला (वर) पाहिजे, गरीब चालेल परंतु तो कष्टकरी, सालस आणि माणुसकीवाला हवा. हा स्त्री मनाचा व्यावहारिक आणि अनुभवनिष्ठ दृष्टीकोन आहे. विविध जातीजमातींचा स्वभाव आणि समाजाअंतर्गत समज (लोकसमज) यांचे प्रतिबिंब लोकगीतात आढळते. बंगाली, बामन नवरा रात्रभर पोथ्या वाचतो – बायकोच्या सौंदर्याकडे त्याचे लक्षच नाही, लोहार नवरा तापट स्वभावाचा रातभर घन मारतोय एकली नार पलंगी बसलीच, भंडारी नवरा रातरातभर ताडी विकतोय घरी बायकोकडे लक्षच नाही, मात्र 'नाखवा' (कोळी) नवरा कसा चांगला याचे प्रतिबिंब पुढील ओळीतून उमटते.

"दर्या पाली घोली गो। कोन नवरा कोली गो
नाखवा माझा कोली गो।
रात्रीचा दिवस करून जातय डोलीला
नी म्हावरं इकिन मी बाजाराला." (पृ. ६६)

'वर' आणि 'वधू' परीक्षा याबाबतचे स्त्रीमनाचे गंमतीदार आडाखे कोळी स्त्रीगीतातून व्यक्त होतात. जयपूरची चोली, चंदेरी साडी, शालू नेसून नटलेली नवरी तिला 'वर' कोणता शोधायचा? मुंब्रा येथील वर नको चिखलीनं पाय भरतील, हेराफेरी जमणार नाही. एरवनचा नवरापण नको कारण खडकाळ जमिनीवर ते गाव आहे. पिण्याचे पाणी नाही. कंबरभर पान्यात 'माव्हर' धुवायला जमणार नाही.

"जयपूरची चोली चंदेरी सारा। शालू नेसली ग बरा बरा
शालू दिसतेय गो गोरी गोरी। कपालानं लावलाय गं मोठा तिला." (पृ. ६७)

आईबापाच्या लाडक्या लेकीला देवासारखा धनी मिळावा, माणूस म्हणून तो चांगला असावा. पैसा, गाडी, माडी हे वैभव असले तरी त्याचा 'ऐहिक उपभोग' असतो. 'लेक' लाडाची असते. नवसाची असते.

"देवा धर्माची नवा नवसाची
लेकमाजी लाराची
आज झाली गो नवुरी आपुल्या नवऱ्याची
लेक माजी लाराची" (पृ. ७०)

'लेक' ही रामाची सीता आहे. पृथ्वीमोलाची 'लेक' लाडाकोडात वाढली आहे. तिच्या गुणवैशिष्ट्यांचे वर्णन हे लोकप्रतिभा आणि स्त्रीमानसाचा आविष्कार असतो. हळदीचं गाणं (पृ. ७१), घिरटीचं गाणं (पृ. ७२), रेघ धरणे (पृ. ७३), घाणा कुटणे (पृ. ७५), घोडा निघाला, नवऱ्याचा नवरीच्या मांडवाला (पृ. ७८), नवरीचा शिनगार (पृ. ८१) अशा सर्वच लग्नगीतातून लग्नपरंपरा, रूढी-रीतिरिवाज आणि स्त्रीमनातील सासर-माहेर अशा सर्वच भावभावनांची निर्मिती या लोकगीतातून होत असते. जिला जन्म दिला तिला लाडाकौतुकाने वाढवले, सुखात वाढलेल्या आपल्या मुलीला सासरी पोटच्या मुलीप्रमाणे सासरच्या लोकांनी वागवावे अशी इच्छा वधूपक्षाकडून व्यक्त केली जाते.

"मायंदू मायंदू तुला वारयीली गो
मायंदू मायंदू तुला वारयीली गो
नेवून दिली सासूच्या हाती बाय जैसी
नेवून दिली सासूच्या हाती बाय जैसी
सासूनी पालावी पोटीची लेक जैसी
मायंदू मायंदू, तुला वारयीली गो " (पृ. ८५)

माहेरच्या लोकांचे हे हळवेपण आणि लेकीविषयीचा कळवळा सहजपणाने या गीतातून व्यक्त होतो. 'लेक' (कन्या) या मृदू-मुलायम भावनेचा हा सर्वांगसुंदर आणि भावविश्व उलगडणारा आविष्कार आहे. सासू, सासरा, दीर, नणंदा ही नाती सासरी गेल्यावर सासू (माय), सासरा (बाप), दीर (भाऊ), नणंदा (बहीणी) अशा स्वरूपात का जोपासली जात नाही. हे जीवनमूल्य या लोकगीतातून साकारते आणि लोकशिक्षण (Flok Education) आणि लोकप्रबोधनाची भूमिका स्पष्ट करते.

## शृंगार-प्रेमभाव भक्तीची गाणी :

'कोळीगीते' या संपादित लोकगीतांच्या संकलनामध्ये 'टिमक्याची चोली बाय रंगानं फुलैला' (पृ. १००) अशा स्वरूपाची सात भाववृत्तीची लोकगीते संकलित केली आहेत. जोडी तुझी माझी ही विधीलिखित असून तुझ्या हाती माझ्या जीवनाचे सर्वस्व देत आहे. स्वर्गसुखाची अभिलाषा या ऐहिकजीवनात फक्त जोडीदार स्त्री-पुरुष एकमेकास देऊ शकतात. ही भाववृत्ती चिरंतन आणि शाश्वत प्रेमाची साक्ष देणारी ठरते.

"टिमक्याची चोली बाय रंगानं फुलैली
तुझी माझी जमली जोरी माजे वरलीकरीन बाय गो" (पृ. १००)

राधाकृष्णाची मधुराभक्ती आणि विप्रलंभ शृंगार हा भारतीय लोकमानसाचा अविभाज्य भाग आहे. स्त्रीमनातील ही शृंगार-भक्ती या लोकगीतात 'चांदन्न चांन्र पीठभर चान्र' (पृ. १०१) या गीतातून व्यक्त होते. गोविंदा आला रे आला; दहीहंडी फोडण्याची परंपरा आणि श्रीकृष्ण, सुदामा, पेंद्या आणि त्यांचे सवंगडी (गोविंदा) यांच्या भावभक्तीचा आणि क्रीडाशक्तीचा लोकाविष्कार या प्रस्तुत 'आला रं आला गोविंदा' (पृ. १०२) या गीतातून झालेली आहे.

'शंकर देव गेले वनासी' (पृ. १०४) या गीतातील शंकर-पार्वती (शिव + शक्ती) यांच्या भावभक्तीचा आणि लोकमिथक कथेचा आविष्कार दिसतो.

मिथ्य (Myth) कथा ह्या पौराणिक प्राचीन दैवतांच्या कथा म्हणून लोकजीवनात प्रचलित असतात. शंकर पार्वतीची आणि गणपतीची कथा सर्वश्रूत आहे. 'मळाचा गणपती' हा चमत्कारिक विचार, शंकर-गणपतीचे युद्ध, गणपतीचा शिरच्छेद आणि गजमुखाचे आरोपणातून गणपतीची प्रतिमा साकारणे ही दैवतकथा (Myth) या लोककथागीतातून सादर केली आहे. तशीच 'हनुमंताची कथा' (पृ. १०७) रामायणातील असली तरी 'लोकरामायण' आणि 'लोकमहाभारत' या कथा विविध भाषेतून, विविध प्रदेशात आणि भिन्नभिन्न लोकसमूहात प्रचलित आहेत. हनुमंताने लंकेला जाऊन सीतेचा शोध घेतला. राम-रावण युद्धात महत्त्वाची कामगिरी बजावली, असा भक्तिभाव या कथागीतातून मांडण्यात आला आहे.

"पोरी सांभाळ दर्याला तुफान आयलंय भारी" (पृ. १०६) या लोकगीतातील शृंगार आणि प्रेमभाव लोकपरंपरेचा आधारभूत असाच आहे. तिच्या डोळ्यातला वादळवारा, जाळ्यात गावलेली  ती सोनरी मासळी, जरतारी अंजिरी साडी, प्रीतीची न्यारीच दौलत म्हणजे प्रेयसी, थाटामाटात गुलाबी बंगली दर्या किनारी बांधण्याची सुप्त मनाची इच्छा असा प्रणयरम्य भावबंध या लोकगीतातून प्रदर्शित होतो.

"पोरी सांभाळ दर्याला तुफान आयलंय भारी
लाट पिरतीची भन्नाट घेऊन आभाली घेई भरारी" (पृ. १०६)

'कोळी' लोकगीतातील प्रणयरम्यता, भक्तीभावाची आंतरिक ओढ, मधुराभक्तीची आणि लोकदैवतांची कथात्मकता या सर्वच बाबींचा प्रभाव अभ्यासता येतो. ही गीते लोकमानस आणि लोकश्रद्धेचा भावपूर्ण आविष्कार ठरतात.

## कोळी लोकगीतांची भाषाः

लोकगीतांची निर्मिती समूहाची असल्याने त्यांची भाषा ही बोलीभाषा असते. कोळी लोकसमूहाची मौखिक बोली हीच कोळीगीतांची भाषा आहे. मुंबईच्या शहरी प्रभावातूनही ती स्वतंत्र अस्तित्व टिकवून असलेली कोळी बोली आहे. बोलीची सहजता, सुलभता, उच्चार ध्वनींची पारंपरिक पद्धती आणि ठसकेबाज, नादमय तसेच लयबद्ध अशी गोडवा असलेली ही बोलीभाषा प्रस्तुत कोळीगीतातून प्रवाहीपणे अवतीर्ण झालेली आहे. लोकाविष्कार करण्यासाठी लोकजीवनात ज्या परंपरानी लोकसमूह जीवनास बांधून ठेवलेले असते अशा संस्कारांची ही बोलीभाषा कोळी लोकगीतातून अनुभवता येते.

आम्ही (आमी), कोळी (कोली), होडी (होरी), आणतो (आनताव), नाही (नाय), पाण्याला (पान्याला), खिळे (खिलिया), विकले (इकीयले), हळदीने (हलदीन), दिवस (दिस), विक्री (इकरा), वेळ (येळ), कोठे (कव्हार), नारळ (नारल), पौर्णिमा (पुनव), कावळा (कावला), थोडासा (थोरासा), होळीआई (हौलू आय), बोंब मारली (बोंबूस मारली गो), हिरवा चुरा (हिरवा चुडा), नवस फेडणे (नवस फेरणे), बंधू (बंदू), लाडाचे (लाराचे), पोकळ (पोकल), माझी (माजी), विहीर (बावी), अशी बोली भाषेची शब्दसंपदा आणि पुढील काही वाक्यांची उदाहरणे लक्षात घेता ही बोलीभाषा कोळी समूहाची आहे-

## काही बोलीतील वाक्ये:

१) 'सागर फुलून शान आयलय उधानला'
(समुद्राला फुलून उधाण आलय)

२) 'दिस मावललाय थोरासा हाय येल'
(दिवस मावळायला थोडासा वेळ आहे)

३) 'माजं मायेरचं कोन येतय कावला सकालीच काव करतय.'
(माझ्या माहेरचं कोण येतंय, कावळा सकाळीच काव करतोय)

४) 'वर्साला नवस फेरायचा हाय'
(वर्षाला नवस फेडायचा आहे.)

५) 'आंबिया बनीच्या काल्या निल्या नागा'
(आंब्याच्या बनातील काळ्या निळ्या नागा)

६) 'भंडारा भरूनशी आयची पालुखी खेलविला'
(भंडारा भरून आईची पालखी खेळविली)

७) 'लाराच्या या गो जावयाला'
(लाडाच्या या गं जावयाला.)

८) 'मोठे घरचे बोलते पोकल वास'
(मोठ्या घरचे म्हणतात ना पोकळ वासे)

९) 'तिचा मुखडा गो चंद्रावानी'
(तिचा चेहरा गं चंद्रावानी)

१०) 'लेक माजी लाराचा'
(लेक माझी लाडाची)

११) 'आकाशी गो खणियल्या बावी'
(आकाशात ग खणल्या विहिरी)

सयमक रचना, पुनरावृत्तीची लयकारी निर्मिती, समूहनिष्ठ गायन, वादन, नर्तनाची परंपरा असलेली ही लोकगीतांची रचना तिच्या भाषेमुळे वाचकांच्या व श्रोत्यांच्या कानामनाचा ठाव घेणारी आहे.

- मायंदू मायंदू तुला वारयीली गो,
- अरे जोय जोयतो जोय जोय तो,
- धावलय पावलय लय लयलय रं,
- आयली रे आयली हौलाय आयली,
- ओ नाकवा ऽ ओऽऽ नाकवाऽ,
- हिंगलाय देवी गो हिंगलाय देवी,
- आला रं आला गोविंदा आला,

यासारख्या काव्यपंक्तीतून लोकगीतांच्या लय नाद, ताल यांची आणि संगीतमय सुरावटीची जाणीव या गीतातून येते. लोकगीते हा एकत्र समूहाने सादर करण्याचा लोकगीत प्रकार असून तो नृत्य-नाट्य-अभिनयासह संगीतमय प्रकारचा आविष्कार असतो. 'कोळीगीते' त्यामुळेच त्यांच्या बोलीभाषेच्या लयतत्त्वाने आणि ढबीने सर्व महाराष्ट्रभर प्रसिद्ध पावली आहेत. त्यांची भाषिक आणि वाङ्मयीन जडणघडण ही परंपरा आणि लोकसंस्कृतीच्या लोककलांच्या अंगाने स्वतंत्र आणि आगळीवेगळी ठरते. प्रस्तुत संपादित ग्रंथामुळे कोळीगीतांचे दालनच खुले करण्यात आल्याचे जाणवते.

## स्वाध्याय :

अ) खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर आणि सोदाहरण लिहा.

१) '**लोकगीत**' या शब्द लोकवाङ्मय प्रकाराच्या आधारे कोळीगीतांचा परिचय लिहा.

२) कोळीगीतांची प्रेरणा-प्रयोजन आणि स्वरूप वैशिष्ट्ये काही उदाहरणांच्या आधारे लिहा.

३) कोळी लोकजीवन-लोकपरंपरा आणि कोळीगीते यांचा परस्पर अनुबंध तुम्ही अभ्यासलेल्या ग्रंथाच्या माध्यमातून लिहा.

४) कोळीगीतांची विविधता, त्यांची भाषिक वाङ्‌मयीन जडण-घडण सोदाहरण स्पष्ट करा.

५) कोळीगीतातील लोकपरंपरा, लोकदैवते, सण-उत्सव यांचे संदर्भ साधार लिहा.

आ) खालील टिप लिहा.

१) कोळी लोकगीते आणि लोकदैवते

२) दर्यावर्दीवृत्ती आणि कोळी लोकगीते

३) होळीगीते आणि लोकमानस

४) कोळीगीतातील प्रणय आणि भाववृत्ती

५) कोळी लोकगीतांची बोलीभाषा

६) कोळीगीतातील लग्नपरंपरा

७) कोळीगीतातील स्त्री-मानस

❖❖❖❖

# २

# मराठी लोककथा

### संपा. श्री. मधुकर वाकोडे

**- डॉ. किसन पाटील**

**प्रास्ताविकः -**

लोकसाहित्य या दोन पदात लोक आणि साहित्य अशा दोन शब्दांची जोड आहे. लेखनकलेचा शोध लागण्याआधी सर्व व्यवहार मौखिक (वाक्) परंपरेचे होते. परंतु उच्चारलेले मौखिक विचार विसरण्याची शक्यता असते. त्यामुळे पाठांतरावर भर देण्यात आला असे प्राचीन व पारंपरिक ज्ञान आणि शब्द-शरीर सर्व काही लोककलांसह जतन करण्याची रूढ पद्धती निश्चित झाली. गीत गायन, कथाकथन, सादरीकरण वगैरे यांची लोकजीवनात (समुहात) जी रूढता आणि पिढ्यानंपिढयांची भावनिकता, श्रद्धा इत्यादी सर्व लोकांचे म्हणून निश्चित झाले. लोक ही समूहवाचक संज्ञा आहे. लोकांची एका विशिष्ट प्रकारची सांस्कृतिक जडणघडण जी समूहाने झालेली असते. असा मानवी समूह म्हणजेच लोक. अशा लोकांनी परंपरेने जतन केलेले, त्यात नवी भर घातलेले आणि जुन्यात जुने तसेच नव्यात नवे जे काही शब्द व शरीर आविष्कार त्यांना लोकसाहित्य (folklore) ही व्यापक संज्ञा उपयोजिली जाते. लोकसाहित्यामध्ये लोकवाङ्मय (folk literature) हा शब्द आविष्कार मानला जातो. असा मौखिक परंपरेने, पाठांतराने तसेच विधी-पूजा-सण-रूढीच्या रूपाने पिढ्यानंपिढ्या जतन केलेला शब्द-वाङ्मयाचा विचार लोक वाङ्मयदृष्ट्या महत्त्वाचा ठरतो. लोकसाहित्याला स्थूलपणे चार विभागात अभ्यासता येते.

१) मौखिक आविष्कार
२) भौतिक संस्कृती
३) लोकरूढी, विधी, समजुती इत्यादी
४) प्रयोग सिद्ध लोककला.

यामध्ये शब्द आणि शरीर लोकसाहित्य म्हणून त्याचा वेगवेगळा अभ्यास होत असतो. शरीर माध्यमातून कृती, कला, निर्मिती, हस्तकौशल्ये, नृत्य, संगीत इत्यादींचा आविष्कार गणला जातो. विधी-पूजा-रूढी, सण-उत्सव आणि परंपरा यांचा मानवी शरीरकृतींशी संबंधित सर्व भाग शरीर लोकसाहित्यामध्ये गणता येतो. तर शब्द (वाक्) आविष्कारामध्ये लोकवाङ्याचा अभ्यास गृहीत मानला जातो. लोकवाङ्मय (folk literature) या घटकात मौखिक आविष्कारांचा शाब्दरुपातील घटकांचा विचार केला तर लोककथा, लोकगीते लोकोक्ती इत्यादींचा समावेश केला जातो.

**लोकवाङ्मय:** - १) लोककथा २) लोककथागीते ३) लोकगीते ४) लोकनाट्ये ५) लोकाक्ती प्रहेलिका, उखाणे, आहाणे, म्हणी, वाक्प्रचार, शिव्या व अपशब्द इत्यादी शाब्दरुपांचा विचार लोकवाङ्मय म्हणून केला जातो. ते मौखिक असते, परंपरा आणि नवता यामुळे ते सातत्यपूर्ण असते. पिढ्यांन्पिढ्याची निर्मिती असते. लोकसमूहाचा भावना, श्रद्धा आणि मानसाचा आविष्कार असते. लोकज्ञान, लोकरूढी, लोकोत्सव आणि लोकसंस्कृती यांच्या प्रभावातून लोकवाङ्मय निर्माण होते. ते पुढच्या पिढीला अनौपचारिकरित्या पोहचते. अशा या लोकवाङ्मयाच्या विस्तृत क्षेत्रात लोककथा (folk lale) हा महत्त्वाचा घटक लोकसाहित्य अभ्यासात खूप रूढ झाला आहे. त्याचा अभ्यास मराठी – हिंदी – इंग्रजी अशा स्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध भाषांतून सतत सुरू आहे. लोककथा ह्या जगात सर्वच प्रदेशात – भाषांत एकीकडून दुसरीकडे मौखिक परंपरा – अनुभव सृष्टी आणि निसर्गरूपांच्या, श्रद्धा – देव दैवतांच्या रूपाने प्रसारित होत आलेल्या आहेत. भारतीय साहित्यशास्त्रांत अमर या विद्वानाने प्रबंधकल्पना असे कथेचे लक्षण विशद केले आहे. कल्पनेने रचलेली व अल्पांशाने सत्य असलेली ती (गोष्ट- हकीकत) कथा होय. विचारवंतांचे म्हणणे आहे. तिला आख्यायिका ही संबोधतात. परंतु कथा आणि आख्यायिका यात भेद स्पष्ट करण्यात आला आहे. साहित्यशास्त्रज्ञ रुद्रटाने कथा ही गद्यात लिहावी असे म्हटले आहे. तर भामहाने कथा ही गद्य-पद्य दोन्ही प्रकारात असते असे मानले आहे.

**लोककथा निर्मिती:-** लोकसाहित्याचे आणि साहित्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. सत्येद्रं यांनी लोककथा निर्मितीच्या अवस्थांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.

१) आदिमानवाने सृष्टी घडणाऱ्या विविध घटनांचा घेतलेला प्रत्यय आणि मनोवस्था यांच्या संदर्भात सृष्टी व्यापाराचे ज्ञान प्रकट करणे (कथन) म्हणजे कथा निर्मिती मानले आहे.

२) सृष्टीव्यापारातील ज्ञानाचा श्रद्धा-धर्मभावना, देवत्व आणि अलौकिकत्व इत्यादींशी संबंध जोडला जातो. त्यातून भय आणि हित जोपासण्याची प्रेरणा मिळते. तर कधी कधी ज्ञानाचा विकास होऊन जीवनव्यवहारात-लौकिक जगात या निसर्ग घटनांचा मार्गदर्शक तत्त्व मानले जााते. या घटनांचे कथन लोककथा करतात.

३) दैवतांच्या कथा, धार्मिक आख्याने यांची निर्मिती श्रद्धा, ज्ञान, मनोरजंन, नीती शिक्षण इत्यादी दृष्टीने तसेच विधी-पूजा-धर्मकार्य लोककथांची निर्मिती –जतन आणि विकास झाला.

४) लोककथा मूळ स्त्रोतापासून अलग झाल्या. आणि विविध मानवसमूहात जगात विविध प्रदेशात प्रसारित झाल्यात. त्यात नवा आशय आणि बदल होत गेला. मूळकथा आणि तिची आधारित कथा मध्ये बदल होऊन त्यांचा आशय, विधी, स्वरूप इत्यादी मध्ये बदल घडत गेला. त्यांचा संबंध तुटला.

५) पिढ्यान्पिढ्या लोककथा परंपरेने जतन केल्यामुळे समाजमनाशी त्या एकरूप झाल्या. त्यापेक्षा काही नवनवा संदर्भ व आशय घेऊन लोककथा निर्माण झाल्यात. या पाच अवस्थांतून लोककथा पुढे आल्यात.

**मॅक्समूरचे मत:-** अभ्यासक मॅक्समूल्लर यांच्यामते “दैवतकथा या भाषेच्या अशुद्ध आणि चुकीच्या व्युत्पत्तीतून जन्मल्या आहेत.”

**फ्रॉईडचे मत:-** अभ्यासक मानसशास्त्रज्ञ फ्रॉईड यांच्यामते. "दैवतकथांतील प्रतीके-मूळ निसर्गातील विविध घटना नसून मानवी मनातल्या असफल आणि दबलेल्या कामप्रेरणा आहेत."

**कालयुंगचे मत:-** अभ्यासक कार्ल युंग यांच्यामते "मानवी मनातील सामूहिक नेणिवेत असलेल्या काही आदिप्रतिमा कथांच्या रूपाने प्रकट होत असतात."

असे असले तरी ऐतिहासिक-भौगोलिक संप्रदायाचे अभ्यासक लोककथांच्या निर्मितीचा संदर्भ ऐहिक-वस्तुनिष्ठ आणि ऐतिहासिक-भौगोलिक घटनांशी जोडतात. सामाजिक, सांस्कृतिक संचित म्हणून 'लोककथा' ही मानवी इतिहासाची जडणघडण असू शकते. 'वीर' पुरुषांच्या, कुळ पुरुषांच्या आणि मातृशक्ती दैवतांच्या कथा या अशाच प्राचीन घटना असतात. बऱ्याचदा त्यामध्ये 'सत्य' कमीच असते आणि शर्करावगुंठीतवरचा पसारा हा मानवी मनाचा (लोकमानस) आविष्कार असतो.

**भारत लोककथांची भूमी:-** भारत ही लोककथांची (जागतिक) जन्मभूमी मानली जाते. सर्व कथांचे मूळ सूर्यकथा असून त्या जगातल्या सर्वच देशांत व भाषांत आढळून येतात. भारतीय लोक कथाप्रिय मानले जातात. भारतीय लोकांना धार्मिक व ऐतिहासिक तसेच विविध विषयांचे ज्ञान देण्यासाठी 'ऋत्विज' कथा सांगत असत. वैदिक वाङ्मयात अनेक कथा असून त्या धार्मिक, विधीविधान, समाज-संस्कृती आणि दैवतांच्या संदर्भात प्रचलित आहेत. संवादसुक्ते, महाकाव्ये, महानाटये, बौद्धायन, हरिवंश, विष्णुपुराण, कथासरित्सागर, पंचतंत्र, अरेबियन नाईटस बृहत्कथा, हितोपदेश, वेताळपंचविशतिका, सिहांसनबत्तीसी, शुकसप्तती, बौद्धजातककथा, जैनचुर्णी, अशा कितीतरी प्राचीन कथाग्रंथाचे संदर्भ भारतीय लोककथेची समृद्धी (परंपरा) मांडतात.

**लोककथांचे अंतरंग:-** लोककथांच्या अंतरंगाचे प्रमुख चार घटक मानले जातात.

१) कथेतील व्यक्ती
२) कथेची अभिवृद्धी
३) अभिवृद्धीसाठी पूरक साधने
४) संकीर्ण असे चार घटक असले तरी त्यांचे पुन्हा वर्गीकरण करता येऊ शकते.

डॉ. दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रुपरेखा' या ग्रंथात त्याचा स्वतंत्र आराखडा दिला आहे. अनेक अभ्यासकांनी लोककथा (folk tales), पराक्रम कथा (Hero tales), लोककथागीत (Ballods), स्थानसंबंधी दंतकथा व आख्यायिका (Local Legends), प्राणीकथा (Animal tales), परिकथा (Marchen), पारंपरिककथा (Traditional), नीतिकथा (Fables), दैवतकथा (Myths), रुपकथा (Supernatural tales), हास्यकथा (Humeroces tales) व्रतकथा (Religious tales), गीतकथा (Nursery tales) असे कथांचे अनेक प्रकार संबोधले आहेत.

**लोककथांचे वर्गीकरण:-** मराठी लोककथांचे स्वरूप लक्षात घेता त्यांचे स्वरूप आणि वैशिष्ट्यानुसार केलेले वर्गीकरण पुढीलप्रमाणे लक्षात येते.

१) दैवतकथा

२) परिकथा किंवा अदभुत कथा

३) उत्पत्तिकथा-स्पष्टीकरणात्मक कथा

४) दंतकथा आणि आख्यायिका

५) बोधकथा किंवा प्राणिकथा

६) हास्यकथा

७) वीरकथा-पराक्रमकथा

८) अनुभवकथा

यापैकी सर्वच कथाप्रकारांचे आणखी वर्गीकरण करता येऊ शकते. या सर्व लोककथांमध्ये प्रामुख्याने पुढील घटक दिसून येतात. कथेतील पात्रे, कथेची अभिवृद्धी, अभिवृद्धीला पूरक साधने, संपूर्ण घटना या चार घटकांचा समावेश लोककथेत असतो. या शिवाय लोककथेतून पुढील गोष्टींचा अंतर्भाव असतो.

**लोककथास्वरूप-वैशिष्ट्ये: -**

१) लोककथेच्या मूळाशी असलेले लोकमानस, जीवनदर्शन, लोकस्वभाव यातून व्यक्त होणारे प्राचीन लोकसंस्कृतीचे अवशेषरूप लोककथेतून प्रकट होते.

२) लोककथा ही कोणत्याही एका कथारुपातून (प्रकार) साकार होत असते.

३) लोककथेतून मानवी, अतिमानवी (अतिंद्रिय) अशा विविध प्रकारच्या व्यक्ती, प्राणी, संमिश्र अवस्था अशी पात्रे (व्यक्तिरेखा) आढळून येतात. काही गौण पात्रेही असतात.

४) लोककथेतून अनेक कल्पनाबंध (Motif) असतात. हे कल्पनाबंध अनेक कथांत सारखे असू शकतात. रचना मात्र प्रत्येक कथेत वेगळी असू शकते.

५) घटना (प्रंसग) हा लोककथेतील महत्त्वाचा घटक मानला जातो.

६) बऱ्याच कथा समान कथाबीज असते. त्याला मूलकथा म्हणतात. कथाबीजाभोवती घटना, कल्पनाबंध, व्यक्तिरेखा (पात्रे) ही प्रदेश परत्वे-देशपरत्वे बदलू शकतात. मात्र मूलकथा / कथाबीज बदलत नाहीत.

७) कथेतून वातावरणनिर्मिती, वर्णने, चित्रमयता, यांचा सुरेख वापर केला असल्याने ती कथनसुलभ होते.

८) कथेची निवेदन शैली ही कथानिवेदनाचे भाषिक-सौंदर्यपूर्ण अंग मानले जाते. परिणामकारकता त्यामुळे साधली जाते.

९) कथाहेतू हा लोककथेचा महत्त्वपूर्ण घटक मानला जातो. हेतुकथा ही श्रद्धाशील असते.

**दैवतकथा- हेतुकथा: -**

विशेषतः दैवतकथा या हेतुकथा असतात. या कथा निर्मितीचा काही विशिष्ट हेतू असतो. लोकशिक्षण, आदेश देणे, गूढ व अनाकलनीय गोष्टींचे स्पष्टीकरण देणे, लोकदैवतांचे

महत्त्व आणि नीतीमूल्ये जोपासणे असे विविध हेतू असतात. डॅनहार्ट या अभ्यासकाने कथांच्या निर्मिती मागे कोणते हेतू व स्पष्टीकरणे असतात याची नोंद घेतली आहे.

१) निसर्गातील घटनांचे व घडामोडींचे स्पष्टीकरण

२) प्रचलित आचार-रूढींचे स्पष्टीकरण

३) निसर्ग-ऋतुबदल, हवामान वगैरे बदलाचे स्पष्टीकरण.

४) समाजाला नीतीमूल्ये, आचारधर्म-नियम शिकविणे.

५) एखाद्या बाबीचे (घटकाचे) मूळ शोधण्याचा प्रयत्न.

६) एखाद्या घटनेची आठवण सतत जागती ठेवणे.

७) एखादी गूढ घटना-गोष्टीचे स्पष्टीकरण.

८) एखादे स्थान-वस्तू-व्यक्ती यांचे माहात्म्य वर्णन.

भारतात आणि महाराष्ट्रात कथावाचन, कथाकथन, कीर्तन, लोककथागीत गायन, पोथीपुराण कथांचे सप्ताह आणि लोककलावंतांचे सादरीकरण याद्वारे कथा प्रचलित राहिल्या. त्यांचा प्रसार होत आला. सूत-मागध, चारण, लवकुशी, भाट, गोंधळी, शाहीर, दशावतारी खेळ नमन पद्धती यांनी लोककथा आणि लोककथागीतांचे संकलन, संवर्धन आणि जतन केले आहे. स्त्रियांनी (आजीबाई) लोककथांचा हा खजिना पुढच्या पिढ्यांना देत अनौपचारिक शिक्षणाचा मार्ग पिढ्यान्‌पिढ्या जतन केला आहे. रामायण, महाभारताच्या तसेच पुराणातील अनेक कथांच्या जतन-संवर्धनाचे काम सतत होत आले आहे. त्यातूनच लोकरामायण, लोकमहाभारतातील वेगळेपण लोकसंस्कृतीचा वेगळा ठसा उमटवणारे ठरले आहे. मराठी लोककथांचा अभ्यास करायचा तर भारतीय परंपरेतील वरील सर्व कथांचा व्यापक विचार केला जातो. वेद, पुराणे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, जातककथा, जैनकथा, पंचतंत्र आणि इसापनिती, वेताळपंचविशी, अरेबियन नाईटस, बिरबलकथा लोकचरित्रातील दृष्टान्त कथा, इत्यादी सर्व प्रकारच्या कथांचा व विविध भाषेतील प्राचीन कथांचा मागोवा घ्यावा लागतो. पिढयांनपिढया ही प्रादेशिक, भाषिक, सांस्कृतिक आदानप्रदान करण्याची प्रक्रिया खूप मोठी आहे. त्याचा प्रभाव मराठी लोककथा निर्मितीवर झालेला आहे.

**<u>मराठी लोककथा</u>:-** साहित्य अकादमी, नवी दिल्ली या संस्थेने प्रकाशित केलेले आहे. डॉ. मधुकर वाकोडे यांनी संकलित करून संपादन केलेले 'मराठी लोककथा' हे पुस्तक अभ्यासकांना प्रेरणादायी करणारे आहे. या ग्रंथाचा परिचय करून घेऊन त्यातील प्राचीन अशा विविध कथांचा अभ्यास करता येणे महत्त्वपूर्ण ठरावे. या ग्रंथात डॉ. मधुकर वाकोडे यांनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना दिली असून ती मराठी लोककथेच्या व्यापक स्वरूपाचा आणि अभ्यासविषयक भूमिकेचा सखोल विचार मांडणारी आहे. विविध कथांचे संकलन करून त्यांनी पूर्वाध आणि उत्तरार्ध असे दोन भाग केले आहेत. पूर्वार्धात ग्रंथानिविष्ट लोककथांची निवड आणि उत्तरार्धात मौखिक लोककथा निवडलेल्या आहेत. लोककथेच्या समृद्ध, विपुल भांडारातले हे निवडक धन केवळ ३४ संख्येत मर्यादित केले आहे. आपल्या अर्पणपत्रिकेत डॉ. वाकोडे यांनी मर्यादित केले आहे. आपल्या अर्पणपत्रिकेत डॉ. वाकोडे यांनी

फोडिले भांडार। धन्याचा हा माल।

मी तव हमाल। भार वाही!! (तुकाराम)

संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आधार घेऊन आपली मर्यादा सुस्पष्ट केली आहे. कथेच्या या समृद्ध भांडारातून निवडक मोती वेचून त्यांच्या संकलन-संपादनाचे महत्त्वपूर्ण कार्य घडले आहे याची यथार्थ जाण त्यांना आहे.

**लोककथांच्या व्याख्या:-** डॉ. वाकोडे यांनी कथेच्या काही व्याख्या सहजपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे लोककथा ही लोकांनी, लोकांची, लोकांना सांगितलेली कथा असे त्यांचे मत आहे.

१) "रंजलेल्या गांजलेल्या आबालवृद्धांची व्यथा दूर करणारी खरी संजीवनी म्हणजे कथा."

२) "त्रितापांच्या तप्त वाळवंटातून रखडत चालणाऱ्या सांसारिकाला घटकभर विसावा देणार मरुद्यान म्हणजे कथा."

३) "बालकांना चंदेरी दुनियेत नेणारी नि म्हाताऱ्यांना तारुणाचा आठवण करून देणारी मंजुषा म्हणजे कथा."

४) "माणसां इतकीच देवांनाही प्रिय असणारी गोष्ट म्हणजे कथा."

५) "ऋग्वेदपूर्व काळापासून आजतागायत खळाळत वाहत आलेली लोकगंगा म्हणजे लोककथा."

लोककथेच्या या व्याख्या मांडून डॉ. वाकोडे यांनी कथेतील लोक (Folk) आणि तत्त्व (Element) यांचा पट सुस्पष्ट उभा केला आहे. कथेची हेतूवादी दृष्टी, कथेची मनोरंजनाची भूमिका, कथेची पवित्रता, धार्मिक श्रद्धाशीलता, प्राचीनता आणि लोकभिमुखता यांचा लोकपरंपरेतील अनुबंध त्यांनी मांडला आहे.

**लोककथेची रंजन व बोध प्रकिया:-** आदिमकाळापासूनची तिची निर्मिती नैसर्गिक घटितांच्या रूपाने भय कारी कशी ठरावी. झाडी-झुडपे-पशू-पक्षी अशा विविध रूपांना गोजारणारी ठरली. कहाणी, चिटुकला, आख्यायिका, गोष्ट नि कथा अशा विविध रूपाने ही लोककथा अवतरली आहे. लोककथा ही लोकांचे रंजन-उद्‌बोधन करते. आर्ष महाकाव्याची तिला परंपरा आहे. रानावनातून, डोंगरदऱ्यातून आणि गावा शिवारातून भटकत राहाणं हा तिचा स्वभाव आहे. तिला देश, प्रांत, जात-धर्म यांपैकी कोणीही थोपवू शकले नाही; इतकी ही लोककथा प्राचीन पारंपरिक आणि प्रवाही आहे. भटकंती हा लोककथेचा जीवनधर्म आहे. ही भारतीय लोककथा जगभर प्रसार पावली. सर्व प्राचीनकथा प्रथम भारतात जन्माला आल्या आहेत. जागतिक लोककथांची जन्मभूमी भारत आहे. असा सिद्धान्त मॅक्समूल्लर यांनी मांडला. थिओडोर बेनफे यांनी याच सिद्धान्ताची पाठराखण केली आहे. अशा या जागतिक किर्तीमान पावलेल्या भारतीय लोककथेचा वारसा पर्यायाने मराठी लोककथा प्रवाहाकडे आपोआप चालत येतो. कारण एकूण भारतीय भाषांतील आणि सर्वच प्रदेशातील लोककथा या भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात. असे डॉ. वाकोडे यांना वाटते.

प्रस्तावनेतून त्यांनी लोकगंगा आणि लोककथा या घटकातून नदी आणि लोककथा यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला आहे डोंगर, वने तुडवीत जशा नद्या वाहतात, त्याचप्रमाणे लोककथा ही प्रवाहित झाल्या आहेत. लोककथेचा स्वभावही लाघवी, लवचीक असतो. ती सर्वच प्रदेशात, भाषांत, धर्म-वंशात प्रवाहीपणे स्वीकारली जाते. "उत्तम लोककथा ही कोणत्याही देशाची कायमची कधीच नसते, ललितकथेसारखी ती कोणा एकाची नसते; ती लोकांची असते..." अशा प्रकारे नदीचे (लोकगंगा) प्रवाहीपण आणि लोककथेचा खळाळ यांचे अतूट नाते त्यांनी मांडले आहे.

व्यक्ती तितक्या अभिव्यक्ती या घटकातून त्यांनी लोककथेच्या भाषिक-प्रांतिक विविधतेचा परिचय करून दिला आहे. कथेचा मूळ गाभा कायम ठेवून विविध लोक आपल्या खास शैलीत कथेचा विस्तृत पट मांडतात. मूळकथा मात्र विश्वात्मक राहाते. मानवता जशी विश्वात्मक तशीच! 'कथा कथकांची प्राचीन परंपरा' आपल्या देशात असून सूत-भाट, चारण, भागवतकार, ग्रामीण कथाकथकांची एक अखंड परंपरा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. 'कुशीलव' कथाकथक (आख्यानक) यांची परंपरा त्यांनी सांगितली आहे.

कथा ही श्रवणशील असते ती श्रवण करणे ही केवळ मनोरंजनाची बाब नसून ती धर्ममूलांशी निगडित आहे.

कथा श्रवण करणे म्हणजे पुण्य जोडणे, पापक्षालन करणे, स्त्रीव्रतांची सांगता कथाश्रवणाने केली जाते. भागवत कथा ऐकण्यासाठी लाखो लोक जमतात. कथेची ही लोकप्रियता आणि लोकाभिमुखता धार्मिक, श्रद्धाशील आणि परंपराप्रिय अशीच आहे याचे चिंतन त्यांनी मांडलेले आहे.

**पूर्वार्धः -**

ग्रंथनिविष्ट लोककथाः - प्रस्तुत कथा संकलनाचे संपादकानी दोन भाग केले असून ग्रंथनिविष्ट लोककथा या विभागात एकूण पुढील तेरा कथांचा समावेश करण्यात आला आहे.

१) उर्वशी (वेदकथा), २) अहिल्येचा भाळी होणे आले शिळा (रामायण कथा– बालकांड), ३)सहा सुळ्यांचा नागान (जातक कथा), ४) आळसाने गाठला कळस (महाभारत कथा- शांतीपर्व), ५) सुकेत श्रेष्ठी आणि नागदत्त श्रेष्ठी (जैन कथा), ६) होळी रे होळी (पुराणकथा), ७) किती कुटील त्या कुंटीणी (कथा सरित्सागर), ८) विक्रमादित्य आणि वेताळ (वेताळ पंचविशी), ९) पुतळी एकोणिसावीः सुलोचना (सिंहासनबत्तीशी), १०) तोतयाची कामगिरी (पंचतंत्र), ११) गाणारा पक्षी आणि दर्दी गुलबक्षी (अरेबियन नाईटस), १२) कोल्ह्याने केली चतुराई (इसापनिती), १३) चांडाळ चौकडी आणि बिरबलाची खिचडी (बिरबल कथा).

या कथांच्या समोर कसांत कथांचा मूलस्त्रोत असलेल्या विविध ग्रंथाची नावे देण्यात आली आहेत. वेदकालापासून, रामायण, महाभारत, बौद्ध जातककथा, जैनकथा, पुराणकथा, कथा सरित्सागर, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तीशी, पंचतंत्र, अरेबियन नाईटस, इसापनिती, बिरबलाच्या कथा अशा विविध ग्रंथात निविष्ट कथांचा हा धावता-नमुनेदार संग्रह अभ्यास करताना लोककथेच्या विविध अंगांचा संदर्भ घेऊन येतो. प्राचीन, वेदकालीन, पुराणकालीन आणि थेट मोगलकालीन अकबर-बिरबलाच्या चातुर्य कथांपर्यंतचा हा कथेचा वैविध्यपूर्ण प्रवास या कथांच्या संग्रहातून अभ्यासता येतो.

**१) 'उर्वशी'** (वेदकालीन कथा) ही कथा प्राचीनतम असून तिच्यात दोन संदर्भ लक्षात घ्यावे लागतात. या कथेत चंद्र, बृहस्पती, तारा, शुक्राचार्य, शंकर-पार्वती अशी व्यक्तिरेखांचा संदर्भ निसर्गरूपकांशी येतो. गुरु, चंद्र, तारा, शुक्र आणि बुध ह्या ग्रहांचा आणि मानवी मनातील गूढतेचा संबंध लक्षात घ्यावा लागतो. ब्रह्मदेव, इंद्रदेव असूर आणि पुरूखा यांच्या युद्धाचा आणि दैवतकथांचा अभ्यास करण्यासारखा आहे. स्वर्ग-पृथ्वीवरील जीवनाची कल्पनारम्यता, लोकमानस-श्रद्धांचाही पेरणी या कथेत आहे. च्यवन ऋषींच्या मांडीतून जन्मलोकी (सुंदर अप्सरा म्हणजे उरुजन्मा-उर्वशी आहे. उर्वशी आणि पुरु यांच्या संसाराची अपूर्ण कहाणी म्हटले तरी चालेल. कारण उर्वशी फक्त काही काळ पृथ्वीवर रमते. स्वर्गस्थ इंद्राच्या दरबारातील ही अप्सरा आणि पृथ्वीवरचा राजा, पराक्रमी शूरवीर यांची ही कथा लौकिक आणि पारलौकिक जीवनाच्या संदर्भात भाष्य करणारी कथा आहे. पाप-पुण्य, संसार-भोग, साजशृंगार आणि भौतिक-आध्यात्मिक अशा परस्परविरोधी जीवन-संघर्षाच्या वर्णनाने रमणीय झालेली ही कथा आहे. स्वार्थ, राग, लोभ, सत्तापिपास, प्रेमभंग, अशा विविध भावभावनांचा सुंदर गोफ विणून ही प्राचीन कथा वेदकालीन नीतीमूल्ये, प्रपंच आणि लोकजीवनाचा संदर्भ घेऊन येते. मानवी मनातील आसक्ती आणि स्त्रीसुख लोलुपता आणि कामजीवनाच्या प्राचीन अशा विचारांची ही निर्मितीकथाच आहे. तशीच ती हेतूकथा आहे. स्वप्नभंग आणि वास्तवजीवन, जीवनाची क्षणभंगुरता आणि शाश्वत मूल्यांचे चिरंतन तत्त्व याचे विश्लेषण या कथेतून होते. निसर्ग रूपकांच्या बाजूने ही आदिम कथा आहे तर निर्मिती व हेतूविषयक स्पष्टीकरणाच्या बाजूने ही लौकिक जीवनाचे नीतीमूल्ये शिक्षण देणारी कथा ठरते. या कथेतील गूढता ही लोकमानस, लोकश्रद्धेचा विषय आहे. अनाकलनीयता आणि गूढतेबरोबरच लौकिक-भौतिक जीवनाचे स्पष्टीकरण ही कथा देते पुरुखा आणि उर्वशीच्या एकरात्रीच्या मीलनातून जन्मलेला 'आयु' हा पुत्र आहे. ही मानवाच्या निर्मितीची कथा वाटते.

**२)'अहिल्येच्या भाळी होणे आले शिळा':-** (रामायण) ही कथा रामायणकालीन बालकांडातील कथा आहे. वाल्मिकी ऋषींनी रचलेल्या कथांतील ही एक कथा! श्रीरामाच्या पदस्पर्शाने शिळा झालेल्या अहिलेच्या उद्धाराची ही कथा आहे. श्रीराम आणि विश्वमित्र यांच्या भेटीत गौतममुनींच्या आश्रमाला आलेल्या उतरत्या कळेचा उल्लेख या कथेत येतो. श्रीराम दैवतांच्या लोकमानसातील श्रद्धापूर्ण स्थानाचे अबाधित्व ही कथा मांडते. राम हे लोकदैवत! या दैवतांच्या धार्मिक माहात्मतेचे प्रतीक कथेत येते. याशिवाय इंद्राची भोगलालसा अहिलेचा व्यभिचार आणि कामतुरता ही मानवी मनातला सनातन खेळ आहे. गौतमऋषींनी इंद्राला दिलेला शाप, विषयसक्त प्रवृत्तीची निर्भत्सना, अहिल्येला शिळा होऊन पडण्याचा दिलेला शाप या शापवाणीचे संदर्भ नीतीमूल्ये आणि जीवनविषयक चिंतनाचे व्यापक मानवी मूल्ये ठरतात. गौतमाने अहिल्येस शाप देताना श्रीरामाच्या पदस्पर्शाने तू पून्हा उद्धारित होतील हा दिलेला उःशाप या सर्वच घटनांची मालिका ही गूढता, अनाकलनीयता, प्राचीनता आणि हेतूकथनाची नैतिकता या दृष्टीने या कथेत आलेली आहे. कामरूपी अंधःकाराने क्षणिक सुखासाठी भाकलेल्या साध्वी अहिल्येचे जीवन शिळामय होणे – ही पापपुण्याची आणि नैतिक आचारधर्माची शिकवण या कथेत आहे. ही कथा रामायणकालीन असली तरी मराठी लोकमानसातही तिचे स्थान चिरंतन असेच आहे. शापवाणी आणि उःशापवाणी या पारलौकिक कल्पनांचा मागोवा घेत- जीवनाकडे सात्विक भावनेतून पाहावे असे शिक्षण देणारी ही नीतिकथा आणि दैवतकथा आहे. "अहिल्येच्या भाळी शिळा होण्याची" ही क्रिया नशीब आणि दैववादी परंपरेतील विचार स्पष्ट करणारी ठरते. मराठी भाषेतील सौंदर्य आणि लोकमनाचा आविष्कार या कथेत जाणवतो.

श्रीराम आणि विश्वामित्र, गौतमऋषी या व्यक्तिरेखातून विभूतीपूजा कथन केली जाते. धर्मविचारांची प्रस्थापना होते. मनोरंजनासोबतच बोधप्रद अशी ही कथा आहे.

३) **'सहा सुळ्यांचा नागानन:-** (जातककथा) हिमालयाच्या सान्निध्यातील सहा सुळे असलेल्या नागानन (गजराज) या राजाची ही कथा. त्याच्या दोन राण्या मोठी सुभद्रा आणि धाकटी सुभद्रा यांच्यातील स्त्रीसुलभ सवती मत्सराचा संदर्भ या कथेत आहे. मोठी शांत-संयमी, पोक्त तर धाकटी अल्लड, मत्सरी, हट्टी स्वभावाची दाखवली आहे. 'शालक्रिडा' करीत असताना गजराज शालवृक्षास धडक मारतो. मोठीच्या अंगावर फुलांचा खच पडतो तर धाकटीच्या अंगावर पाला-पाचोळा पडतो. ती मत्सराने पेटून उठते. नऊ हजार नऊशे नऊ हत्तींचा कळप नागाननाच्या सेवेला असतो. महास्नानानंतर सरोवरातील एक महापद्म (कमळ) गजराजास अर्पण केले जाते. त्याचे काय करावे ? असा प्रश्न नागाननास पडतो. तो मोठ्या सुभद्रेला ते देतो. धाकटी सुभद्रा हिरमुसते "हा सवतीचा ताप नको... यापेक्षा मरण काय वाईट ?", असे विचार तिच्या डोक्यात येतात. ती प्रायोपवेशन (उपवास) करून ती पुढच्या जन्म राजकुळात व्हावा तसेच काशी राजाशी आपला विवाह व्हावा आणि त्याची पट्टराणी होऊन ह्या गजराजाचे सुळे आणीन तेव्हा मनाला शांती लाभेल अशी ती मागणी करते. प्रायोपवेशनाने ती खंगते. शेवटचा श्वास सोडते.

धाकटी सुभद्रेचा पुर्नजन्म मद्र देशाच्या राजा-राणीच्या पोटी होतो. पच्चेकबुद्धांच्या कृपेनं ती मोठी झाल्यावर तिचा विवाह काशी राजाशी होतो. ती राजाला आपल्या स्वप्नातील हत्तीचे सहा सुळे हवे असल्याचा आग्रह धरते. सोणुत्तर शिकारी सात वर्षे सात महिने सात दिवस हिमालयात फिरून नागाननाचा शोध घेतो. त्याची भगवी वस्त्रे (काशायवस्त्रे) पाहून गजानन त्याचा आदर करतो. सोणुत्तर शिकारी नागाननाला सर्व वृत्तांत कथन करतो. आपल्या धाकट्या पट्टराणी सुभद्रेने आपल्यावर असा वचपा काढला याची खंत नागाननाला होते. 'स्त्री हट्ट' आणि सवती मत्सराचा हा परिणाम आहे. गजराज सोणुत्तराला सुळे कापण्यास सांगतो. महासत्त्व (नागानन) प्राण सोडतो. सुळे घेऊन शिकारी महाराणीस अर्पण करतो. पूर्वीच्या जन्मातल्या स्वामीचे ते सुळे मांडीवर घेऊन सुभद्रा रडू लागते. 'महासत्त्व' असा टाहो फोडून ती प्राण सोडते.

या कथेतून जातककथांतील (बौद्ध) नागानन (गजराज) हा बोधिसत्वाच्या रूपातला राजा आहे. त्या ज्ञानी राजाचे खरे प्रेम धाकट्या राणीला कळलेच नाही. "हे बाह्य सुळें काय कामाची ? ज्ञानाचे सुळे हेच खरे सुळे! पुढील जन्मी मला सहा सुळे नाही लाभले तर चालतील पण ज्ञानाचे दोन सुळे लाभून मी धन्य होईन!" ज्ञान आणि अज्ञान, प्रेम आणि सवती मत्सर, लौकिक आणि अलौकिक ज्ञानाबरोबरच श्रद्धा-भक्तीचा संदेश देणारी ही जातककथा आहे. मत्सर म्हणजेच अज्ञान! स्त्रीहट्ट हा अज्ञानाचे प्रतीक आहे. हेच या जातककथेचे मर्म आहे.

४) **'आळसाने गाठला कळस':-** (महाभारत- शांतिपर्व) महाभारताच्या शांतिपर्वातील ही प्राणकथा म्हणजेच एक बोधकथाच आहे. आळसी उंटाची ही कथा कृतयुगातील असून अतिशहाण्या उंटांच्या तपाची आणि त्याच्या दीडशहाणपणामुळे होणाऱ्या सर्व नाशाची कथा आहे. उंटाच्या तपाने ब्रह्मदेव संतुष्ट होतो. उंटाला वरदान देतो. संपूर्ण वाळवंटात सहजतेने पोहचू शकेल अशी चारशे कोसांची लांब मान त्याला वरातून प्राप्त होते. एका ठिकाणी बसून चारशे कोसावरील फेरफटका यामुळे उंट आळसावला. एकदा प्रचंड वादळवारा सुटला. चारशे

कोसावरील मान उटांने संरक्षणासाठी गृहेत घातली. वादळापासून बचावला पण भुकेने व्याकूळ कोल्ह्याने गृहेत उटांवर ताव मारला. त्याचे कचाकच लचके तोडले. चारशे कोसावरील उंटाला याची जाणीव खूप उशिरा झाली. मान वाचवण्याची त्याची धडपड व्यर्थ गेली. कोल्ह्याने आणि त्याच्या कुटुंबाने त्याच्या मानेचा फडशा पाडला. तृप्त ढेकर देऊन कोल्हा सुखी झाला. आळसामुळे उंट प्राणास मुकला! या कथेतून उंटाची प्रतिमा ही आळसी राजाला (माणसाला) केलेला उपदेश आहे. 'प्राणी' हे बोधकथेत प्रतीकात्मक येतात. लबाड कोल्हा, (बुभुक्षित कोल्हा) हे असंतुष्ट माणसांचे प्रतीक आहे. शरीराने गलेलठ्ठ आणि मेदूंने मठ्ठ झाला. सुस्तावला, आळसाने कळस गाठला. वरदान प्राप्त झाल्यावर तपाचा विसर पडतो. उंट आळसी होतो ही कथा अशा बुद्धीचे वरदान लाभलेल्या माणसाला बोध देणारी कथा आहे.

**५) सुकेत श्रेष्ठी आणि नागदत्त श्रेष्ठी:- (जैनकथा)**

जंबूद्वीपावरील वसुपाल नावाचा निर्मोही राजा राज्य करीत असतो. त्याच्या राज्यात सुकेतु श्रेष्ठी हा जैनधर्मीय श्रद्धाळू व्यापारी होता.नागदत्त श्रेष्ठी या लोभी स्वार्थी व्यक्तीने बनविलेल्या उद्यानात नागभवन होते. त्यामध्ये 'अतिथिसंविभाग व्रत' करण्यासाठी सुकेतुश्रेष्ठी जातो. सुकेतुच्या पुण्याईने या ठिकाणी रत्नमाणिकांची वर्षा होते. उद्यानाचा स्वामी नागदत्त याला धनलोभ उत्पन्न होतो. त्याच्या तोंडाला पाणी सुटते. या सर्व संपत्तीची मालकी जबरदस्तीने नागदत्त स्वतःकडे घेतो. पुन्हा एक चमत्कार घडतो. नागदत्ताच्या पेढीवरील सर्व रत्न-माणके पूर्ववत त्याच ठिकाणी येऊन कोसळतात. त्यामुळे नागदत्त संतापतो. तो मत्सरी असल्याने सर्व रत्ने फोडून टाकण्याचा निर्धार करतो. एक रत्न फोडताना ते उसळते आणि नागदत्ताच्या डोक्यावर आदळून कपाळी खोक पडते. त्याचा हा स्वभाव पाहून देवांना वाईट वाटते. त्याचे नाव मणिनागदत्त ठेवण्यात येते. ही संपत्ती आपणास मिळत नाही म्हणून रागावलेला नागदत्त वसुपाल राजास जाऊन सांगतो की, "नागभवनासमोर रत्नांची रास पडली आहे ती रत्ने राजभांडारात आणून ठेवावी."

राजा मोठा न्यायी आणि निर्मोही होता. तो रत्नांचा स्वीकार करत नाही. नागदत्ताच्या आग्रहामुळे राजाने ती रत्ने आणून घेतली. परंतु पुन्हा चमत्कार म्हणजे ती सर्व रत्ने पुन्हा कोसळून पडली. राजाला आश्चर्य वाटते. खरा वृत्तांत समजतो. वसुपाल राजा सुकेतुची क्षमा मागतो. मुर्ख नागदत्ताचा खोटेपणा उघड होतो. नागदत्त संतापतो. सूड भावनेने पेटून उठतो. तो नागभवनात अनुष्ठान मांडतो. त्याच्या कामज्वराने पछाडलेला आणि मागावी यक्षिणीच्या प्रेमात खंगून मेलेल्या भवदत्त नावाच्या मुलाची आठवण करतो. हाच भवदत्त मरणोत्तर उत्पलदेव झालेला असतो. नागदत्ताचे (वडिलांचे) अनुष्ठान पाहून तो प्रकट होतो. व्रत कशासाठी? असा प्रश्न विचारतो. सुकेतुची श्रीमंती पाहून मला क्लेश होतो. त्याची संपत्ती मला मिळवून दे असे नागदत्त म्हणतो.

सुकेतु धर्मशील-निर्मोही आहे याची जाणीव उत्पलदेवास होती. तो वडिलांना म्हणतो - "सुकेतु पुण्यवान आहे तू पुण्यहीन." मी त्याची संपत्ती तुला देणार नाही. मग मत्सरी नागदत्त म्हणतो - "त्याला मारून तरी टाक." त्यावर उत्पल देव म्हणाला - "तो निरपराध आहे. त्याला कसे मारू?"

शेवटी बापाची तडफड पाहून उत्पलदेव त्याला एक उपाय सुचवतो. माकडाचे रूप धारण करून मी सुकेतुकडे जाईन. नागदत्त उत्पलदेव (माकड रुपात) सुकेतुला सोपवतो. हे

अद्भूत माकड सुकेतु ठेवून घेतो. तो माकडाला आज्ञा करून गावाबाहेर जिन मंदिरांनी युक्त अशी सुंदर राजनगरी बांधून घेतो. तसेच सुकेतु पती पत्नीस राज्याभिषेक करून गंगाजलने न्हाणून घेतो. मोठा उत्सव त्या माकडाकडून सुकेतु साजरा करून घेतो.

आपल्या श्रीमंतीमुळे द्वेष करणाऱ्या मत्सरी नागदत्तास शाश्वत संपत्ती देऊन टाकण्याचा आदेश सुकेतु माकडाला देतो. सुकेतु बुद्धीमान, शांतचित्त असल्यामुळे तो संपत्तीच्या मोहात पडत नाही. संपत्तीचा त्याग करतो. शेवटी माकडास तो शेवटचा आदेश देतो, "माझ्या महालसमोर मल्लखांब गाड आणि पुढील आज्ञा मिळेपर्यंत खांब्यावर चढ-उतार चालू ठेव." शेवटी या क्लेशामुळे कंटाळलेले माकड एके दिवशी पळून जाते. सुकेतु आनंदाने संसार करू लागतो.

या जैनकथेतील धार्मिकता, शाश्वतमूल्ये, श्रीमंतीची खरी कल्पना आणि लोभ-स्वार्थ मोहमाया यापासून दूर राहण्याची लोकशिक्षणाची परंपरा सांगितली आहे. विरक्ती ही जैन धर्माची शिकवण असून 'जिनदीक्षा' या विधीचे उन्नयन करणारी व महत्त्व प्रतिपादन करणारी ही कथा आहे. नागदत्त लोभी, स्वार्थी-मत्सरी तर सुकेतु शांत, संयमी, निर्मोही असा जिनभक्त या कथेत आहे. ही बोधकथा, दैवतकथा आणि संस्कार कथाच आहे. माकडाचे प्रतीक हे चंचलता आणि विक्षिप्तपणाचे उदाहरण असून नागदत्त श्रेष्ठी हा मूर्ख-मतलबी माणसाचा नमुना ठरतो. जैनधर्मियांच्या भावना, श्रद्धा आणि शाश्वत मूल्यांचा पुरस्कार करणारी ही बोधकथा आहे.

**६) होळी रे होळी!: - (पुराणकथा)**

आर्यवर्तातील लोक चंद्रपूजक ते पोर्णिमेला शिमगा साजरा करीत. राजा हिरण्यकश्यपूला हा देवधर्म आणि विष्णूचा घोष आवडत नाही. त्याच्या आज्ञेने शिमगा थांबतो. त्याचा मुलगा प्रल्हाद हा विष्णूभक्त असतो. राजा हिरण्यकश्यपू प्रल्हादास विष्णुभक्ती न करण्याचे फर्मान काढतो. एके दिवशी कारागृहातील मोठ्या कढईत उकळलेल्या तेलात प्रल्हादास टाकतो. 'देव तारी त्यास कोण मारी' या न्यायाने प्रल्हाद सुखरूप बाहेर पडतो. अविवेकी राजा संतप्त होतो. तो उंच डोंगराचा कड्यावरून प्रल्हादाचा कडेलोट करतो. विष्णू प्रल्हादाला फुलासारखा झेलून घेतो. प्रल्हादाची भक्ती फळाला येते. हरिनामाचा गजर होतो.

हिरण्यकश्यपू सुडाला पेटतो त्याची बहीण होळी माहेरी येते. ती मायावी असते. अग्नीचा तिच्यावर परिणाम होत नाही. आपल्या भावाचे दुःख पाहून ती निश्चय करते की, "प्रल्हादास जाळून भस्म केल्याशिवाय मी भोजन करणार नाही. 'पोळी' खाणार नाही". पौर्णिमेच्या – शिमग्याच्या रात्री चिता पेटवते. आम्ही कसे जळत नाही हे लोकांना दाखवते. त्यावेळी मी जळणार नाही प्रल्हाद जळून खाक होईल."

प्रल्हादास मांडीवर घेऊन ती चिता रचून घेते. लोकांना पेटवायला सांगते. ज्वाला भडकतात. मेलीमेली असा ओरडा लोकांना ऐकू येतो. चिता-ज्वाला शांत होतात प्रल्हाद सुखरूप बाहेर पडतो. लोक प्रल्हादाचा आणि विष्णूचा जयघोष करतात. पुरणाची पोळी आणून होळीच्या भोजनाची अपूर्ण राहिलेली इच्छा पूर्ण करतात. बोब मारतात. होळी रे होळी! पुरणाची पोळी!!

विष्णूपुराणातील ही कथा धर्म आणि विष्णू माहात्म्य कथन करणारी कथा आहे. आर्य-अनार्य संघर्षाचा संदर्भ या पुराणकथांतून जाणवतो. हिरण्यकश्यपू-विष्णू यांच्या बाबतीत हा संघर्ष व्यक्त केला जातो. प्रल्हादाची भक्ती जनमानसात पोहचवण्याचा व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारी ही दैवतकथा आहे. होळीच्या सणाचा आणि शिमग्याच्या उत्सवाचा संस्कार देणारी व सांस्कृतिक परंपरांचे जतन करणारी ही कथा लोकमानसात, श्रद्धेचा विषय बनते. धर्म प्रस्थापना आणि हेतुची सिद्धता या दैवतकथेतून व्यक्त केली जाते. लोकसमूहाचा 'होळी' आणि 'शिमगा' (चंद्र) पोर्णिमा या उत्सवाचे प्रतिपादन करणारी ही कथा महत्त्वपूर्ण ठरते. आर्य-अनार्य संघर्ष आणि परस्परांच्या परंपरांचे एकमेकावर पडणारे प्रतिबिंब ह्या संमिश्र संस्कृतीचा प्रभावही या कथेतून मांडला गेला आहे.

## ७) किती कुटील त्या कुंटिणी ! (कथासरित्सागर)

'कथासरित्सागर' ह्या कथा बृहत्कथेच्याच संस्कृतमध्ये अनुवाद केलेल्या कथा आहेत. गुणाढ्याने पैशाची भाषते ह्या कथा रचलेल्या होत्या. कथासरित्सागरमधील कथा ज्ञानरंजक-ज्ञानवर्धक आहेत. रीतिरिवाज, संकेत, विधी, लोकविश्वास-श्रद्धा यांचा परिचय तसेच नैतिक मूल्यांचे संस्कार करणाऱ्या ह्या कथा आहेत. या कथांतून मुर्खांच्या अनेक गोष्टी कथन केल्या आहेत. मूर्खपणा आणि संकटे यांचा तसेच व्यभिचार व आचारधर्मांचा प्रसार करणाऱ्या ह्या कथा आहेत.

सोने बनवण्याची सिद्धी प्राप्त झालेल्या 'मरुभूती'ची ही कथा आहे. नरवाहन दत्ताचा सेवक मरुभूतीच्या कुंटिणीने फसवलेल्या माणसाची ही गोष्ट आहे. तो आपला कुटील कुंटिणीचा अनुभव नरवाहनदत्ताला सांगतो.

नरवाहनदत्त आणि सेवक मरुभूती यांची ताटातूट होते. जंगलात तो भरकटतो, हरवतो. त्याला एक मुनीश्रेष्ठांचा आश्रम सापडतो. काही दिवस आश्रमात राहातो. आकाशमार्गाने काही दिव्य स्त्रिया नदीवर जलक्रीडा करीत असतात. मुनींच्या सांगण्यानुसार मरुदत्त एका विद्याधरी स्त्रीचे वस्त्र घेऊन आश्रमात येतो. ती नग्न विद्याधरी वस्त्रांसाठी आश्रमात पाठलाग करत धावत येते. तिला विचारले जाते की नरवाहदत्त हरवला आहे तो कुठे आहे ? हे उत्तर दे म्हणजे तुझी वस्त्रे मिळतील.

ती म्हणाली, "कैलास पर्वतावर नरवाहदत्त शंकराची आराधना करीत आहे. परंतु ही वार्ता सांगितल्याने मी शापीत झाले आहे. हे मुनीवर मला आता तुमचा आश्रय हवा आहे. शाप मुक्त झाल्यावर मी निघून जाईन." तिने मुनींसोबत संसार थाटला. ती प्रसृत/प्रसूत झाली तिचा कोवळा गर्भ मुनीस देऊन-शापमुक्त होऊन ती निघून गेली. मुनीस ती म्हणाली, "जर तुला मी हवी आहे तर हा गर्भ शिजवून खाऊन टाक. तू माझा होशील माझ्या योनित मला भेटशील." ती आकाशमार्गे निघून जाते.

तपस्वी मुनी विरहाने शोकाकूल होतात. तो गर्भ शिजवून खातात. त्याचे भोजन मरुभूतीलाही सांगतात पण तो कचरतो. मुनी गर्भाचे भोजन करून आकाशमार्गे उडून जातात. मरुभूती भांडे खरडून भाताची दोन शिते खातो. त्याच्या तोंडातून सोन्याचे तार तुटतात. थुंकी, लाळ सोन्याची होते. सिद्धी प्राप्त होते तो भटकत भटकत वैभवशाली नगरात पोहचतो. एका वेश्येच्या घरी मुक्काम ठोकतो. खूप बेसुमार खर्च करतो. त्या वेश्येला आश्चर्य वाटते. ती

त्याला प्रेमजाळ्यात अडकवते. तिला माहित असते की ह्याला सोन्याची सिद्धी प्राप्त आहे. ती मदिरेतून मरुभूतीला ओकारीचे औषध पाजते. ओकारीतून पडलेली भाताची शिते ती कुंटीण खाते. मरुभूती भुलतो आणि फसवला जातो. त्याची सिद्धी जाते. ती कुंटीणीला प्राप्त होते. त्याच्या मुर्खपणाची ही कथा आहे. कुंटीण फसवणूक करून मरुभूतीला हाकलून देते. त्याची नशा-ग्लानी उतरते. साक्षात्कार होतो. देवी प्रसन्न होऊन मरुभूतीला सांगते. "काळजी करू नकोस, तुझा स्वामी नरवाहनदत्त सिद्ध पुरुष झाला आहे. त्याची भेट घे." एका अदृश्य व्यक्तीने मरुभूतीला नरवाहनदत्तासमोर आणून टाकलेले असते. अशा प्रकारे स्वामी-सेवकाची भेट होते. कुंटीणी किती कुटील असतात याचा बोध देणारी ही कथा आहे. चतुर माणसाचीही फसवणूक कशी होते याचे ज्ञान देणारी ही गोष्ट!

**८) विक्रमादित्य आणि वेताळ: - (वेताळ पंचविशी)**

शिवदास नावाच्या विद्वान पंडिताने लिहिलेल्या राजा विक्रमादित्याच्या पराक्रमाच्या या कथा आहेत. मूळ संस्कृतमध्ये असलेल्या या कथा सर्व भारतीय भाषांमध्ये प्रसारित झाल्या आहेत. चातुर्य-व्यवहार बुद्धी आणि हजरजबाबीपणा यामुळे या कथा प्रसिद्ध आहेत. 'वेताळ' ही अद्‌भुतशक्ती आणि राजा विक्रमादित्य हा लौकिक शूर राजा यांच्या चातुर्याच्या व बुद्धीच्या चाणाक्षतेच्या कथातून लोकांना संदेश व नीती-चातुर्याचे शिक्षण दिले आहे. विद्याकेतू (राजपुत्र) आणि त्याचा मित्र बालकेतू (प्रधानपुत्र) यांच्या मैत्रिणी आणि दैवयोगाची ही गोष्ट आहे. विद्याकेतू चंद्रवर्माची कन्या चंद्रकोर (सुकेशी) हिच्याशी विवाह करतो. बालकेतूलाही ती आवडते. परंतु विद्याकेतुशी लग्न केल तर ती राणी होईल. आणि माझ्याशी लग्न केलं तर ती सामान्य प्रधानाची सून होईल म्हणून बालकेतू तिचे लग्न विद्याकेतूशी करून देतो. आपणास सुकेशी प्राप्त व्हावी म्हणून विद्याकेतूने भद्रकाली मातेला नवस केलेला असतो. जर मला ही चंद्रकोर (सुकेशी) प्राप्त झाली तर मी माझे उत्तमांग देवीस अर्पण करीन असा संकल्प त्याने सोडलेला असतो. विद्याकेतूला लग्नानंतर देवीच्या पुढे सोडलेल्या संकल्पाचा विसर पडतो. एकदा अचानक मंदिरात गेल्यावर त्याला संकल्प आठवतो. तो आपले मस्तक देवीस अर्पण करतो. त्याचा मित्र त्याला शोधत (बलकेतू) मंदिरात पोहचतो. मित्राचा शिरच्छेद पाहून तो थरकाप होतो. लोक दोष देतील या भीतीने तो स्वतःचे शिरच्छेद करून घेतो. विद्याकेतू आणि बलकेतू बराच वेळ परत आले नाहीत म्हणून सुकेशी मंदिरात त्यांना शोधत येते. तर ते दृश्य पाहून धरणीकंप व्हावा तशी ती हादरून जाते. लोक आता मला कुलटा म्हणतील, मीच या दोघांचा शिरच्छेद केला आणि आता पतीशिवाय मी कशी जगणार? म्हणून ती तलवारीने आपले शिर कापू जाते इतक्यात देवी प्रसन्न होऊन तिला म्हणते, "अग कन्ये! हा काय अविचार? त्यांची मस्तके धडाला जोड ती पूर्ववत जिंवत होतील. चमत्कार घडतो. दोघे जिंवत होतात. परंतु गडबडीत मस्तकांचा अदलबदल होते. ही गोष्ट वेताळाने विक्रमाच्या पाठीवर बसून सांगितली. विक्रमाला वेताळ म्हणतो-" हे राजा! आता तिचा पती कोण? जर उत्तर दिले नाहीस तर तुझी धडगत नाही. तू शापित होशील."

**विक्रम उत्तर देतो** - ''हे वेताळ ! मस्तक म्हणजे उत्तमांग! उत्तम अंगावरून माणसं ओळखली जातात. ज्या धडाला तिच्या नवऱ्याचे मस्तक तोच तिचा नवरा." या उत्तराने वेताळ संतुष्ट होतो. अशी ही एक चातुर्यकथा, रहस्यकथा आणि ज्ञानाबरोबरच रंजन करणारी बोधकथाच आहे.

## १) पुतळी एकोणतिसावीः सुलोचनाः (सिंहासनबत्तीसी)

'सिंहासनबत्तीसी' या सग्रंहातील ही प्राचीन कथा आहे. इतिहास, धर्म, बुद्धी यांचा आणि काळ-लक्ष्मी यांचा फेरा हा दैवात कसा बदल करतो याची ही कथा आहे. सुलोचना ही राजा भोज यास एकोणविसाव्या वेळी सिंहासनावर बसण्यासाठी आल्यावर त्याला थांबवते अशी ही एकोणतिसावी जिंवत होणारी पुतळी म्हणजे सुलोचना! ती भोज राजाला म्हणते "थांब राजा मी सुलोचना, तुला सांगते की, विक्रमासारखे गुणवैभव असेल तर सिंहासनावर बैस! सिंहासनाला अपवित्र करू नकोस! ती विक्रमराजाच्या जीवनातील घटना प्रसंग कथन करते. विक्रमराजा वेश पालटून रात्री प्रजेची दुःखे जाणून घेतो. ब्राह्मणाच्या दारिद्र्याची गोष्ट ती सांगते. राजा त्याला भोपळयात रत्नमाणके भरून देतो. ब्राह्मण तो भोपळा सोनाराला विकतो. कमी पैशात विकतो. ब्राह्मणाचे भले करूनही 'काळ' विपरीत म्हणून ते धन सोनाराला मिळते. ब्राह्मणाची संतुष्टता जाणून घेण्यासाठी राजा रात्री पुन्हा त्याच्या घराबाहेर जातो. ब्राह्मणाच्या बायकोचा आणि त्याचा संवाद ऐकतो. ती म्हणते, ''अग बयो राजाचा दोष नाही काळच अनुकूल नाही."

एवढ्यात एक काळीकुट्ट आकृती घरात शिरते त्या ब्राह्मणाच्या झोपडीत शिरणाऱ्या आकृतीला राजा रोखतो. कोण तू? त्यावर उत्तर मिळते मी काळ ब्राह्मणाला छळण्यासाठी आलो. राजा म्हणतो- "तो बिचारा ब्राह्मण गरीब आहे. त्याला का छळतो! त्या ऐवजी मला छळ!"

काळाची नजर राजाकडे वळल्याने ब्राह्मणाला चांगले दिवस येतात. सोनार भोपळा चिरतो त्यातून रत्नमाणके पडतात. सोनार हे ब्राह्मणाचे नशीबाचे धन म्हणून पाप घडू नये यासाठी ते धन ब्राह्मणास परत करतो. ब्राह्मणाचे दिवस पालटले. राजाचे ग्रह फिरले राजा आपदेमुळे सर्व त्याग करून एक वर्ष तीर्थयात्रा करण्यास जातो. विक्रमाला सोबत म्हणून (संवगडी) एका राजाने तीर्थयात्रेत सहभागी केले. त्याच्या राणीचा हार खुंटीने गिळला. विक्रमाला मात्र हात छाटण्याची शिक्षा भोगावी लागली. या घटनेवर कुणाचा विश्वास बसेना. शेवटी काळाचे भोग विक्रमालाही चुकले नाहीत. थोट्या विक्रमाला शेवटी एका तेल्याने आश्रय दिला. तेथे तो तेल घाणा चालवत होता.

त्रिगर्ताच्या राजाच्या दूताने एके दिवशी तीन पुतळ्या आणल्या. दरबारात या तीनपैकी श्रेष्ठ पुतळी कोण? हे सांगण्यासाठी बुद्धी तुमच्या राज्यात असेल तर राज्य करा...नाही तर राज्य हवाली करा. राजा बैचेन झाला.

तिन्ही पुतळ्या एकसारख्या फरक कसा ओळखणार? श्रेष्ठ कोणती कशी ओळखणार? राजाच्या दरबारात काळ...लक्ष्मी...बुद्धी आणि धर्म हजर झालेत. आमच्यात श्रेष्ठ कोण? याचा निवाडा पाच दिवसात करावा अशी तंबी दिली.

थोट्या विक्रमाने त्या पुतळ्या पाहताच मर्म ओळखले. लोक त्याला खो खो हसत होते. तो मात्र शांत होता. विक्रम म्हणाला-"महाराज मला संधी द्यावी परंतु मला तीन दिवसांची सवड द्यावी आणि ज्या खुंटीखाली न्यायनिवाडा करावा की जिने हार गिळला आहे."

चौथ्या दिवशी बैठक जमली, विक्रमाने तिन्ही पुतळ्यांचे निरीक्षण केले. एक बारीक तार घेऊन त्या एकेकीच्या कानात खोचल्या. एकीच्या कानातून तर दुसरीच्या तोंडातून तार बाहेर आली. तर तिसरीच्या सरळ पोटात तार गेली. विक्रमाने तिसरी पुतळी सर्वश्रेष्ठ असल्याचे सांगितले. पहिलीच्या कानातून तार निघाली तिच्या स्मरणात काहीच राहात नाही. 'नळी फुंकली सोनारे इकडून तिकडे गेले वारे' अशी तिची स्थिती. दुसरीच्या तोंडातून तार निघाली ती तोडांने भळभळा बोलते मनात गोष्ट राहात नाही. तिसरीच्या पोटात तार गेली तिची मती चांगली आहे. विश्वासपात्र आहे ती! मरेल पण कुणाला काहीच इकडच्या तिकडे सांगणार नाही. गुपित फोडणार नाही म्हणून ती श्रेष्ठ!

त्रिगर्ताच्या दूताने टाळ्या वाजवून विक्रमाच्या बुद्धीची, हुशारीची तारीफ केली. राजाने सुटकेचा नि:श्वास टाकला. त्याच्या राज्यावरचे गंडांतर गेले नंतर—–

काळ...बुद्धी...धर्म...लक्ष्मी प्रकट होऊन मी श्रेष्ठ अशी वादावादी करू लागले. विक्रम म्हणाले देवतांनो असे भांडू नका! काळ सर्वश्रेष्ठ आहे. बुद्धी, धर्म, लक्ष्मी यांना काळाची साथ असेल तर कृपा फलद्रुप होतात. अन्यथा नाही ज्यावेळी माझी लक्ष्मी (राज्य) गेले कारण काळ फिरला होता. तेव्हा तू मला सुख दिले नाही? त्या गरीब ब्राह्मणा जवळ बुद्धी असूनही त्याची उपासमार झाली. कारण काळ छळत होता. सत्य म्हणजे धर्म! खुंटीने हार गिळला हे सत्यधर्मास स्मरून मी सांगितले. परंतु माझे हात छाटले गेले तेव्हा धर्म कुठे गेला होता? म्हणून काळ श्रेष्ठ! हे ऐकून काळ बेहद खूष झाला. खूंटीतून पाहता पाहता हार बाहेर आला. आणि विक्रमाला हात फुटून तो पूर्ववत झाला. सर्व देवतांचा आशीर्वाद घेऊन विक्रम उज्जन नगरीस आला. त्याच्या बुद्धी-चातुर्यावर खूष होऊन राजाने विक्रमाला राजकन्या दिली. त्याला राज्य मिळवून दिले. विवाहात मिळालेले अर्धे राज्य विक्रमाने तेल्याला बहाल केले. विक्रमासारखा हे भोजराजा! तू गुणसंपन्न आहेस काय? नसेल तर सिंहासनावर तुला बसण्याचा अधिकार नाही. दरबारात कुजबूज झाली. लखलखाट झाला. सुलोचना पुन्हा सिंहासनावरच्या पुतळीत सामावली. लुप्त झाली. सभा थक्क झाली. राजाचे गुण, त्याचा स्वभाव, बुद्धीचातुर्य आणि न्यायीवृत्ती याचा आदर्श व नैतिकता स्पष्ट करणारी ही गोष्ट आहे.

**१०) तोतयाची कामगिरी अखेर विष्णू साह्यकारी: - (पंचतंत्र)**

विष्णूशर्मा या विद्वानाने 'पंचतत्रं' या ग्रंथतील कथांची निर्मिती केली. सुताराचा विष्णू आणि त्याचा मित्र गणदत्ता या सामान्य तरुणांची ही कथा आहे. सुताराचा विष्णू राकावती नगरीच्या राज्यकन्येच्या सौंदर्यावर आणि तारुण्यावर भाळतो. काहीही करून राज्यकन्या आपली झाली पाहिजे. यासाठी तो सुतार असल्याने कळीचा घोडा, गरुड असे प्राणी तयार करतो. लाकडी गरुडाला कळीच्या साहाय्याने उडवतो. शंख चक्र गदा, पद्म, कौस्तुभमाळा वेशभूषा करून तो राजकन्येला रात्री विष्णुच्या रूपात भेटत राहतो. तिला आकर्षित करून तिचा उपभोग घेतो. राजा-राणीला हे कळते की आपली राजकन्या कुणाच्या तरी प्रेमात पडली आहे ते शोध घेतात. साक्षात विष्णू भगवान जावई मिळाल्याने राजा खूष असतो. पुढे शेजारच्या मणिबंधाच्या राज्यावर राकावतीचा राजा अतिक्रमण करून युद्ध छेडतो. राजकन्येला राजा म्हणतो, ''साक्षात विष्णू माशे जावई. त्यांना सांग तुम्ही लढाईचे नेतृत्व करावे.'' ही वार्ता ऐकल्यावर सुताराच्या विष्णूचे धाबे दणाणले. आता युद्ध कसे करणार! मरणार एकदाचे! परंतु लढत लढत मरू असा तो निश्चय करतो. शेवटी कळीचा गरुड घेऊन तो विष्णू वेश धारण करून गरुड उडवत युद्धक्षेत्रावरून आकाशात घिरट्या घालतो. तिकडे वैकुंठात साक्षात विष्णू

चिंतेत पडतात. पृथ्वीवर नकली (तोतया) विष्णू आणि नकली गरुड यांनी धमालच केली आहे. सुतारासाठी नाही तर सत्वरक्षण आणि धर्मरक्षणासाठी साक्षात विष्णूला अवतरावे लागते. लाकडी सुदर्शन चक्र खरे होऊन युद्धात हाहा:कार होतो. देवाचे दर्शन होणार म्हणून शत्रू सैन्य नमस्कार करते व शस्त्र टाकून देते. विष्णू भगवान यांनी सुताराच्या शरीरात प्रवेश केल्यामुळे तो वाचला. मणिबंध हारला. राकावतींचा राजा जिंकला. विष्णू युद्ध थांबल्यावर सुताराच्या शरीराबाहेर वैकुंठात निघून गेले. तोतया विष्णू (सुतार)ची लाज वाचली. प्रत्यक्ष विष्णू साह्यकारी झालेत. प्रत्यक्षात राजा-प्रधान यांनी या विष्णुसुताराला मानवी रुपात पाहिल्यावर त्यांना आश्चर्य वाटले. परंतु त्याचे शौर्य-चातुर्य पाहून खूष होऊन त्याचा राजकन्येशी रीतसर विवाह करून दिला.

या कथेतून सामान्याचे असामान्यीकरण केले आहे. अतृप्त आणि दबलेल्या कामभावना सुताराच्या गरीब मुलाच्या रूपाने या कथेत येतात. फ्रॉईडच्या मतानुसार या लोककथा त्यातील रंजकता, चमत्कार, आणि लोकमानस हे दबलेल्या कामजीवनाचे उदात्तीकरण असते. ते या कथेत जाणवते राजकन्येची प्राप्ती प्रत्यक्ष नव्हे तर कथेच्या रंजकतेतून सुताराच्या विष्णूला व्हावी ही बाब लक्षणीय ठरते. चतुरता, शौर्य आणि बुद्धी वैभवाचे अचाट प्रयोग लोककथेत जाणवतात.

**११) गाणारा पक्षी आणि र्द्री गुलबाक्षी: - (अरेबियन नाईटस)**

'अरेबियन नाईटस' यामधील ही गाणाऱ्या पक्षाची आणि गुलबाक्षीची कथा आहे. कंदहारचा राजा खुश्रू रात्री भटकंती करून प्रजेची काळजी घ्यायचा. एकदा वजीरासोबत फिरत असताना एका गरीबाच्या घरी तीन तरुण मुलींचा (बहिणी) संवाद राजाने ऐकला. मोठी म्हणाली, 'मला वजीराशी लग्न करावेसे वाटते' तर मधली म्हणाली, 'मला सेनापतीशी लग्न करावेसे वाटते.' त्याचा दरारा मोठा असतो.' धाकटी म्हणाली, 'मला तर राजाची बेगम होण्याची इच्छा आहे.'

दुसऱ्या दिवशी राजाने दरबारात त्या तिघींना बोलावले. गरीब बाप घाबरून गेला राजाने त्यांना विचाले काय रात्री काय चर्चा करीत होतात? धाकटी धाडसाने पुढे आली. आलमपनाह, गुनाह माफ कीजिये सरकार! आम्ही दिल बहलवण्यसाठी गोष्टी करीत होतो. तिची अदब, लंकब, धाडस पाहून राजा खूष झाला, तुमची तिन्हींची इच्छा पूर्ण होईल. तिघींचा निकाह वजीर, सेनापती, राजा यांच्याशी पार पडला. धाकटी राणी झाली याचे दु:ख दोन्ही बहिणींना सलत होते. नशिबान धाकटीला पहिला पुत्र झाला. दोन्ही बहिणींनी कुटील कारस्थान करून कुत्र्याचे पिल्लू झुल्यात ठेवले आणि गोंडस राजपुत्रास टोपलीत ठेवून नदीत सोडून दिले. नंतर दुसऱ्यावेळी धाकटी(राणीला)ला कन्या रत्न झाले. कपटी बहिणींना यावेळी मांजरीचे पिल्लू ठेवून त्या बालिकेला टोपलीत ठेवून नदीत सोडून दिले. विशेष म्हणजे राजाच्या बागवानाने दोन्ही वेळा राजपुत्राला आणि राजकन्येला सापडलेल्या टोपल्यांतून बाहेर काढले. त्यांचा सांभाळ केला. भरणपोषण केले राजबिंडी पोरं वाढत होती.

राणीला कुत्रं-मांजरीची पिल्ल झाली हे पाहून राजाने तिला सोडून दिले. कोठडीत टाकले वजीराने राजाची समजूत घातली. ठार मारू नका म्हणून तिला कैदेत टाकले. राजपुत्र बहामन आणि कन्या परिझार बागवानाच्या घरी वाढलीत. त्यांचे राजबिंड रुप पाहून त्यांना शंका आली की, हे तर आपल्या धाकट्या बहिणीची अपत्ये आहेत. त्यांनी पुन्हा कट रचला. त्यांनी बहमान-परिझार यांना फसवण्याचा कट सुरू केला. परिझारला गाणारा पक्षी आणि दर्दी

गुलबाक्षी आणून घरात ठेवली तर राजमहाल फिका पडेल असे धूर्तपणे सांगितले. तो बुलबुल गातो आणि गुलबाक्षी त्याला दाद देते. या गोष्टी आपल्याकडे पाहिजे असा हट्ट ती बहामनजवळ धरते. साता समुद्रापारच्या बेटावर तो पक्षी आणि गुलबाक्षी आहेत. भैय्या मला खेळायला ती आणून दे! असा हट्ट धरते. बहामन मोहिमेवर निघतो. त्याला एक फकिर भेटतो. कटोरा आणि अंगारा देऊन फकिर त्याला समुद्रापार बेटावर जाण्यास सांगतो तिथे पिंजऱ्यात गुलबाक्षीच्या ताटव्याजवळ गाणारा पक्षी भेटेल. परंतु प्रचंड आवाज होईल तू मागे वळून पाहायचे नाही. वळलास तर दगड होऊन जाशील! त्याला भान राहात नाही तो वळून पाहतो दगड होऊन पडतो. बरेच दिवस बहामन परतला नाही म्हणून परिझार चिंतेत असते. ती मग शोध मोहिमेवर निघते. वाळंवटांच्या शेवटी समुद्रकिनारी तिला तोच फकिर भेटतो त्याच्या सूचना ती नीट ऐकते लक्षात ठेवते. कटोरा-अंगारा घेऊन पलीकडे बेटावर पोहोचते. कानात कापसाचे बोळे घालते. तिथे शिळाच शिळा पडलेल्या असतात. ती पिंजऱ्याजवळ जाते. कानबंद मनाची पक्की तयारी करून पिंजरा उघडते. प्रंचड आवाज होतो कानठळ्या बसणारा! ती घाबरत नाही. मागे पाहात नाही. धुनीवाल्याबाबांची सूचना पाळते. घाबरली नाही. तिची फत्ते झाली. गुलबाक्षीशी पाखरु बोलते परिझारची फत्ते झाली...फत्ते झाली. हे गाणाऱ्या पाखरा माझ्या भावाची हकीकत मला सांग अशी ती पक्षाला विचारणा करते. पक्षी म्हणतो - "स्वामीनी तुझ्या उजव्या हाताची करंगळी काप दगडांवर रक्ताचे थेंब टाक. दगडावर रक्ताचे थेंब टाकले त्यातून माणंस उठावी तशी त्यातून माणसं जिवंत झालीत. परिझारला बहामन भेटतो दोघे बहीण-भाऊ सुखरुप परतात. एक तुर्की राजपुत्रही त्या दगडातून जिवंत होतो. त्याला परिझार आवडते. पुढे आपल्या राज्यात येतात. राजाला खरी गोष्ट कळते. हेच आपले राजपुत्र-राजकन्या याची जाणीव होते. राजा कोठडीतून राणीला सोडवून तिची क्षमा मागतो." गुलबाक्षी आणि गाणारा पक्षी राजदरबारात बोलतात-

पक्षीः - बादशहा मूर्ख आहे.

गुलबाक्षीः - कसा काय रे?

पक्षीः - अग, बायकांना कुठे कुत्र्या-मांजराची पिल्लं होतात?

गुलबाक्षीः - मेला चावट कुठला.

पक्षीः - खरंच असा एक राजा आहे त्याला दोन बायकांनी खोटं सांगून उल्लूं बनवलं!

बादशहाला चूक कळून आली धाकट्या बहिणीने दोन्ही मोठ्या बहिणींचे प्राण वाचवून राजाला परावृत्त केले. दोन्ही खजील झाल्यात. राजा-राणी-राजपुत्र-राजकन्या आणि तुर्की जावई यांची ही अशी सुखद भेट होते.

चमत्कार, अद्‌भुतता आणि रंजकता यामुळे 'अरेबियन नाईटस' मधील गाणारा पक्षी आणि गुलबाक्षीची ही गोष्ट वैशिष्ट्यपूर्ण ठरते. पक्षी बोलतो, गुलबाक्षी संवाद साधते, दगड होऊन पडलेली माणंस धुनीवाल्या फकिराच्या कृपेमुळे पुन्हा जिवंत होतात. अशा अद्‌भुतरम्य आणि चमत्कृतीपूर्ण घटनांनी ही कथा ज्ञान-रंजनाचे कार्य करते.

### १२) कोल्हाने केली चतुराई तर बगळा खातो मलई! (इसापनिती)

इसापाच्या ह्या प्राणीकथा असल्यातरी त्या माध्यमातून लोकांना चतुराई, धूर्तपणा, बुद्धीसामर्थ्य, आचारनीती आणि धर्म सांगण्यासाठी रचलेल्या कथा आहेत.

धुर्त कोल्हा आणि बगळ्याची मैत्री जुळते – बगळा उंबराची छान फळ कोल्ह्याला रोज खाऊ घालतो. कोल्हा मटक मटक फळं खातो. कोल्हा बगळ्याला आपल्या गृहेत खीर खाण्याचे निमंत्रण देतो. एका पसरट मोठया भांड्यात कोल्हा खीर वाढतो बगळ्याला खायला जमत नाही. कोल्हा मात्र जीभेनं चाटून सर्व खीर फस्त करतो. बगळा बिचारा उपाशी राहतो. तो शांतपणे निघून जातो. कोल्हा हरामखोरी करतो उपकाराची फेड अपकाराने करतो. बगळा आतून खूप नाराज असतो.

एकदा बगळ्याच्या डोक्यात येते की, कोल्ह्याला पाहुणचारास बोलवावे. मागचे उट्टे काढावे. तो प्रेमाने कोल्ह्याला बासुंदीमलई खायचे निमंत्रण देतो. कोल्हा खूष होतो. बगळा सुरई आणतो. उंच मानेची, आखूड अरुंद तोंडाची सुरई बासुंदीमलईने भरून ठेवतो. कोल्ह्यास जिभेने आतून मलई चाटता येत नाही. त्याची पचांईत होते. तो भुकेला राहातो. बगळा उंच मान करून चोचीने मलई खाऊन टाकतो. कोल्ह्याची जिरवतो. कोल्हा आतल्या आत चडफडतो. परंतु काय करणार जशास तसे. कोल्ह्याने केली चतुराई तर बगळ्याने अशी खाल्ली मलई!

प्राण्यांची प्रतिमा घेऊन मानवी स्वभाव व वृत्ती-प्रवृत्तींचा शोध घेत-घेत रंजकता आणि बोधपूर्ण शिक्षणाची परंपरा या इसापनितीच्या कथांनी सांभाळलेली आहे. लबाड धूर्त कोल्हा, परंतु बगळाही भाबडा असला तरी तितकाच शहाणा आहे हे या कथेचे तात्पर्य होय.

**१६) चांडाळ चौकडी आणि बिरबलाची खिचडी: -**

अकबर आणि त्याचा चतुर सल्लागार बिरबल यांच्या कथा लोकमानसात चातुर्यकथा आणि व्यवहारकथा म्हणून प्रचलित आहेत. त्यांचे किस्से विनोदी, चटपटीत परंतु बोधपूर्ण ठरतात.

अकबराच्या दरबारी खूषमस्कऱ्यांची चांडाळ चौकडी होती. त्यांना बिरबल आणि राजाचे प्रेमळ राहाणे खूपत होते. बुद्धीशिरोमणी बिरबल मात्र राजाचा आवडता माणूस होता. एका रात्री उद्यानात फिरताना थंड हवेत राजाने तलावाचे पाणी बोटाने स्पर्शून बघितले. त्याला वाटले इतक्या थंड पाण्यात रात्रभर राहण्याची शर्यत ठेवावी. शर्यतीसाठी अनेक लोक येतात बरेच मध्येच सोडून पळून जातात. एक गरीब माणूस त्याच्या मुलीच्या लग्नाच्या विवंचनेत असतो. चला स्पर्धेत उतरु या! पैसे मिळतील. थंड पाण्यात तो रात्रभर राहातो. पहारेकरी समोर हजर असतात. त्याला शर्यतीचे बक्षीस मिळणार असते. चांडाळ चौकडी राजदरबारात म्हणतात, आलमपन्हा! या माणसाला बक्षीस देऊ नये. रात्री उद्यानात दिवे जळत होते. शेकोटी पेटली होती त्या उष्णतेने हा रात्रभर पाण्यात राहू शकला. तो बक्षीसाचा हक्कदार नाही. तो गरीब माणूस खचून जातो. न्यायी बिरबलास न्यायाची मागणी करतो. प्रामाणिक गरीब माणसास न्याय देणे, गरजेचे आहे हे बिरबल ओळखतो.

बिरबल अंगणात उंच झाडावर एका मडक्यात डाळ तांदूळ टाकून बांधून घेतो व खाली आग - शेकोटी पेटवतो. खिचडी शिजत ठेवतो. राजाचे निरोपावर निरोप येतात. खिचडी शिजली की, जेवण झाल्यावर मी येईन असा निरोप पुन्हा पुन्हा ऐकून राजा संतापतो. चांडाळ चौकडीसह राजा बिरबलाच्या घरी येतो. उंच मडके आणि जमीनीवर शेकोटी यामुळे खिचडी कशी शिजणार असा प्रश्न राजा उपस्थित करतो. चांडाळ चौकडी हसते बिरबलाला मूर्ख ठरवतात. हा वेडेपणाच आहे तुझी खिचडी अशी कशी शिजणार?

बिरबल शांतपणे उत्तर देतो, राजे महालातील दिवे, आणि दूरच्या प्रकाशातील उष्णतेमुळे तो गरीब माणूस रात्रभर पाण्यात कसा बरं राहू शकला असेल? शर्यत जिंकणारा गृहस्थ त्याने राजासमोर उभा केला. राजाला आपली चूक कळून आली. राजाने त्या गृहस्थाला न्याय दिला. चांडाळ चौकडी खजिल झाली.

बिरबलाची ही गोष्ट न्यायवृत्ती, बुद्धीवैभव आणि मानवतेचा पुरस्कार करीत धूर्त चांडाळ चौकडीचा आणि त्यांचा मूर्खपणाचा धिक्कार करणारी आहे. यामुळे जनमानसात न्यायबुद्धीची आणि तारतम्य विचारांचा न्यायी बिरबल आणि राजाची चूक कबूल करण्याची वृत्ती यांचा आदर्श आहे.

**ग्रंथनिविष्ट लोककथाः वैशिष्ट्येः -**

- भारतीय संस्कृतीची जुनी-प्राचीन परंपरा आणि तिची विविधतेतील एकता, विश्वात्मकता, मानवतावादी दृष्टीकोन व्यक्त करणाऱ्या या कथा आहेत.

- भारतीय संस्कृतीच्या विविध भाषांमध्ये, प्रांत-प्रदेशात लोकजीवनात घडणाऱ्या घटना, प्रसंग आणि भेटणाऱ्या विविध वृत्ती-प्रवृत्तीच्या व्यक्ती यांची जडण-घडण या कथांतून अभ्यासता येते.

- भारतीय परंपरेचा एक भाग म्हणून मराठी लोककथा या तिच्यापासून वेगळ्या करता येत नाहीत. मराठी कथांत पुराणे, वेदग्रंथ, शतपथ ब्राह्मण, रामायण, महाभारत, जातककथा, जैनकथा, इसापनिती, सिंहासनबत्तीशी यांतील तसेच देवदैवते यांच्या लौकिक-पारलौकिकाच्या ह्या कथा आहेत.

- इंद्र, वीरोबा, खंडोबा, वीर दैवते आणि राजा-राणी, राजदरबार, स्थळवर्णने, चातुर्याने वागणारे प्राणी, अद्‌भूतता आणि अलौकिकता या सर्व दृष्टीने या कथांचे विषय वैविध्यपूर्ण असून त्यामागे लोकश्रद्धा आढळतात.

- उर्वशीच्या कथेतील तिचा शृंगार असो की, अहिल्येचा कामजीवनातील स्त्रैणता यांचा संदर्भ धर्म, अर्थ, काम, मोक्षादी पुरुषार्थांच्या बाबतीत मानवीमनाचा आणि बुद्धीचा खेळ मांडणाऱ्या कथा लक्षात येतात.

- सण, उत्सव, परंपरा आणि लौकिक जीवनातील सुख-दुःख, आणि लोकसंस्कृती यांचा प्राचीन असा आलेख लोककथातून मांडलेला असतो. ग्रंथनिविष्ट प्रस्तुत लोककथांच्या संकलनातून याची जाणीव होते.

- लोककथांतील नायक साहसी, प्रामाणिक, कष्टाळू आणि संकटावर मात करणारा, अदृश्यव्यक्तीशी झुंजणारा, खलनायकाचा बिमोड करणारा, व्यवहारचतुर, बुद्धीमान असतो. या लोककथांतून अशा साहस आणि व्यावहारिक शहाणपणाचा मतितार्थ व्यक्त करण्यात आला आहे.

- कथांची भाषा लोकमानसातील, सर्वसामान्यांची, संवादपूर्ण आणि निवेदनपूर्ण अशीच आहे त्यातील म्हणी, वाक्प्रचार आणि विचारप्रवृत्त करणारी अनेक वाक्ये उद्बोधनाचे, सुविचार प्रस्थापित करण्याचे कार्य करतात.

- या सर्वच कथांना शाश्वत जीवनमूल्यांची परंपरा असल्यामुळे त्या प्राचीन असूनही आजच्या जीवनासाठी दिशादर्शक वाटतात.

**<u>उत्तरार्ध:-</u>**

**मौखिक लोककथा: -**

मराठी लोककथा या ग्रंथात समाविष्ट ग्रंथनिविष्ट लोककथांच्या विभागात एकूण १३ कथांचा अभ्यास केल्यावर 'मौखिक लोककथा' या दुसऱ्या विभागात २१ कथांचे संकलन करून परिशिष्टात नाट्यरुपांतर (दंडार) देण्यात आली आहे. मौखिक लोककथांचा प्रसार हा वाणीद्वारे, मुखवार्ता आणि बोलताबोलता होत असतो. 'कथन' करीत जाणे त्यामुळे त्या हवेसारख्या असतात असे म्हणता येईल. त्यांचा कर्ता लेखक तसा निश्चित नसतो. त्या भ्रमणशील असतात. लेखक असला तरी त्या पुढे लोकांच्या होतात. त्यामुळे 'लोककथा' संबोधन प्राप्त होते. दैवतांच्या कथा म्हणून त्या लोकदैवतकथा, दंतकथा (मिथके), व्रतकथा, परीकथा, कल्पितकथा, चातुर्यकथा अशा मौखिक रूपाने प्रसारित आणि प्रचलित होत असतात. लेखनापूर्वी – मौखिक (बोलणे) ही क्रिया प्राचीनतम असून माणूस आधी वंदतो या न्यायाने मौखिक वाङ्मयाची लोकपरंपरा रूढ झालेली आहे. त्यामुळे मौखिक परंपरा (Oral tradition) हाच लोकवाङ्मयाचा मूलभूत आधार आहे. त्या परंपरेतून लोककथा मौखिक रूपाने विकसित व प्रसारित झालेल्या असून त्या अजूनही टिकून आहेत. हेच त्यांचे लोकाभिमूख आणि लोकाश्रयी वैशिष्ट्ये आहे. धर्मगुरुंनी धार्मिकता जोपासण्यासाठी, शिष्यांना नीतिधर्म शिकवण्यासाठी कथांचा वापर केला. देव-दैवतांचे महत्त्व वाढवण्यासाठी लोकांनीच दैवतकथांचा आधार घेतला. दैवी चमत्कार आणि देवतांचा कृपाप्रसाद प्राप्तीचा कथा यांचा प्रचार, भगत, भोपे आणि संप्रदायी प्रचारक यांनी कथांच्या माध्यमातून केला. आपल्या शौर्याची, पराक्रमाची गाथा जनतेत प्रसारित करण्यासाठी राजांनी भाट, चारण, शाहीर यांच्या माध्यमातून स्वतःच्या कथा लोकांमध्ये प्रसारित करण्यात धन्यता मानली. घरोघरी आबालवृद्धांना रंजन आणि बोधन या दृष्टीने आजीबाई या लोकसंस्थापित परंपरेने लोककथांची मौखिक परंपरा जोपासली. ती पिढ्यांन्पिढ्यांनी पुढे चालत आलेली आहे. शेकोटीवरच्या गोष्टी, खळ्या-मळ्यात सांगितल्या जाणाऱ्या 'गफ-गफाडा'सारख्या विनोदी कथा, तमाशातील 'वग' नाट्यातून सांगितल्या जाणाऱ्या कथा, अशा अनेक प्रकारांनी मौखिकरित्या या कथांचे जतन, वहन आणि वृद्धींगन झाले आहे. डॉ. मधुकर वाकोडे यांनी 'मराठी लोककथा' या ग्रंथात उत्तरार्ध (दुसरा विभाग) या विभागात अशा २१ कथांचा 'मौखिक कथा' म्हणून समावेश करून त्यांचे संकलित-संपादित रूप सादर केले आहे. दंतकथा तसेच आख्यायिका व दैवतकथा यांचे समृद्ध भांडार लोकजीवनात प्रचलित आहे. त्यापैकी केवळ अत्यंत छोटासा नमुनेदार भाग या मौखिक लोककथा विभागात अभ्यासता येतो. परीकथा, कल्पितकथा यामधील अद्भूतरम्यता ही मौखिक परंपरेत तिखट-मीठ लावून फुलवून, गोष्ट सांगण्याच्या प्रवृत्तीचा परिपाक म्हणून लक्षात घ्यावा लागतो. या दृष्टीनेही प्रस्तुत कथांचा अभ्यास करता येतो.

**दैवतकथा:** (Myths) लोकसाहित्याचा अभ्यास दैवतकथांच्या अभ्यासापासून सुरू झाला. त्यांना पुराणकथा, धार्मिककथा, आख्यानकथा, उत्पत्तीकथा अशा अनेक परिकल्पना येऊन मिळतात. निसर्ग, पशू, पक्षी, मानवप्राणी, सृष्टीची उत्पत्ती, पर्वत डोंगर, नक्षत्रे, सूर्य, चंद्र, वारा, समुद्र इत्यादी निसर्ग घटक यांच्या मध्ये होणारे बदल आणि त्यातील अनाकलनीयता यांमुळे लोक समुहाने त्यापैकी सर्वांनाचा जणू दैवीशक्तीचा दर्जा दिला. धार्मिक रूढी, विधी यांचा समावेश दैवतकथांच्या निर्मितीत आढळतो. आदिवासींचा खांबदेव, वाघदेव, डोंगरदेव ही निसर्ग रूपके लोककथांचा (दैवतकथा) विषय बनतात आणि सृष्टीच्या महानशक्तीपुढे नतमस्तक होऊन त्यांना दैवते मानतात. अशा निसर्गघटनांचे, मानवीशक्ती पलीकडच्या अनाकलनीय बाबींचे स्वरूप दैवताप्रमाणे होते. कुलदेवता याविषयीचा आदरभाव लोकपरंपरेत मोठा आहे. त्यांच्या चमत्कांराच्या कथा ह्या दैवतकथा म्हणून प्रचलित होतात. दिव्यकथा म्हणून ही दैवतकथांचे स्वरूप मानले जाते. श्रद्धेने मानवी समूहांनी आपआपली दैवते तयार केली. भाषेतून त्या संबंधीचे अनुभव, संगती आणि चमत्कृती मांडण्याचा प्रयत्न केला. श्रद्धाशीलता आणि आत्मिक अनुभूतीतून दैवतकथांचा प्रसार झाला.

**परीकथा (अद्भूतकथा):**

परीकथेत एखादी स्त्री-पुरुष ही प्रमुख व्यक्तिरेखा असते. तिच्याभोवती पराक्रम, चमत्कार, दैवीशक्ती, घटना-प्रसंग, अद्भुतरम्यता, कारुण्यमयता, नाट्यात्मकता इत्यादींचा संबंध जोडून कथा निर्माण होते. दैव आणि नशीब या कल्पनांचे प्राबल्य या परीकथांत असते. दु:खी, कष्टी, व्यक्तिच्या जीवनात जादूची छडी घेऊन येणारी, चमत्कार करणारी शक्ती येते. त्याला दैवीन्याय मिळतो. सुष्टांचे रक्षण आणि दुष्टांचे निर्दलन करणारी 'परी' येऊन मानवास सुखी करते. या मानवीमनाचा, श्रद्धेचा आविष्कार परीकथेत येतो. या कथेतील परीकल्पना, भावनिकता, चमत्कार आणि भावनिक काव्यात्मन्याय (Poeitic Justice) यामुळे या कथा ऐकणाऱ्यांना दैवी चमत्कार दाखवतात. अद्भुत अतिंद्रियशक्ती, साहसी नायक, धाडसी नायिका असे अदभुत कल्पनाबंध (Motif) परीकथेत येतात. रंजकता आणि अतिशयोक्तीपूर्ण परिकल्पनांचे साम्राज्य या लोककथांमध्ये असते. दु:ख विमोचन, दैवी-नशीबवानवृत्ती, कल्पित जीवनाचा आनंद या कथातून मिळतो. म्हणून अस्मिक्य भाव, आनंदीवृत्ती जोपासणाऱ्या ह्या कथा आहेत. यक्ष, गंधर्व, किन्नर, विद्याधर, राक्षस, नाग, अतिमानवी योनितील व्यक्ती या परीकथेत संचार करतात. त्यांना मायासिद्धी प्राप्त असते, आकाशात उडणे, (संचार) रूप बदलणे, अदृश्य होणे, संगीत, कला, जादू चमत्कार करणे, रात्री अवेळी संचार करणे, मानवी दैव उजडून टाकणे, विघातक शक्तीचा वापर करणे, नशीब-दैव फळाला आणणे या अशा अदभूतकृती करणाऱ्या व्यक्तींच्या भोवती परीकथेचा प्रपंच थाटलेला असतो.

**दंतकथा (आख्यायिका): -**

ऐतिहासिक आख्यायिका ह्या लोकमुखातून पुढे प्रचलित होत असतात. अशा प्राचीन – ऐतिहासिक घटनांची स्मृती लोकमानसात दंतकथेच्या रूपाने टिकून राहाते. अर्थात ऐतिहासिक सत्य कल्पनावगुंठित रूपाने लोकमनात कथेच्या रूपाने स्थिर होते. तिला दंतकथा म्हटले जाते. दंतकथेत इतिहासाचे अल्पमूळ असते म्हणून तिला असंद्ध, विस्मृत इतिहास म्हटले जाते. त्यांना वास्तववादी, ऐतिहासिक अभ्यासक 'फोल' किंवा 'भाकडकथा' असे संबोधतात. तिचा मूळ आधार एखादी ऐतिहासिक घटना असते. परंतु कालौघात मौखिक परंपरेत त्या घटनांचे स्वरूप बदलते, तिच्यात अनेक कल्पित गोष्टींचा शिरकाव केला जातो. त्यामुळे ती दंतकथा संबोधित केली जाते. त्यांचा गाभा (बीज) सत्य सृष्टीतले आणि बाह्य स्वरूप कल्पित

जगताचे असते. स्थळ, मूर्ती, मंदीर, वास्तु, जुन्या इमारती, उघड्यावरचा मारुती, गुप्तगुहा, अलिबाबासारखी माणसे, भूत, पिशाश्च, पूर्वज, वीर-मुंजे आणि हडक, गुप्तधनाची ठिकाणे अशा कितीतरी बाबींचा समावेश स्वैरपणे आणि मानवी कल्पितबुद्धीने दंतकथेत येतो. यांना लोकस्मृतीच्या कथा म्हटले जाते. संत, विभूती, लोकोत्तर स्त्री-पुरुष या लौकिकांचे अलौकिकात रूपांतर दंतकथेत केले जाते. त्यातून दैवतांच्या संदर्भातील कथा येतात. त्यामुळे त्यांचे परीकथा, दैवतकथांशी आंतरिक जिव्हाळ्याचे नाते दिसून येते.

**बोधकथा किंवा प्राणिकथाः -**

बोधकथा ह्या काल्पनिक स्वरूपाच्या, निराधार असतात. त्यामुळेच त्यांना कल्पितकथा म्हटले जाते. इंग्रजीत त्यांना Fable अशी पारिभाषिक संज्ञा वापरली जाते. या नीतिकथा, प्राणिकथा, दृष्टांत कथा स्वरूपाच्या असतात. यातील पात्रे बऱ्याचदा प्राणीच असतात. म्हणून त्या प्राण्यांच्या माध्यमातून मानवी भावभावना, स्वभावांचे प्रत्यंतर चित्रित केलेले असते. म्हणून त्यांना प्राणिकथा म्हणतात. कथेचा आकार लहान, अल्पक्षरजीवी असतो. त्यातून एखादे नीतीमूल्य स्पष्ट केलेले असते. एखाद्याच घटनेवर आधारित एखाद्या नैतिक संस्कार आणि बोध देणारी ही कथा प्राणि(व्यक्तिरेखा) सृष्टींच्या माध्यमातून मांडलेली असते. म्हणून तिला बोधकथा असे संबोधतात.

वन्यपशू, पाळीवप्राणी, मनुष्य आणि प्राणी, पक्षी, मासे, सिंह, वाघ, कोल्हा, बकरी, ससा, बेडूक, कासव इत्यादी प्राणी बोलतात, चमत्कार करतात, झुंजतात, माणसास उपयुक्त ठरतात, मदत, सहकार्य करतात अशा कथांतून यांचा वावर आढळतो. मनोरंजन, उद्‌बोधन आणि जीवनमूल्ये प्रस्थापित करणे, विनोद-उपरोधातून मानवी मनाचा ठाव घेणे, व्यावहारिक आशय व्यक्त करणे, मानवीस्वभावाचे दर्शन घडवणे, चातुर्य आणि बुद्धीमत्तेचा विजय घडवणे, समाजात नीतिमूल्ये आणि वैचारिक बोध प्रसारित करणे हे या कथांचे कार्य म्हटले जाते. लबाड कोल्हा, गर्विष्ठ वाघ, डूख धरणारा नाग, कुत्सितवृत्तीचा कावळा, चपळ ससा, धीम्म कासव, सुंदर मोर, बोलका पोपट असे पशू पक्षांवर मानवी स्वभावाचे आरोपण करून लौकिक मानवी-जीवनातील स्वभावदर्शन प्राणीकथा (बोधकथा) करतात. त्यामुळे कथा श्रवण करताना एक प्रकारे मनोरंजनासह बोधपूर्ण संस्कार लोकांमध्ये रुजवण्याचे कार्य या कथा करतात.

'मौखिक लोककथा' (उत्तरार्ध) या विभागातील दैवतकथा, व्रतकथा, परीकथा, कल्पितकथा, बोधकथा, चातुर्यकथा यांचा अभ्यास करण्यापूर्वी आपणास उपरोक्त कथाप्रकारचा धावता परिचय असणे महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे संग्रहित २१ कथांचा अभ्यास करण्यास हा धावता आढावा उपयुक्त ठरणार आहे. मूर्ख लाड आणि धूर्त राऊत, बाणाईसाठी मेंढपाळ होणारा देव मल्हारी, पद्मिनी राणी, चौसष्ट योगिनी, आदित्य राणूबाई, महालक्ष्मीची पावले, कुत्रीचे आणि पोटुशीचे डोहाळे, निळावंती, वनराणी हरिणी, जादुचं मडकं, चद्रंकला, जावई-सासरा, ठगास महाठग, सातवाहनाची कथा, चोर, महिषासूरमर्दिनी या सर्वच कथांचा परिचय क्रमाक्रमाने करून घेता येईल. या कथांची मौखिक परंपरा, लोकमानस, श्रद्धा, रूढीपरंपरा आणि कल्पितभावजीवन यांच्या परिप्रेक्ष्यात विचार करणे गरजेचे आहे. या कथांची दीर्घ परंपरा असून त्यापैकी ही काही नमुनेदार उदाहरणे आहेत.

**१४) मूर्ख लाड आणि धूर्त राऊतः - (लोकचरित्र - दृष्टांतकथा)**

या कथेत मूर्ख व्यापारी लाड या नावाचा असून त्याला फसविणारा धूर्त शिपाई राऊत यांचा दृष्टांत घेण्यात आला आहे. व्यापारी लाड आपल्या बायकोला घोड्यावर बसवून देशांतरी जातो. शिपाई गडी वाघराऊत (वाघ) या नावाचा असून तो उत्तम घोडेस्वार असतो. लाड त्यास आपले आडनाव दहावाघराउत असे सांगतो.

धूर्त राऊत त्यास विचारतो की, "तुम्हास कशाची भीती वाटते?" लाड म्हणतो - "प्राण्याची भीती वाटते."

लाड राउतास विचारतो की, "तुला कशाची भीती वाटते?" धूर्त राऊत उत्तर देतो - "मला गोगलगायीच्या शिंगाची भीती वाटते."

पुढे मोठी नदी आडवी येते. लाड शिपाई राउत यास नदी पार करण्याची विनंती करतो. जर मी आधी गेलो तर हा धूर्त राउत (वाघ) आपणी पत्नी पळवून नेईन. म्हणून तो लाड शिपायाला आधी माझा पत्नीस घोड्यावर बसवून नदीच्या पलीकडे सोडून ये. मग मला तिकडे घेऊन जा असे सुचवतो.

वाघ राऊत (शिपाई) त्या मूर्ख लाडाच्या पत्नीस घोड्यावर बसवतो. नदीपार करतो. आणि सुंबाल्या करून पळून जातो. मूर्ख लाड पाण्याच्या भीतीने पळत सुटतो. लाडाची बायको खुशीने वाघराऊतासोबत जाते. मर्दासोबत संसार करण्यास तिला धन्यता वाटते.

'मूर्ख व्यापारी आणि धूर्त राऊत' या कथेतून लोकमानसात एक दृष्टांत (उदाहरण) प्रसारित केला आहे. विश्वास ठेवून लाडाने पत्नी धूर्ताच्या स्वाधीन केली. त्याचा भित्रेपणा आणि मूर्खता तसेच धूर्त वाघराउताची वृत्ती प्रकट होते. केवळ तू एक वाघ तर मी दहावाघ असे म्हणून चालत नाही तर वाघासारखी शूरता मूर्ख लाड व्यापाऱ्यात नाही. या स्वभाव दोषांचे दर्शन या कथेतून घडते.

**१५) बाणाईसाठी मेंढपाळ झाला देव मल्हारीः (दैवतकथा)**

महाराष्ट्रातील मल्हारी-मार्तंड हे दैवत लोकदैवत म्हणून लोकमनाचा श्रद्धाशील विषय आहे. मल्हारीच्या दोन पत्नी म्हाळसा आणि बाणाई. म्हाळसा वाण्याची तर बाणाई धनगराची कन्या! चंदनपूरच्या जंगलात मेंढपाळाच्या कळपात तेजा पुंजका असलेली बाणू जन्माला येते. ती शिवभक्त असते. जंगलात मेंढ्याबरोबर वाढते. वयात आल्यावर जेजुरीच्या गडावर रांगडी बाणू जाते. दुपारी भोजन आटोपून मल्हारी देव आणि म्हाळसा सारीपाट खेळत असतात. बाणाई भुर्जपत्रावर मल्हारीला सांगावा धाडते. मल्हारीला बाणूची ओढ लागते. त्याचा जीव पाखरासारखा उडतो आणि म्हाळसाचा जीव कावराबावरा होतो. बाणूच्या ओढींन मल्हारी धनगरांच्या वस्तीवर येतो. बाणूच्या घरी नोकरी-चाकरी करतो, मेंढरे हाकतो. एकदा मेंढर चारताना वाघरू येते. मेंढर खाऊन टाकते. बाणू त्याची टिंगल करते. त्याला फैलावर घेते. "बांगड्या घाल हातात आनं भंडारा फास तोंडाला. माझी मेंढर आणुन दे म्हसन्या!" असे म्हणून मल्हारीवर चवताळते.

मल्हारी मेंढर पूर्ववत जिंवत करतो. "माझी बायको व्हशीन का? आता फट्‌दिशी जिती करतो मेंढर!" बानूला आश्चर्याचा धक्का बसला. तिला मल्हारी देवाची किमया कळली. बाणू-मल्हारीचा विवाह होतो. जेजुरी गडावर बाणूसाठी देवानं वेगळा महाल बांधलेला असतो. मल्हारी धनगरांचा जावई झाला.

"जेजुरीचा गडाचा कळस सोन्याचा
मल्हारी देव नवरा म्हाळसाचा।।"
अशी गाणी ऐकून बाणू मोठी झालेली आपला जन्म
मल्हारीसाठीच झाला त्यातून धनगराची बानू मल्हारी
देवाची जेजुरीची राणी झाली. तिची शिवभक्ती फळाला
आली. सर्व धनगर आता गाण गाऊ लागले.
जेजुरी गडाला नऊ लाख पायरी!
बाणूसाठी धनगर झाला देव मल्हारी!!
येळ कोट येळ कोट जय मल्हार!!

अशी ही दैवतकथा वीर कथा आहे. मल्हारी (खंडोबा) हा जेजुरीचा 'वीर' असून महाराष्ट्राचे आराध्यदैवत आहे. लोकदैवत म्हणून त्याची ही कथा दैवतकथा असून मराठी मनातील लोकश्रद्धेचा संदर्भ त्याला प्राप्त झाला आहे. 'वीर' देवतांचा प्रभाव लोकसंस्कृतीमध्ये-कुलदैवतासारखाच असून त्यामागे खंडोबा या देवतेची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागते.

**१६) झाली पद्मिनी पाताळाची राणी (दैवतकथा): -**

नीलमणी आणि पद्मिनी ही पाताळ लोकाची राजाराणी. नाग नीलमणी हा शंकराचा भक्त-त्या दोघांचे प्रेमळ जुळणे म्हणजे धरतीचे डोलणे. एकदा नीलमणी शंकराच्या पूजेस बसला. सोमवारी तो एक सहस्त्र बिल्व दले शंकरास अर्पण करीत असे. एकदा तप करताना पद्मिनीस त्याच्या तेजाची भूरळ पडते. ती कामविव्हल होते तिचे मन विचलित होते. पूजेत खंड पडला म्हणून नीलमणी तिच्यावर रागवला त्याने पद्मिनीला असे न करण्याचे बजावले. पद्मिनीने मात्र पुन्हापुन्हा तेरा वेळेस अशीच चूक केली. नीलमणी संतापले, लाल झाले. संतापात म्हणाला, "माझ्या पूजेचे तू तीन तेरा वाजवले. आता मीच तुझे तीन तेरा वाजवतो." त्याने शाप दिला "आज रात्री तू नागपूरच्या नाग ठाण्यावर शिळा होऊन पडशील. नागापूरच्या शेतकऱ्याच्या पोटी जन्म घेशील." पद्मिनी घाबरली, नागाचे पाय धरू लागली, "स्वामी मला क्षमा करा तुम्हीच माझे शंकर स्वामी माझी भक्ती वेडीच! क्षमा करा, स्वामी!"

नीलमणीला तिच्याशिवाय करमत नव्हते. संतापाच्या भरात शाप दिला होता. त्यालाही वाईट वाटले तो म्हणाला "तुझ्यासोबत मी राहीन...तेरा वर्षांनी तू मला भेटशील...तेरा चुकांचे प्रायश्चित भोगलेच पाहिजे तू जा!" ती अदृश्य झाली. नागापूरच्या नागाठाण्यावर आदळून शिळा होऊन पडली. नीलमणी विरहात होता तोही नागठाण्यावरील वारुळात वास्तव्य करू लागला रात्रंदिवस तो त्या शिळेस विळखा घालून बसत असे.

नागापूरच्या शेतकऱ्याच्या घरी सुंदर कन्या जन्मते. तीच ही पद्मिनी. डोहाळे लागलेली शेतकऱ्याची बायको चवळीची भाजी मागते. चवळी शोधत शेतकरी नागाठाण्याच्या तळ्याजवळ

येतो. चवळी तोडताना नाग फुंत्कार टाकतो. नाग म्हणाला, "चल मागे सरक, तुला एक मुलगी होणार आहे ती जर मला देशील तर भाजी घे!"

शेतकरी होकार देतो. बारा बर्षांनी मी येईन तुझी मुलगी मागायला असे म्हणून नाग निघून जातो. बारा वर्षांनी पद्मिनी उपवर झालेली असते. शेतकरी तिला नागदेवताच्या दर्शनासाठी तळ्याजवळ घेऊन जातो. नागपंचमीचा दिवस नाग कुठे दिसेना पद्मिनीला काठावर एक कमळ फुललेले दिसते. गाणं गुणगुणत कमळ तोडण्यास पुढे जाते.

"आली नागपंचमी गाते नागाची गाणी
नशिबान झाली बाई पाताळाची राणी!"

तळे दुंभगते आणि कमळातून नीलमणी वर येतो. पद्मिनीचा हात धरतो. राणी पद्मिनीला तेरा वर्षांच्या विरहानंतर पाताळात घेऊन जातो.

नागलोकांचे राज्य यावरून ही नीलमणी नागाची गोष्ट. नागापूर त्या दृष्टीने कुठलातरी जुना इतिहास व्यक्त करणारे स्थान. या कथेतून चमत्कार, दैवतांचा संचार, पृथ्वी ज्या नागाच्या डोक्यावर डोलते ती श्रद्धा, पद्मिनी ही नागकन्या तिचा हा इतिहास. यामध्ये सत्य इतिहास अवगुंठित अशा अल्प स्वरूपात येतो. कथेला भावनेचा, अद्‌भुततेचा, कल्पित विचारांचा पसारा विळखा घालतो. अशी ही लोकमानसातली लोकदैवतांच्या श्रद्धेचा खतपाणी घालणारी पद्मिनी आणि नीलमणी राजाराणीची कथा आहे.

## १७) चौसष्ट योगिनींची पूजाः (व्रतकथा)

ग्रामीण महाराष्ट्रात झेटिंग, भूत पिशाश्च, वीरमुंजे, सातीआसरा आणि चौसष्ट बहिणी, म्हसोबा अशी लोकदैवते पूजली जातात. त्यांची व्रतवैकल्ये केली जातात. 'साती आसरा' ही स्त्रीमनातील आराध्यदेवता आहेत. त्यांचे व्रत करण्यासाठी योजिलेली ही व्रतकथा आहे. विशेषतः वैदिक ब्राह्मण दैवते आणि लोक दैवते यामध्ये भेद असतो. म्हणून प्रस्तुत 'चौसष्ट योगिनी आणि सातीआसरा' या लोकदैवतांची पूजा ब्राह्मणाच्या सुनेकडून करून घेतली. असा या दैवतांचा प्रभाव पाडणारी ही कथा आहे.

एक आटपाटनगरात ब्राह्मणाचा मुलगा आणि सून असे सदाचारी कुटंब राहाते. श्रावणाच्या एक अवसेच्या रोजी आजे सासऱ्याचे श्राद्ध असते. त्याच दिवशी सूनेला मुलगा होतो. श्राद्ध वाया जाते मुलगा मरून जातो. अशी एक..दोन..नव्हे सात बाळंतपणं वाया जातात. ब्राह्मणाची सून बिचारी दुःखी होते. सासरा तिला घरातून हाकलून लावतो. "तुझं तोंड काळं कर.....सात मुलं खाल्लीस...तरी नाही मेलीस!"

बिचारी सून डोंगरात निघून जाते. सात रानं तुडवते तिला 'झोटिंग' (भूत) ची बायको भेटते. तिची विचारपूस करते. "बरं झालं मी तुला भेटले माझा नवरा झोटिंग भेटला तर मारून टाकील."

"मी मरणासाठीच आले आहे दुःखी आहे मी!"

ती झोटिंगच्या बायकोला आपलं दुःख सांगते तिचं दुःख ऐकून झोटिंगची बायको हेलावली. दया आली तिला पुढचा मार्ग सांगत शंकराच्या पूजेची, व्रताची माहिती देऊन ती रवाना करते.

एका नदीच्या काठी बेलाच्या झाडाखाली शंकराची पिंडीची बेलपत्री वाहून पूजाअर्चा करण्याचा सल्ला देते. तेथे रात्री तुला झाडावर चढून बसायचे म्हणजे सातआसरा, चौसष्ट योगिनी मध्यरात्री पूजेला येतील त्या म्हणतील अतिथी कोण? तेव्हा तू ''मी आहे ब्राह्मणसून'' असं सांगायचा सल्ला देते. या व्रताची-पूजेची तयारी ब्राह्मणसून करते. तिला सातीआसरा आणि चौसष्ट योगिनी भेटतात. व्रताचे माहात्म्य कथन करतात. तिची सात ही लेकंर जिंवत होतात. व्रतामुळे ब्राह्मणसून सुखी होते.

अशी ही सातीआसरा (जलदेवता) आणि चौसष्ट योगिनी (चौसष्ट कला) या स्त्रीदैवतांची ही कथा आहे. ग्रामीण भागात स्त्रिया या देवतांना खण, नारळ, खारीक, खोबर, साखर फुटाणे, बांगड्या, करंडाफणी वगैरे अर्पण करतात. नदीकाठी करायचे हे व्रत सर्वत्र प्रचलित आहे. या स्त्रीदैवतांच्या उपासना, व्रतपूजेची ही कथा आहे. ती पिढ्यांन्पिढ्या प्रचलित असून आजीबाईच्या गोष्टीत येते.

**१८) आदित्य राणूबाई (व्रतकथा): -**

सूर्यव्रताच्या कथा लोकजीवनात प्राचीन काळापासून प्रचलित आहेत. सूर्यदेवता ही प्रकाशाची, समृद्धेची देवता मानली जाते. ग्रामीण भागात देवकन्या, साती आसरा आणि आदित्य राणूबाई यांची कहाणी आणि व्रत श्रावण महिन्यात केले जाते. एका ब्राह्मणाला नागकन्या, देवकन्यांचा मेळा जमलेला दिसतो. त्या आदित्य राणूबाईची कहाणी ऐकत होत्या त्यांना ब्राह्मण भेटतो. त्यांच्याकडून ही कहाणी आणि दैवतेचे व्रत करण्याची माहिती घेतो. त्या व्रताचा वसा घेऊन पाळण्याची शपथ ब्राह्मण त्या देवकन्यांना सांगतो ब्राह्मणाला एक देवता व्रतकथन करते.

"श्रावण महिन्यात प्रत्येक आदित्यवारी पहाटे उठून स्नान करून विड्याच्या (नागबेल) पानावर चंदनाची राणूबाई काढावी. सहा रेघांचे मंडळ...सहा सूतांचा तातू करून विधी पूजा करावी. नैवेद्य द्यावा, दानधर्म करावा. रथसप्तमीला व्रताची सांगता करावी. शुद्धता पाळावी, सहा महिने दक्षता घ्यावी. "

ब्राह्मणाने निष्ठेने व्रत केले, राणूबाईची कृपा झाली. सूर्यदेव प्रसन्न झाला, त्याच्या दोन उपवर मुली लग्नाच्या होत्या; गोदावरी आणि दुसरी धाकटी कावेरी! त्यांना सूर्यकृपेने राजपुत्र आणि प्रधानपुत्र मागणी घालतात. गोदावरी राणी होते आणि कावेरी प्रधानाची पत्नी होते. त्यांचा संसार सुरू होतो. परंतु ब्राह्मणाने मुलींना जे राणूबाईचे व्रत सांगितले असते ते व्रत राणी गोदावरी नीट पाळत नाही. तिचा राजा युद्धात राज्य हारतो. गोदावरीनं कथा-व्रत नीट केलं नाही म्हणून ही अवकृपा झाली. गोदावरी संकटात सापडते दारिद्र्य येते. ती धाकटी बहीण कावेरीकडे येते. कावेरी मात्र हे कथाव्रत नियमाने करते. ती गोदावरीला कपडे देते. पैठणी नेसवून तिला व्रतास बसविते. पाचव्या आदित्यवारी हे व्रत कावेरी कथा सांगून नियमानुसार पार पाडते. गोदावरी कहाणी ऐकते. अंतःकरणातून सूर्यनारायणाची पूजा करते. सूर्यव्रत फळाला येते तिकडे राजा लढाई जिंकतो आणि राज्य परत मिळते. व्रतामुळे राजाला आणि राणी गोदावरीला पूर्व वैभव पुन्हा मिळते. सूर्यव्रताची चूक केल्याने तिच्यावर सूर्यनारायणाची अवकृपा झाली होती. घेतल्या व्रताचा

वसा टाकू नये अशी ही साठा उत्तराची कहाणी साता उत्तरी सुफळ संपन्न होते. व्रत, पूजा, विधी यांचा संस्कार करणारी ही कथा लोकश्रद्धा, लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब ठरते.

**१९) महालक्ष्मीची सोनपावलं (व्रतकथा) :**

महालक्ष्मीच्या व्रताची ही कथा आहे. हे व्रत महाराष्ट्रात सर्वत्र प्रचलित आहे. ज्येष्ठा-गौरी आणि महालक्ष्मी व्रताची ही मराठी लोककथा प्रचारकथाच असून त्यातून देवतांच्या उपासनेची परंपरा जोपासलेली आहे.

एक राजा असतो. त्याच्या दोन राण्या एक आवडती आणि दुसरी नावडती. आवडतीच्या तोरा खूप – नावडती बिचारी गरीब, शांत – दोन्हीच्या दास्याही तशाच असतात.

एके दिवशी राजघाटावर दोन भिकारणी येतात. त्या आवडत्या राणीच्या दासीजवळ निरोप देतात.

"तुमच्या आवडत्या राणीला सांगा, तुमच्या मावशा आल्या आहेत. त्या घाटावर बसल्या आहेत."

दासी राणीला सांगते. तुमच्या मावशा तुम्हाला घाटावर भेटू इच्छितात. राणी दासीला दरडावते. मूर्ख आहेस तू! कोणीच नाहीत माझ्या मावशा. आवडती राणी त्यांच्याकडे दुर्लक्ष करते.

त्यानंतर घाटावर नावडत्या राणीची दासी पाणी भरण्यासाठी येते. तिला त्या भिकारणी सांगतात. तुझ्या राणीला सांग तुझ्या मावशा राजघाटावर तुला भेटू इच्छितात. ती दासी नावडतील ही गोष्ट सांगते. नावडती बिचारी गरीब. परंतु दयाळू! त्या दोघींना घेऊन दासी घरी घेऊन येते.

राणीचा उमाळा दाटून येतो. ती मावशांचं स्वागत करते. जोंधळ्याच्या कण्या, वरणाचं पाणी यांचा पाहुणचार करते. म्हाताऱ्या तृप्त झाल्या व ढेकर दिला.

म्हाताऱ्यांनी नावडतीला सप्तमीच्या दिवशीचे महालक्ष्मीव्रत करण्याचा सल्ला दिला. राणी म्हणाली, "मी गरीब! माझ्या पोटाची मारामार. मी काय करणार व्रत!" म्हाताऱ्या म्हणाल्या, 'भोपळ्याची कथली आणि पिठाची आंबील तयार कर'. राजाला निमंत्रण दे.

रांगोळ्या कढून व्रताची तयारी केली. गव्हाची खीर केली. राजा आला. त्यामुळे नावडती सुखावली. सोळा भाज्या, सोळा चटण्या, रंगीत फुले, कथली-आंबिल्या नैवेद्य महालक्ष्मीला दाखवला. आवडत्या राणीच्या कानावर ही खबर गेली. ती संतापली; भडकली; राजाशी भांडली. भांडताभांडता पाय घसरून चिखलात पडली. ती डुकरीण झाली!

आपली सवत डुकरीण झाली हे पाहून नावडतीला वाईट वाटले. तिने राणी पूर्ववत व्हावी यासाठी देवी लक्ष्मीचे व्रत, पूजा केली. स्वतः उपाशी राहिली. रात्री तिच्या स्वप्नात देवी महालक्ष्मी येते. देवी तुझ्या कोपाने माझी सवत आवडती राणी डुकरीण झाली. तिला पूर्ववत

राणी करा. त्याशिवाय मी उपवास सोडणार नाही. तिला सोबत घेतल्याशिवाय माझ्या व्रताला आणि उपवासाला काय अर्थ ?

अग ती खाष्ट! ती तुला छळते, त्रास देते. तुला तिचा कळवळा का येतो. तिनं घाटावर आमचा अपमान केला. देवीचा अपमान! तुझ्यासाठी आम्ही तिला पूर्ववत करतो. तू अस्सं कर, काकडी-हरबऱ्याच्या डाळीची खिरापत कर. डुकरीणीच्या अंगावर शिंपडून टाक. ह्या प्रसादाने पूर्ववत होईल तुला छळणार नाही. इतकं सांगून स्वप्न भंग झाले.

नावडतीने स्वप्नातल्या दृष्टांताप्रमाणे खिरापत केली. डुकरीणी पूर्ववत राणीच्या रूपात आली. तिने नावडतीचे पाय धरले. राजाराणीने नावडतीला पूर्ववत राणीचा दर्जा दिला. ते सर्व सुखी झाले. महालक्ष्मीच्या व्रतानं सुख प्राप्त झाले.

## २०) डोहाळे : कुत्रीचे आणि पोटुशीचे (व्रतकथा) :

ही एक दीर्घ लोककथा असून 'डोहाळे' या व्रताची महती आणि इच्छा पूर्ण करण्याची चिकित्सा करणारी कथा आहे. कुत्रीला डोहाळे लागतात. तसेच ब्राह्मणाच्या सुनेलाही डोहाळे लागलेले असतात. दोघींनाही ही खीर खाण्याची इच्छा असते. ब्राह्मणाची सून गरीब असते. तिला घरी खीर करणे शक्य नसते. कुत्री तिच्याशी बोलू लागते. डोहाळे पुरवण्यासाठी खीर खाण्याची इच्छा प्रकट करते.

कुत्रीनं एक शक्कल केली. "मी आणून देते खीरसाठी सामान तू खीर कर. मला थोडी दे. आपले दोघांचे डोहाळे पुरवले जातील." कुत्रीने गवळ्याच्या घरून दूध, वाण्याच्या दुकानातून गूळ आणून दिला. ब्राह्मण सूनेनं घरातले थोडे तांदूळ टाकून खीर केली. मात्र तिने एकटीनेच खीर खाल्ली. कुत्रीसाठी कणभरही ठेवली नाही.

रात्री कुत्री खीर खाण्यासाठी येते. ब्राह्मणसून तिला हाकलून देते. हाडऽऽ हाडऽऽ करते. कशाची खीर जा पळ.

कुत्री संतापते. तिथून निघून जाते. एका जुनाट विहीरीजवळ जाते. तिला दोन सुंदर सोनेरी केसांच्या जुळ्या मुली होतात. तर ब्राह्मणसुनेला मात्र कुत्र्याची पिल्लं होतात.

कुत्रीनं ब्राह्मणसूनेला शाप दिलेला असतो. तुझी पिल्लं मला आणि माझी पिल्लं तुला. चमत्कार घडतो. कुत्रीची वाणी खरी ठरते.

कुत्री विहीरीतच मुलींचा सांभाळ करते. त्या सुंदर सोनेरी केसांच्या जुळ्या मुली वयात येतात. एकदा राजकुमार आणि त्याचा प्रधानपुत्र विहीरीजवळ येतात. त्यांना त्या सुंदर कन्यांची भुरळ पडते. या जलकन्या की देवकन्या? असा प्रश्न त्यांना पडतो. राजपुत्र मोठीशी लग्न करतो. प्रधानपुत्र छोटीशी लग्न करतो. कुत्री विहिरीजवळ येते. तिला मुली दिसत नाहीत. फिरता फिरता तिला काही दिवसांनी दोन्ही मुलींचा शोध लागतो.

धाकटी मुलगी प्रधानाच्या घरात मंचावर होती. तिनं कुत्रीला (मायला) ओळखली नाही. ती फळं खात होती. हातातली सुरी कुत्रीला मारुन फेकली. ती जखमी झाली. कुत्री पळाली ती थेट राजमहालात गेली. मोठ्या मुलीनं (राणीनं) तिची जखम धुतली. हळद लावली. तिनं

आईला ओळखलं होतं. कुत्रीला पलंगावर झोपवली. राजपुत्र म्हणाला, "ही कोण झोपली आहे पलंगावर?" ती माझी आई आहे. त्यानं पांघरुण उचलून फेकलं तर चमत्कार सोन्याचा ढीग निघाला.

राजपुत्र मोठीला (राणीला) म्हणाला तुझ्या माहेरी जाऊ या! आता माहेरी कुठे जावे? मोठ्या मुलीला प्रश्न पडला. राणीचा मेणा निघाला. मीनाक्षी मेण्यात रडू लागली.भोयांनी नदीकाठी मेणा उतरवला. मीनाक्षी लोटा घेऊन बाजूस गेली. तिला वारुळ दिसले. तिने वारुळात हात घातला. तिला वाटले नाग दंश करील. आपण मरुन जाऊ. सुटका होईल. नागमणी असलेला भुजंगमध्ये होता. त्याच्या डोक्यावर बेंड झाले होते. ते धक्क्यामुळे फुटले. नागाला हलकेसे वाटले. त्याचा नागमणी लखलखू लागला. तो प्रसन्न झाला. मुली माग तुला काय पाहिजे! ती म्हणाली, मला फक्त दोन दिवसांचे माहेर पाहिजे. मुलीऽऽ रडू नकोस! त्या टेकडी पलीकडे एक महाल आहे. त्यात राजाला घेऊन माहेरी राहा. जावयाचा सत्कार कर! तुझ्या इच्छा पूर्ण होतील!

ती परत तळ्यावर येते. भोई तिचा मेणा घेऊन त्या महालाकडे येतात. धर्माच्या बापाने तिचे माहेरपण केले. राजपूत्र खूष झाला. रत्न, माणके, जवाहिर, पैठणी, उंची कापडं, आदर सत्काराने ती भारावून गेली.

राजपुत्राला सासरहून मिळालेला सन्मान पाहून प्रधानपुत्राने धाकटीला माहेरी जाण्याचा हट्ट धरला. धाकटीने मोठ्या बहिणीकडून सर्व समजून घेतलं. प्रधानपुत्राचा ताफा निघाला. मुक्कामस्थळी धाकटी मिनाक्षी लोटा घेऊन बाजूस गेली. वारुळात हात घातला. भुजंगाने तिला कडाडून चावा घेतला. तिचा देह कोसळला. काळानिळा पडला. मुडदा पाहून प्रधानपुत्र हबकला. मोठ्या दुःखाने ताफा परत निघाला.

धर्माचा की कर्माचा बाप? बापाचे प्रेम मोठे! माहेरची माया मोठी! मोठ्या राणीला तिच्या प्रेमाचे फळ मिळाले. धाकटीला मात्र मृत्यू!

ही व्रतकथा-बोधकथा आहे. 'कुत्रीचे डोहाळे' आणि 'ब्राह्मणसुनेचे डोहाळे' यांची ही कथा. 'जीव' श्रेष्ठ, भूतदया, प्राणीमात्राविषयीचे प्रेम व्यक्त करणारी आहे. चमत्कार, अद्‌भुतता आणि रंजकतेसह बोध देणारी ही कथा मौखिक परंपरेने गावागावात सांगितली जाते. नाती-गोती; प्रेम आणि आदर मातृपितृ भक्तीच्या संस्कारांची ही गोष्ट मानवी सुखदुःखाची आणि दैव-नशीबासह समृद्धीची ओढ उत्पन्न करते. जुळ्या बहिणी, कुत्रीचे डोहाळे – पोटुशीचे डोहाळे, यातून कुत्रीनं ब्राह्मणसुनेचे डोहाळे पुरवले. मातृत्त्वाची ही मूर्ती कुत्री! तिचा शाप पोटुशीला भोवला.

**२१) श्रावण साखळी (परीकथा) :**

चंदनपूर गावचा धार्मिकवृत्तीचा शेतकरी. त्याला दोन मुलं आणि एक मुलगी (कमळी) असते. एकुलती एक लाडकी कन्या.

गावाबाहेर एक सुंदर तळे. तळ्याकाठी जुनाट पिंपळ. त्याचे खाली भैरवाची शेंदरी पाषाणमूर्ती आणि मोठा पार होता. शेतकरी आणि त्याची बायको लहान मुलास सोबत घेऊन काशीयात्रेस जातात. मुलीला मोठा मुलगा आणि सून यांच्या ताब्यात ठेवून पुढे निघतात.

सूनबाई कमळीला त्रास देते. घरची सगळी कामं करायला लावते. कपडे, धुणे-भांडे, रांजणभर पाणी भरणे. बिचारी कमळी कष्ट करून थकून जाते. कोमेजून जाते. दु:खी होते. तिचा छळ सुरू होतो. बिचारी कमळी – श्रावण साखळी – सुकली केळीसारखी.

सूनबाईला मूलबाळ नाही. ती गावात एका जोगणकडे जाते. जोगण तिला अंगारा देते. मुलबाळ होण्यासाठी मार्ग सुचवते.

"कुवारी पोरीच्या रक्तात पातळ भिजवायचं. अवसेच्या रात्री गावाबाहेर तळ्यावर नागवं स्नान करायचं, पिंपळप्रदक्षिणा एकवीस वेळा घालयच्या. गावशिवेवर त्या पातळासह पूजा करायची. एवढं केलं की पाळणा हलला."

सूनबाई घरी येते. नवऱ्याला मूलबाळ होण्यासाठीचा मार्ग सांगते. तो घाबरतो. कुवारी मुलगी म्हणजे बहीण कमळीचा जीव घ्यायचा. पण बायको त्या विहीरीत जीव द्यायची धमकी देते. तो पहिल्यांदा कोंबडा मारतो. रक्तात पातळ भिजवतो. घरी येतो. बायको म्हणते कमळीचे शिरकमळ आणा. शेवटी तो कमळीला मारतो. तिचा देह मातीत गाडून शिरकमळ घेऊन पातळ रक्तात भिजवून घरी येतो. बहिणीची हत्या करतो.

त्याची बायको त्या अवसेच्या रात्री तळ्याकाठी विवस्त्र आंघोळ करते. पिंपळाला एकवीस प्रदक्षिणा घालते. नणंदेचं शिरकमळ तळ्यात अर्पण करते. पूजा विधी करून गावशिवेला लिंबू-नारळ वाहते.

सूनबाई पहाटे घरी परतली तेव्हा तळ्यावर सोनकमळ उगवलं. धड आणि शिर असं लगटलं आईवडील लहानभाऊ गावच्या यात्रेकरुंसह काशीवरून घरी परत येतात. कमळी दिसत नाही. ती मावशीकडे गेल्याचं खोटंच मायबापांना सांगतात.

धाकटा भाऊ आंघोळीसाठी तळ्यात गेला. सोनकमळ त्याच्याजवळ फेर धरते. बोलू लागते-

मायबाप काशीस गेले| इकडे भैनीस मारले|<br>लुगडे रगतात भिजवले| भाऊराया||

कमळ हाती लागत नाही. तो घरी येतो. बापाच्या कानात ही अघटीत गोष्ट सांगतो. बाप तळ्यावर आंघोळीसाठी जातो. 'सोनकमळ' फेर धरू लागलं, बोललं.

मायबाप काशीस गेले| भावाने भैनीस मारले|<br>लुगडे रगतात भिजवले| बाबाजी हो||

पण कमळ हाती लागत नाही. तो घरी येतो. बायकोच्या कानात ही घटना सांगतो. तशी तिची माय तळ्यावरच आंघोळीसाठी जाते. कमळ फेर धरते बोलू लागते-

तुम्ही काशीस गेले। भावाने भैनीस मारले।<br>लुगडे रगतात भिजवले। मायबाई।।

माय सर्व काही उमगली. सूनबाईची करतूत लक्षात आली. पोराची करणी लक्षात आली. दुःखाने मात्र रडू लागली --

"ये माय हरणे, ये कमळे, ये वं माय, तू पोटचा गोळा, तुझ्यासाठी जीव झाला येडा."

आणि काय चमत्कार! सोनकमळीतून कमळी हळूहळू वर आली जशी श्रावण साखळी! मायला बिलगली! मायलेकी घरी येतात. म्हातारा सुनेला-मुलाला घराबाहेर काढतो.

सोनकमळ, (कमळी) ही जलपरीसारखी तळ्यातून येते. तिचा पुनर्जन्म होतो. चमत्कार घडतो. ही गोष्ट नणंद आणि वहिनी, सासू-सासरे या नात्यागोत्यांची नैतिक मूल्ये आणि संस्कारांची बोध कथाच आहे. स्वार्थांधतेमुळे सूनेने नणंदेचा खून केला. परंतु 'कन्या' ही सोनकमळी आहे. एखाद्या परीसारखी तिची ही कथा. अद्‌भुतरम्यता आणि व्यावहारिक जीवनातील नाती-गोती-नीती, संस्कार प्रस्थापित करते.

## २२) कथा निळावंतीची (परीकथा) :

एक शेतकऱ्याची मुलगी निळावंती - तिला पाखरांची भाषा कळते. पशू-पक्ष्यांची भाषा बालपणापासूनच ती शिकते. त्यांच्या गोष्टी ऐकून तिला धनलाभ होतो. अशी ही दैवीशक्ती प्राप्त झालेल्या निळावंतीची लोककथा महाराष्ट्रात प्रचलित आहे. निळावंती लहानाची मोठी होती. बालपणापासून तिला पशूपक्ष्यांचा लळा असतो. ती शेतात-मळ्यात त्यांची भाषा समजून घेते. ती वयात येते. तिचं लग्न होते. सुखाचा संसार सुरू होतो.

पावसाळा सुरू होता. नदी दुथडी भरून वाहत होती. पूर वाढतच होता. रात्री ती खाटेवर नवऱ्याचे पाय चेपत होती. त्या भयाण रात्रीत आडोशाला कोल्हे बसले होते. त्यांचा संवाद निळावंती ऐकते. "नदीत मुडदा वाहतोय... मुडद्याच्या कनवटीला नऊ लाख मोलाचं रत्न आहे. जो कुणी हा मुडदा पकडील तो नवकोट नारायण होईल."

कोल्ह्यांची बोली निळावंतीला कळली. ती त्या भयाण रात्री नदीकाठी गेली. मुडदा पकडला. त्याच्या कनवटीचं रत्न घेऊन घरी आली. तिच्या मागे नवरा लपतछपत जाऊन हे पाहतो त्याला वाटते आपली बायको हडळ आहे. ही प्रेत पकडते. प्रेत खाते. तो तिला सोडून देण्याचा विचार करतो. सासरा निळावंतीला माहेरी सोडण्यासाठी तिला घेऊन जातो. प्रवास लांबचा असल्याने दुपारी जांभळाच्या झाडाखाली जेवणासाठी सासरा-सून बसतात. झाडावर भारद्वाज पक्षांचं जोडपं बसलेलं असते. पक्षीण गर्भार असते अंडी घालण्याच्या तयारीत असते. त्यांची बोली निळावंती ऐकते.

पक्षी म्हणतो - "आता आपण झाड बदलू तू अंडी घालशील तो विहीरीतला नाग तुझी अंडी खाऊन टाकीन."

पक्षिणी - "जाऊ मग! पण मला लोणचं खायची इच्छा आहे. ही माणसं जेवून गेली की मी फोतरं चाटीन."

पक्षी - "तुला उष्टं खाऊ घालण्यापेक्षा जर कुणी ताट वाढले तर त्याला मी मालामाल करीन."

ही पक्षांची भाषा निळावंतीला कळते. ती तीन पानं वाढते. तिसरं पान कुणाचं? तर भारद्वाज (गर्भार पक्षिणीचं) पक्षाचं! निळावंती पक्षिणीला आवतनं देते. पक्षिणी जेवण करते. लोणच्याची फोड खाते. तिची इच्छा पूर्ण होते.

पक्षी पक्षिणीला सांगतो - "या विहिरीत सोन्याच्या मोहरांचं गाडगं आहे. एका रामोश्यानं ते टाकलं आहे. तुला हे आठवते काय?"

निळावंतीला ही गोष्ट उमगते. ती विहिरीत उडी घेते. गाडगं घेऊन वर येते. सासऱ्याला मोहरा देते. तो संतुष्ट होतो. निळावंतीला (सुनेला) पशूपक्षांची भाषा कळते. याची जाणीव त्याला होते. सोन्याच्या मोहरा, प्रेतावरचं ते रत्न ती सासऱ्याला देते. तो तिला परत घरी आणतो. आपल्या मुलास रागवतो -

"गाढवा तुझ्या हाती हिरकणी पण तिला पारखला नाही कुणी" 'निळावंती' ही अलौकिक दैवाची मुलगी. तिची करामत, पशूपक्ष्यांची भाषाआकलन क्षमता आणि अद्‌भूत चमत्कार तिची ही चातुर्यपूर्ण परीकथाच आहे. 'निळावंती' ही कथा लोकमानसात रुजलेली. रंजक आणि बोधककथा आहे.

## २३) वनराणी हरिणी (परीकथा) :

स्वर्गात इंद्राच्या दरबारात एक अप्सरा नृत्य करताना वारंवार चुकली. तिचे चित्त लागत नव्हते. इंद्राने कारण विचारले. ती म्हणाली - "सारखं वाटते आहे की, संसार करावा. बाळाला स्तनपान द्यावे. मातृत्वाचा अनुभव घ्यावा."

इंद्राने एक वर्षासाठी पृथ्वीवर तिला हरिणी म्हणून वनामध्ये राहण्याची - प्रपंच करण्याची परवानगी दिली. एक वर्षाने बरोबर परत स्वर्गात यायचे. ती 'वनराणी हरिणी'ची ही गोष्ट. हरिणी बनून ती अप्सरा पृथ्वीतलावर अवतरली.

चंद्रनगरीच्या राजाने जंगलात शिकार करताना ही हरिणी जिवंत पकडून नेली. राजवाड्यात तिला बांधली. राजपुत्र सकाळी उठून पावा वाजवत होता. हरिणी त्या सूरांवर तल्लीन झाली. राजपुत्राच्या हे लक्षात आले. तिची दया येऊन त्याने तिला सोडून दिले.

राजाला हे कळले. तो राजपुत्रास म्हणाला - "या अपराधाबद्दल तुला शिक्षा भोगावी लागेल एक वर्षाचा वनवास. हरिणीची भरपाई म्हणून शंभर सुवर्ण मुद्रा द्याव्या लागतील. जा एक वर्षाने ये."

राजपुत्र वनवासासाठी बाहेर पडला. नदीकाठी पर्णकुटी बांधून राहू लागला. पावा वाजवत साधना करू लागला. सूरांवर मोहित होऊन ती 'वन हरिणी' राजपुत्राजवळ येते. हरिणीने राजपुत्राला ओळखले. त्यांनी एकमेकास ओळखले. ती हरिणी सुंदर अप्सरेच्या रूपात राजपुत्रासमोर उभी राहिली. त्यांचा विवाह झाला. एक वर्ष त्याचा वनवास आणि एक वर्ष तिचा

संसार. ती पत्नी धर्म निभवू लागली. नऊ महिन्यांनी - त्या वनराणी हरिणीला मुलगी झाली तिचं नाव 'वनराई' ठेवलं. अकरा महिने उलटले. संसार सुखाचा झाला.

राजपुत्रास आता शंभर सुवर्ण मोहरा कमवायच्या होत्या. राजपुत्र व सुंदर स्त्री पाहून प्रधानाने राजास सांगितले. महाराज हे सौंदर्य तुमच्यासाठीच आहे. राजपुत्र साध्या वेषात होता. त्यांना राजासमोर आणतात.

राजा आपली अंगठी तलावात टाकतो. राजपुत्रास काढण्यास सांगतो. हा तलावात बुडाला की याची अप्सरा (वनराणी) आपली असा राजाचा बेत दिसतो. परंतु बेडकीने अंगठी तळातून काढून राजपुत्रास दिली. त्याने ती राजास दिली.

प्रधानाने दुसरी शक्कल लढवली. महाराज संगीत मैफल घ्या. त्यामध्ये या करंट्याला (राजपुत्र) पावा वाजवण्यास बोलवा. त्याच्या बायकोला (हरिणी) निमंत्रण द्या. तिच्या नवऱ्याला दूधात विष पाजून मारून टाकता येईल म्हणजे वनराणी राजाची होऊन जाईल. आपल्या सौंदर्यामुळेच युवराजावर आफत येत आहे. म्हणून वनराणी चिंतेत असते. तो सुंदर पावा वाजवतो. राजा शंभर मोहरा त्याला बिदागी देतो.

राजपुत्राला दूधाचा पेला (विषाचा) देतात. तो पिणार इतक्यात शिंक येते. पेला खाली ठेवतो. बाजूला बसलेल्या बेडकीने टुणकन उडी घेऊन ग्लासात पडली. बेडकीने जीव गमावला. तिकडून मांजर आली तिनं दूध चाटलं. तळमळत तिचा जीव गेला. प्रधानाचे पितळ उघडे पडले. राजाही तिथून निघून गेला. वनराणी आणि राजपूत्र तिथून निघतात. झोपडीत पोहचतात. तिचे एक वर्षाचे शेवटचे तीन दिवस शिल्लक असतात. शेवटी राजपुत्राला कन्या सोपवते. त्या गोंडस कन्येला घेऊन तो महानगराकडे येतो. ती हरिणी अप्सरा होऊन त्याचा निरोप घेते. स्वर्गात जाते. अशी ही हरिणीची - वनराणीची कथा.

## २४) भावाची करणी... दिव्याची जबानी (परीकथा) :

ही बहीणभावाची कथा आहे. यामध्ये 'शंकरपार्वतीचा फेरा' या लोकमानसातील अद्‌भुत चमत्काराचे वर्णन केले आहे. परीकथेतील अद्‌भुत-अलौकिक चमत्काराची ओढ लोकजीवनात खूप असते. दुःख निवारणासाठी आणि मानसिक विरेचनासाठी ह्या कथा प्रचलित असतात.

एका म्हाताऱ्या शेतकऱ्याला एक मुलगा आणि एक मुलगी असते. तो त्यांना सांभळतो. बायको मेली तरी तो दुसरं लग्न करत नाही. मुलगा चंद्रभान आणि मुलगी चंपा यांना वाढवलं. म्हातारा चंद्रभानचं लग्न करतो. मुलीचंही चांगल घर पाहून लग्न उरकतो. भावाने बहिणीला प्रेम द्यावे. तिची सण उत्सव पाहावे असं सांगतो. एके दिवशी म्हातारा इहलोक सोडून जातो.

चंद्रभानची बायको लबाड - खाष्ट, ती घराची सत्ता ताब्यात घेते. चंद्रभान शेतात राबराब राबतो. तिकडे चंपाचे ग्रह बदलतात. घराचे वाटे हिस्से होतात. दारिद्र्यात दिवस काढणे कठीण होते. दोन तीन वर्षांचा काळ लोटतो. भाऊ तिला भेटतही नाही. त्याला कळते की बहिणीचे हाल सुरू आहेत. तो दमणी गाडी जुंपतो. बहिणीला दिवाळीला आणतो. भावजयी मात्र तोंड वेडेवाकडे करते. तिला चंपा – तिची मुलं आल्याचा आनंद होत नाही.

वहिनी तिला जुनं लुगडं देते. मुलांचा नीट पाहुणचार करीत नाही. ४-५ दिवस कसे तरी निघून जातात. बहीण शेवटी मुलांना घेऊन आपल्या घरी जाऊ लागते. वहिनी कपड्यात पुरण पोळ्यांच्या शिदोरी ऐवजी 'शेणाच्या गोवऱ्या' बांधून देते. चंपाला माहेरी नीट वागणूक मिळत नाही.

ती दुःखीच परतते. रस्त्यात मुलांना भूक लागते. बिचारी चंपा काय गोवऱ्या खाऊ देईल का मुलांना ? या वेळी कैलासावर शंकर पार्वती गप्पा मारत होते. चंपाचं दुःख पाहून पार्वती म्हणाली- "चला फेरफटका मारून येऊ." "या लेकुरवाळी बाईला मदत करा." पार्वतीने हट्ट धरला. शंकर उठले नदीकाठी ते दोघे आले. त्यांनी चंपाचे दुःख दूर करण्याचे ठरविले... तथास्तु...

शेवटी चंपा हुंदके देत मुलांच्या हट्टामुळे ती गोवऱ्यांची शिदोरी सोडते... थक्क होते... काय चमत्कार पाच शेणाच्या गोवऱ्यांचे सोन्यात रूपांतर झाले. आनंदाने घरी पोहचते. नवऱ्याला सर्व हकीकत सांगते. शंकर-पार्वतीच्या फेऱ्याच्या प्रसादामुळे हाच चमत्कार घडतो.

पुन्हा श्रीमंती येते. शेतीवाडी; बैलजोडी भरभराट होते. तिकडे वहिनीला कळते की सोन्याच्या गोवऱ्या झाल्या. ती जळते... तडफडते. नवऱ्याच्या (चंद्रभान) मनात काहीबाही भरते. तुझी बहीण सोनं चोरुन घेऊन गेली. चंद्रभान रात्री अंधारात तलवार घेऊन चंपाच्या घरी तिचा खून करण्यासाठी जातो. ओसरीतला दिवा... घरातला दिवा... एकदम बोलू लागतात.

"असा कसा भाऊ! कसाई... बहिणीचा खून करतो... बायकोच्या मुठीत आहे... बहिणीची दिवाळी नीट केली नाही बायकोनं याच्या... भावजयी दुष्ट आहे... शेणाच्या गोवऱ्या दिल्या... ताकभाकरीचा पाहुणचार केला नणंदेला... आणि शंकरपार्वतीने कृपा केली... बहिणीच्या गोवऱ्यांचे सोने झाले... हा भाऊ आला तलवार घेऊन... बहिणीला मारायला... वा काय करणी..."

चंद्रभान हा संवाद ऐकून रडू लागतो. "मी पापी बहिणीचा खून करणार होतो बरे झाले या बोलक्या दिव्यांनी मला जाग आणली. छीः थूः माझ्या जिंदगीवर! "

तो घरी परततो. संतापाने लाल... वेडापिसा... बायकोच्या अंगावरची दुलई ओढतो... तिचे नाक कापतो... माहेरी हाकलून देतो... बहीण-भाऊ सुखी होतात.

शंकर पार्वतीचा फेरा (कृपाप्रसाद) दुःखावर पांघरुण, बहीणभाऊचं प्रेम, नातीगोती आणि चमत्काराची किमया या दृष्टीने ही परीकथा म्हणजेच चमत्कारिक अद्‌भुतकथाच!

### २५) किलकिल्याचं डोकं जादुचं मडकं (परीकथा) :

लोकजीवनात कामजीवन आणि नर-मादीत मिलन तसेच वंशवृद्धी या संकल्पना पूर्वापार प्रचलित आहेत. या कथेतून 'किलकिल्या' (सोनपक्षी) च्या वंशवृद्धीची ही कथा आहे. त्यांचं डोकं आणि जादुचं मडकं अशी ही चमत्कृतीपूर्ण अद्‌भुतरम्य कथा जन्मली आहे.

एका जंगलातल्या शिकाऱ्याच्या पोराची कथा. जंगलात त्याला एका खोप्यात सोन्याच्या काड्या दिसल्या. भगताला त्याने त्या दाखवल्या. भगत म्हणाला "ह्या पक्षांनी लोखंडी तारा खोप्यात विणल्या होत्या. त्या सोन्याच्या झाल्या. चोचीनं (स्पशानं) सोनं होतं त्या पाखरांच्या."

भगत त्याला युक्ती सांगतो – "ते सोनपाखरु हाये. ते 'किलकिलत' राहाते. त्याले 'किलकिल्या' म्हणतात. त्याचं मुंडकं सलग खाऊन टाक. तुझ्या पोटात गेलं की तू रोज मडकभर सोनं मिळवशील." मडक्याला धूप दाखवायचा. मंत्र म्हणायचा – "अंगारा-धुपारा करायचा ऐक सोन पाखराऽऽ, सोन्याचं मडकं भरू दे भरभराऽऽ" म्हणजे मडक्यात सोनं व्हईन.

त्या पोरानं भगताच्या सांगण्यानुसार त्या पाखराचं मटन केलं. मुंडकं आख्खं खाल्लं. ते जसंच्या तसंच राहाते. पचत नाही. सडत नाही. त्यानं दुसऱ्या दिवशी कुंभाराकडून नवं मडकं आणलं. धूप दाखवला. मंत्र म्हटला...

जादूच्या मंत्राने मडकभर सोन झालं! आता हा शिकाऱ्याचा पोरगा सोनाजीराव झाला. ताराला नवल वाटले. इतकं सोनं... श्रीमंती याच्याकडे कशी बरं आहे? ती गोड बोलून त्या मडकाचा शोध घेते. सकाळी उठून धूप दाखवते. मंत्र टाकते... पण सोन काही होत नाही. ही तारा वेश्या मग जोगतीणीकडे जाते. तिला या मडक्याबद्दल विचारते. जोगतीण तिला "सोनपाखराच्या मुंडक्याच्या गिळल्यामुळे सोनाजीला मंत्रसिद्धी प्राप्त झाल्याचे सांगते." तारा ही कुटील कुंटीण होती. ती सोनाजीरावला खूप मद्य देते. भरपूर जेऊ घालते. तो ओकतो... मुंडके सटक्न सटकून खाली येते. तारा ते मुंडके गिळून गेते. सोनाजीला ढुंगणावर लाथ मारून काढून देते. सोनाजी पुन्हा भिकारी होतो. दरदर भटकतो. जंगलात त्याला एकदा नागनागिणीचे मैथून दिसते. सोनाजी त्या नगिणीच्या (पद्मिनी) अंगावर शेला टाकून त्या युगुलांस झाकून टाकतो. त्यावेळी सोनाजीस एक दगड दिसतो. त्याच्या स्पर्शाने सोनाजीच्या पायातील बूटाची लोखंडी नाल वितळते. हा चमत्कार होतो तोच नागिण (पद्मिनीच्या रुपात) शांत होऊन सोनाजीसमोर येते. तू माझी लाज झाकलीस मी तुला प्रसन्न आहे. वर माग!

"मी या जंगलाची स्वामिनी... सोनपाखराचा नर तू मारुन त्याचं मुंडकं गिळलं... त्या पाखराची मादी एकटी आहे. तिचा वंश तू बुडवलास... पापी आहेस... पण तू माझी लाज झाकली म्हणून तुला माफ करते."

सोनाजी नतमस्तक होतो. देवी कृपा करावी म्हणतो. देवी म्हणते –"तू एक कर... ते मुंडके परत मिळव... पक्षी जिवंत कर... सोनपक्षी आणि पक्षिणीला दोन नर एक मादी होईल... त्यांचा वंश वाढेल... तुला एक नर परत मिळेल. त्याचे मुंडके घेऊन तू पुन्हा श्रीमंत होशील."

सोनाजी त्या वस्तू वितळवणाऱ्या दगडाचे बारीक कण करतो. हिरव्या पानात पुडीत बांधतो. तारा वेश्येच्या घरी येतो. ती आजारी असते. वैदूच्या रुपात तो ताराला दवा पाणी देतो. औषधात ते दगडाचे कण मिश्रण करून तिला पाजतो. तारा वितळते. सोनपक्षाचे मुंडके परत मिळते.

जंगलात येऊन ते मुंडके शेल्यात गुंडाळतो... शेला हलू लागतो... पक्षी जिवंत होतो. सोनपाखरू पुढे उभे राहाते. देवी पद्मीनीच्या निरोपाप्रमाणे सोनपाखरू आपल्याला मादीला

भेटते. मादी तीन अंडी देते. दोन नर एक मादी जन्मते. एक नराचे मुंडके सोनपक्षी सोनाजीला देतो. सोनाजी त्याचे मुंडके गिळतो. पूर्ववत श्रीमंत होतो.

वंशवृद्धी, मंत्रात्मकता, अद्भुतशक्ती, पक्षी बोलणे, मडक्यात जादूचे सोने होणे; वेश्या वितळून जाणे; पक्षी पुन्हा जिवंत, नरमादीचे मिलन, वंश वाढीस लागणे या सर्वच क्रिया या लोककथेचा बोध आणि रंजनाचा गाभा ठरतात. किलकिल्या (सोनपक्षी) आणि जादुचं मडकं असा हा परीकथेतला अद्भुत चमत्कार आहे.

**२६) चंद्रकला आणि अघोरपंथीच्या लीला (परीकथा) :**

चंद्रकला ही राजकन्या सुंदर... तिच्या प्राप्तीसाठी अघोरीपंथाच्या कामांध साधूने केलेल्या कारस्थानाचा पर्दापाश करणारी ही चमत्कृतीपूर्ण, अद्भुतरम्य अशी ही कथा. लोकमानसात अघोरी कृत्ये, जादू-मंत्र-करणी-भूतपिशाच्च या संदर्भात असलेली भीती आणि अंधश्रद्धा यापासून बोध देणारी ही कथा आहे.

गंगा किनारी एक राजनगरी असते. राजा दयाळू - परमश्रद्धाळू असतो. चंद्रकला नावाची मुलगी आणि चंद्रहास नावाचा मुलगा असे दाम्पत्य असते. राजपुत्र कर्तबगार आणि राजकन्या चंद्रकला मोठे होतात. उपवर कन्या खूप सुंदर असते. राजपुत्र आणि प्रधानपुत्र हे दोन्ही चांगले मित्र असतात.

या नगरात एका अघोरपंथी साधूचा सुळसुळाट असतो. त्याचे चेले राजवाड्यात निरोप देतात. राजाला या अघोऱ्या साधूची भीती वाटते. राजा त्या साधूची सर्व बडदास्त चांगली ठेवण्याचा आदेश देतो. राजा,राणी, राजकन्या (चंद्रकला) आणि राजपुत्र (चंद्रहास) त्याची सेवा करतात. नमस्कार करतात. राजपुत्राने अघोऱ्या साधूची कुकीर्ती ऐकलेली असतो. राजाने त्याला उगीच घाबरू नये. त्याच्या नादी लागू नये असे चंद्रहासला वाटते. परंतु साधूच्या जाळ्यात राजा पुरता अडकतो. साधूची वाईट नजर राजकन्या चंद्रकलेवर असते. तिला कशी मिळवता येईल यासाठी साधू जाळे विणतो. तो एक लाकडी पेटी तयार करतो. राजाला भीती घालून साधू आपले मायाजाल राज्यावर फेकतो. "एक सैतानऽऽ चेडा तुमच्या रक्ताचा भूकेला आहे. त्याला बांधून घेण्यात मला धन्यता वाटेल."

राजा म्हणतो : "गुरु महाराज! काही उपाय कराऽऽ. मला वाचवा या अरिष्टापासून."

**अघोऱ्या साधू :** "राजकन्येला गंगेत अर्पण करून त्या सैतानापासून तुमची सुटका करतो. तिला गुंगीचं औषध देऊन पेटीत बंदिस्त करून सोडून देऊ. मग सैतान खूष होईल मंत्राने मी त्यास बांधतो... तुमच्या रक्ताची भूक शांत करतो."

राजपुत्राला हे पटत नाही. तो प्रधानपुत्रासह जंगलात जातो. अस्वल पकडतात. त्याला घेऊन येतात. गंगा प्रवाहात लाकडी पेटीत सोडलेली चंद्रकला गुंगीत असते. ती पेटी राजपुत्र - प्रधानपुत्र किनारी आणतात. चंद्रकलेची सोडवणूक करतात. चंद्रकला शुद्धीवर येते. ती त्या अघोऱ्या साधूचे हे कृत्य भावास सांगते. दोघांना साधूचा राग येतो.

त्या पेटीत अस्वल कोंबतात. पेटी पाण्यात सोडून देतात. उद्यानातील महालाजवळ लपून बसतात. उंच झाडावर बसून अघोऱ्याच्या कारवाया पाहतात. तिकडे साधूचे चेले ती पाण्यात वाहणारी पेटी घेऊन येतात. साधू खूप खूष असतो. त्याला चंद्रकलेशी लग्न करायचे असते.

पेटी उघडली जाते. त्यातून काळेशार अस्वल! ते फुर्रऽ फुर्रऽ करीत बाहेर येते. साधूवर – त्याच्या चेल्यांवर झडप घालते. वाचवाऽऽ वाचवाऽऽ करत पळत सुटतो. त्याच्या चेल्यांची लाकडं होऊन पडतात.

राजपुत्र - प्रधानपुत्र झाडावर बसून गंमत पाहतात. साधूवर लक्ष ठेवतात. साधू मरतो. अघोरी साधू मेल्याचा सर्वांना आनंद होतो. साधूने आपणास मूर्ख बनवले. त्याच्या मंत्र-टोणगा-करणीला आपण फसलो. राजकन्येचा जीव धोक्यात घातला. राजाला चूक उमगते. तो संन्यास घेतो. राजपुत्र चंद्रहास राजा होतो. कन्या चंद्रकलेचा प्रधानपुत्राशी विवाह होतो. अशी ही जादुटोणा, करणी, चमत्कार, अघोरीवृत्ती, भीती, अंधश्रद्धा, इत्यादी भावभावनांची लोकमानसात रूढ झालेली कथा आहे.

**२७) कसांड्यांची करामत (परीकथा) :**

खेड्यातील शेतकरी जीवनातील ही बोधकथा मोठी गमतीशील आहे. बहीण-भाऊ यांच्या श्रीमंतीचा वृथा अभिमान आणि गरिबीच्या दुःखावर मात करण्याच्या वृत्तीची ही कथा – लोकजीवनात कपोलकल्पित गोष्ट म्हणून प्रचलित आहे.

ढवळापूरचा शेतकरी, त्याला जाई नावाची एक मुलगी आणि सदू नावाचा एकच मुलगा असतो. मुलगी उपवर होते. शेतकरी तसा गरीब तो मुलगी श्रीमंता घरी देतो. भाऊला बहिणीच्या घरी जाऊन तिचे वैभव पाहण्याची इच्छा होते. तो भाकरी बांधून, सोबत ठेप घेऊन बहिणीच्या गावाकडे निघतो. सायंकाळी पोहचतो.

बहिणीच्या घरी उत्सव सुरू असतो. भाऊ गरीब, फाटका. त्याच्याकडे श्रीमंती थाटात कुणी लक्ष देत नाही. बहिणीला निरोप देतो. पण तीही कामाच्या व्यापात. भाऊ आल्याचे विसरून जाते. रात्री एका ओट्यावर भाऊ बसून सर्व गंमत पाहात असतो. सर्व कामकाज आटोपल्यावर जाईला भाऊ सदू आल्याची आठवण होते. एका मडक्यात कढी घेऊन ती सदूला हाक मारते.

**ती : "उठ नं रे दादा कढीमढी पी नं."**
**तो : "ऐक नं ग ताई दिवस निंघू देनं."**

असे दोनतीनदा संवाद होतात. तो ओट्यावर घोर झोपेत असतो. पहाट होते सदू उठतो. भुकेलाच घराकडे निघतो. ढेप खाऊन नदीवर पाणी पितो. गरीबी मोठी वाईट हे दुःख त्याला छळत असते. तो विचार करतो. आपण थोडीथोडी बचत करून श्रीमंत व्हायचा. खूप पैसा कमवयाचा. तो पैसे वाचवून परिस्थिती सुधारते. शेतीवाडी-बैलजोडी घेतो. खिल्लारी बैलजोडी आणि दमणी घेऊन तो बहिणीला माहेरी आणण्याचा बेत ठरवतो.

एका लोहाराकडून बैलांच्या गळ्यात कासंड्या (घंट्या) बनवून घेतो. लोहार कुशल कारागीर असतो. एक कासंडी अशी बनवतो की वाजू लागली म्हणजे,

"उठ नं रे दाना कढीमढी पी नं" असा ध्वनी उमटतो. दुसरी कासंडी (घंटी) वाजली की "ऐक नं गं ताई दिवस निघू देनं." असा आवाज उत्पन्न होतो.

बैलगाडी घेऊन बहिणीला माहेरी आणण्यासाठी जातो. कासंड्यांचा स्वर ऐकून लोकांना आश्चर्य वाटते. त्यांना त्यामागची गोष्ट कुठे माहित असते. ताईच्या घरी येतो. तिला तयारी करायला सांगतो. माहेरी जाण्याच्या आनंदाने ती वेगात तयारी करते. दमणीत (गाडी) येऊन बसते. बैलगाडी सुरू होते.

**एक कासंडी : "उठ नं रे दादा कढीमढी पी नं."**
**दुसरी : "ऐक नं गं ताई दिवस निंघू देनं!"**

अशी एका पाठोपाठ एक आवाजाची मालिका घंट्यातून सुरू होते. बहिणीला ती रात्र आठवते. ती रडू लागते. आपली चूक तिच्या लक्षात येते. श्रीमंता घरी बहिण गरीब भावाला कशी विसरली होती. सदू आणि बहीण जाई एकमेकाची क्षमा मागतात. कासंड्यांनी खूपच करामत दाखवली. जाई श्रीमंतीचा गर्व विसरून गेली.

'गरीब-श्रीमंत' वृत्तीचा निर्देश करणारी ही कथा आहे. "गरीबी आली तर लाजू नये श्रीमंतानं माजू नये" हा संस्कार ग्रामीण लोकजीवनात प्रसारित करणारी ही बोधक आणि रंजक कथा आहे. 'कासंडी'चा चमत्कार, लोहाराचे कौशल्य, चतुरभाऊ आणि गर्विष्ठ बहीण असे समाज मनातले भावदर्शन ही कथा स्पष्ट करते.

### २८) जावई अलबत्या सासरा गलबत्या (चातुर्यकथा) :

एका आंधळ्या म्हाताऱ्याचा वेंधळा मुलगा 'अलबत्या.' त्याचं खरं नाव माणिक – दारिद्र्यानं वेढलेला. त्याला गावात सर्वच चिडवत असत. त्याला कुणी अलबत्या, मुसक्या, हेंबाड्या, बावळट म्हणून संबोधत असत. त्यात तो रात आंधळा होता. दिवस भर तो सारा वेटाळ (गल्ली) डोक्यावर घ्यायाचा रात झाली की कोपऱ्यात दडून बसे. त्याच्या बरोबरीच्या पोरांची लग्नं झाली. पण हा तसाच बिन लग्नाचा.

झामू म्हातारा एका गलबत्या म्हाताऱ्याच्या पोरीशी माणिकचं लग्न जमवतो. जावई अलबत्या आणि सासरा गलबत्या. त्याचं ढुमीशी लग्न जुळतं. एका दिवशी अलबत्या (माणिक) सासरी जातो. संध्याकाळी पोहचतो. रात्रीमुळे त्याला दिसत नाही. म्हणून सासऱ्याच्या पडवीत गुपचूप पडतो. ढुमी आणि तिची आई रात्री गप्पा मारत असतात.

ढुमी म्हणते... "दोन भाकरी आन् दोन चुन गोये उरले कुठी ठेवू ?" "आवं हेंबे, गुगलीत ठेव अनं गुंगली ठेव शिंक्यावर ? तिची माय ओरडली. अलबत्या घाबरला."

रात्रभर भूकेनं कुडकुडला. तळमळला – कशीबशी रात्र काढली. उठला. सासऱ्याच्या अंगणात टपकला. जावईबुवा आलेऽ जावई आले... घरात गर्दी गोंधळ उडाला.

"मामाऽऽजीऽ भूक लागली बुवाऽऽ जेवाले वाढा!" "थांबा मी आता स्वयंपाक करते तुम्हाले गरम जेवण देते." "अवं मामी... मी काय परका आहे? रातच्या दोन भाकरी आन् चुनगोये हायेत... तेच द्यानं!" आपला जावई ब्रह्मज्ञानी आहे. असा सर्वांचा समज होतो. गावात चर्चा होते. माणिकराव मोठा ब्रह्मज्ञानी! जावई - हुशार – दैवगुणसंपन्न... त्रिकाळ ज्ञानी... सासरा गलबत्याला खूप आनंद होतो. त्याचा भाव वधारतो.

कुंभाराचं हरवलेलं गाढव मरीमलजवळ एका पेबात आहे. याचा शोध अलबत्या लावतो. कुंभार खूष होतो.

देशमुखाच्या घरातला बायकोचा हिऱ्यांचा हार चोरीला जातो. त्याचाही शोध गलबत्या लावून देतो. न्हाणीघरातून जिभली म्हातारीनं चोरलेला हार तिला परत जागेवर ठेवायला सांगतो. देशमुखांना हार मिळतो. जिभली संकटातून (चोरीच्या) सुटते. अलबत्याबद्दल लोकप्रियता पसरते. जावई अलबत्या आणि मुलगी ढुमी यांचा सत्कार होतो. गलबत्या म्हातारा खूष होतो.

अंदाजी टोले लागले. पण माणिक अलबत्याचा भाव वाढला. देशमुखांना एकदा राजाने बोलावले. आपल्या न्हाणीघरात एक अद्‌भूत झाड उगवले आहे. त्या झाडाची कुणास ओळख पटत नाही. ते झाड माणिकराव ओळखेल असे देशमुख सुचवतात. माणिकराव (अलबत्या) आणि म्हातारी जिभली राजवाड्यात जातात. झाडाचा शोध लावतात. खोडातून चंदनाचा वास, पानातून आंबट वास, पानं पिवळी हळदीसारखा, हळद माखल्याचा चेहऱ्यावर नूर याची सर्वत्र चर्चा होते. महामूर!

राजकन्या सावळी रोज अंगास हळद लावते, दही चोपडते, चंदनाचा लेप लावते. रोज तीन तास आंघोळ करते. पाच वर्षांपासून गोरी होण्यासाठी हा प्रयोग करते. याचा शोध म्हातारी जिभली आणि माणिक अलबत्या लावतात. राजकन्या उपवर झाली एक वर्षाचं एक कांड - पाच वर्षाची पांच कांडं - हे झाडं हल्दी चंदन... रक्त चंदनाचं आहे. महाली जी राजकन्या ती पाच वर्षापासून उपवर आहे. तिचा शोध घ्या! राजास राणीकडून हा शोध बरोबर असल्याचे कळते.

राजा खूष होतो... अलबत्याला चार भोई... पालखी (मेणा) पाच शिपली, गोणीभर मोहरा मिळतात. तालेवार माणूस होतो. माणिक (अलबत्या)... माणिकचा माणिकराव... अशी ही अलबत्या जावई आणि गलबत्या सासऱ्याची कथा!

लोककथेत चातुर्य, अक्कल हुशारी, ठोकताळा, अंदाज, चमत्कार, बुद्धीप्रचुरता यांचा सुरेख संगम केला की ज्ञान रंजक होते. लोकांनी अशा चातुर्याच्या कथा संपन्न केल्या आहेत.

### २९) ठगास भेटला महाठग (चातुर्यकथा) :

ही दोन ठगांची कहाणी आहे. ठगाने दुसऱ्या ठगास फसवणे... ठगास भेटला महाठग अशी ही गोष्ट त्यांच्या लबाडीची - चातुर्याची कथा आहे.

शेणाच्या रांजणीवर वरच्यावर लोणी ठेवून विकणे, सोन्याचा रंग चढवून सोन्याच्या बांगड्या विकणे अशा लबाड्या करणारे दोन ठग एकत्र येतात. "गाठ पडली ठका ठका" अशी म्हणच आहे.

राम बिलास मारवड्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पोरास ठगवून त्याच्याकडून चाळीस हजार मिळवतात. ठग एकटाच ते पैसे पचवू पाहतो. पण महाठग त्यास बरोबर पकडतो. निम्मे हिस्सा द्यावा लागतो. दोघे एकत्र धंदा करण्याची शपथ घेतात.

राम बिलास शेठच्या बावळट मुलाला ते पुन्हा एकदा फसवण्याचा घाट घालतात. न्हावी आणि त्यांची बायको यांना कटात सामील करून घेतात. मरी आईच्या मंदिरापासून स्मशानापर्यंत बोगदा खोदतात. एक स्मशान जोग्याचा वेश घेऊन मारवाड्याच्या मुलाला भेटतात. न्हावी साक्षीदार बनतो, बावळट फसतो. एक लाख रुपये स्मशानजोगी त्या बावळटाच्या बापास दान धर्मासाठी रोकड पोहचवण्याचे नाटक करतो. बोगद्यावर चिता रचतात. स्मशानजोगी... खालून चितेतून फरार होतो. बोगद्यातून मंदिरात एक लाख रुपये घेऊन येतो. रात्री न्हाव्याच्या घरी जमतात... न्हावी तिसरा हिस्सा मागतो. त्याला देतात.

परंतु नवा कट तयार होतो... राम बिलास शेठची दाढी खूप वाढली आहे. न्हावी स्वर्गात पाठवायचा डाव रचतात... न्हाव्याला वाटते आपणही बोगद्यातून सुटून जाऊ. पण दोन्ही ठग... न्हाव्याची बायको. बोगदा बंद करतात. न्हावी जळतो... तडफडतो... मरतो.

दोन्ही ठगसारखा वाटा करून जातात... महाठग नाव्याची सुंदर बायको घेऊन पोबारा करतो... ठगही पळून जातो. अशी ही ठगांच्या 'ठकाठकीची' गोष्ट आहे. चातुर्य, फसवेगिरी, लुबाडणूक आणि जशास तसे स्वभाववृत्तीची ही कथा आहे.

### ३०) धामन खोका खाये त्याचा मया कुठी हाये! (चातुर्यकथा) :

ढोलापूर गावतला साधा भोळा मजूर... सुपळ्या कष्टाळू... शामळू... सरळ स्वभावाचा... त्याची बायको चिंधी महाउस्ताद, बेरकी, नवऱ्याला कयन्याची भाकर - ठेचा द्यायची - स्वतः मात्र शिरा करून खायची... चोरटी - लबाड होती ती.

तिच्या शेजारी विधवा मावशी होती. ती दोगली... लालची होती. उसनवार नेलं की परतच करायची नाही... चोपडी होती ती. सुपळ्यानं रात्रपाळीच्या भूईमूगाच्या राखणीचं काम घेतलं म्हणून रात्री चिंधीजवळ म्हाताऱ्या मावशीला थांबायला सांगितलं... चिंधी रोजरोज धामन खोका (शिरा) कधी गोड तर कधी तिखट करून नवऱ्याला चोरून खाई - मावशी बेरकी होती- ती चिंधीला म्हणायची -- पोरी तू कशी बारीक झाली सुपळ्या बघ कसा तयार पडला...

"सुपळ्याच्या चोरून चिंधीला म्हणायची — बेटाऽ सुपळ्या, तू कसा सोकावून गेला. भाकर ठेचा खातो. तू धामन खोका खाय पाहाय कसा बोका होतो की न्हाई मस्त...!"

असं दिवसेंदिवस सुरू होतं. गव्हाची कंणगी खालीखाली झाली. चिंधीला चिंता पडली. तिनं मावशीला सल्ला मागितला. मावशीनं शक्कल सांगितली...

"केस पाठीवर मोकळे सोड... मरठ भर... ढेंभा घे हाती... रातीला जाय सुपड्यासमोर शेतात... मळ्यात आरोळ्या मारत फिर..."

"सांग तुझ्या मयावर येऊ तुले खायले की तुझ्या गव्हाच्या कणगीवर जाऊ ?"

चिंधीनं तसंच केलं... रात्री हडळच्या वेशात गेली मळ्यात... सुपळ्या घाबरला... "मले नको खाऊ... गव्हाची कणगी खाय... पण मले सोडून दे." तो हात जोडून त्या हडळीस विनवू लागला. चिंधी घरी आली – मस्त डाराडूर झोपली... सकाळी सुपळ्या घरी येतो – कणगी पाहतो तर ती खूप खाली झालेली असते. स्वतःशी तो बोलतो... "बरं झालां देवा बाप्पा! जीववरचं निभलं अन गव्हावर उतरलं." चिंधी हे ऐकून खूष झाली. तिनं सुस्कारा सोडला. पुन्हा धामन खोका (शिरा) खाल्ला.

अशीही चतुरकथा असली तरी ग्रामीण जीवनातील विनोद, अंधश्रद्धा, खाष्ट कगाज-चोरटी बायको, लबाड मावशी, प्रामाणिक श्रद्धाळू गरीब नवरा यांची ही कथा, व्यवहारचातुर्य, विनोदी पद्धतीने जीवनव्यवहार शिकवणारी ही कथा आहे.

**३१) त्याग हाच धर्म (बोधकथा) :**

ही कहाणी आहे धर्माची, दानधर्माची, धर्म म्हणजे त्याग. त्याग हाच धर्म... धर्म देवळात नाही... तो आहे माणसाच्या मनात... असा संदेश देणारी ही कथा.

आटपाटनगरीतील एक विधवा आणि तिचा मुलगा सत्यपाल यांची ही कथा. सत्यपाल सोळा वर्षांचा होतो. त्याची आई त्याला म्हणते आता लग्न कर. तो कष्टाळू पण दोघांच्या जेमतेम पोट भरण्याची परिस्थिती... लग्न कसं करणार? सत्यपाल चावडीवर जातो. तो पाटलांना म्हणतो... तुम्ही माझं लग्न करून द्या म्हणजे आई शांत होईल.

पाटील म्हणाला - "माझी परिस्थिती बिकट... एकुलता एक पुत्र गेला. दानधर्म नेमाने केला. रोज पाच उपाशी लोकांना जेवण देतो. धर्म करतो. तू असं कर. राजाकडे जा."

चंपनगरीच्या राजाकडे सत्यपाल जातो. राजा दयाळू असतो. त्याला एक कन्या असते. तिचे लग्न राहिलेले असते. तो राजाला विनंती करतो. माझ्या लग्नासाठी मदत द्या.

राजा म्हणाला - "तुझ्याजवळ काहीच नाही. लग्न कशासाठी? दानधर्म - त्याग यातच धर्म - धर्मासाठी संसार – मी देवाचे मंदिर बांधले पण त्याचा कळस खचतो. सारा पैसा लावला. धर्मासाठी जीव झुरतो."

सत्यपाल :- "राजे, तुम्ही धर्म पाहायला कां?"

राजा :- "धर्मासाठी तपस्या हवी. प्रजारक्षण हाच माझा धर्म तप केलं तर राज्य कसं चालणार? तपासाठी... धर्मासाठी साता राना पलीकडे... साता समुद्रापलीकडे जावे लागते... तिथे धर्म!"

सत्यपाल :- "मी धर्मास भेटू शकेल?"

राजा :- "सत्यानं वागणारी व्यक्ती धर्म पाहू शकते. सत्य हेच धर्माचं रूप."

सत्यपाल जंगलाच्या दिशेनं निघाला. धर्माच्या शोधासाठी - त्याला सात रानापलीकडे - साता समुद्रापलीकडे जायचे आहे धर्म शोधायला.

पहिल्या रानात शापित विद्याधर भेटला. तो रानटी अवस्थेत फिरत होतो. त्याची बायको कंजूष. देवगयीचा नैवेद्य विद्याधरीनं खाऊन टाकला. शापाच्या झळा तो भोगत होता. त्याच्या जवळ सत्यपाल गेला.

विद्याधराने कंद आणले... भाजून त्याने चार सत्यपालला दिले... चार बायकोला आणि दोन स्वत:ला घेतले. खादाड विद्याधरीने सत्यपालच्या पानावरचे दोन कंद उचलून घेतले. रात्री नागाने त्या दोघा नवराबायकोला दंश केला. ते मरून पडले. सकाळी सत्यपालाने. त्यांना अग्नीसंस्कार केले. विद्याधराची एक योनी चुकली. तो सत्यपालच्या गावातील पाटलाच्या घरी पुढच्या योनित जन्मला.

दुसऱ्या रानात आंधळा भुजंग भेटला... त्याने सात वने ओलांडली. समुद्रकिनारी पोहचला. किनाऱ्यावर एक मोठा देवमासा भेटला – तो म्हणाला,

मासा :- "तू कोण-कशासाठी आलास ?"

सत्यपाल :- "धर्म शोधण्यासाठी... धर्माची भेट घेण्यासाठी."

मासा :- "कठीण कर्म ! मी पापी गंधर्व... मी रत्नमणी चोरला... त्यामुळे मासा झालो."

सत्यपाल :- "धर्म कुठे आहे सांगा... उपकार होतील."

मासा :- "धर्म त्या साता समुद्रापार राहातो एका बेटावर ! धर्माच्या समोर नऊ रांजण आहेत. ते जो भरणार त्याच्याशी धर्म बोलणार... मी तुला त्या बेटावर सोडतो माझ्या पाटीवर बैस."

सत्यपाल त्या साता समुद्रापलीकडीवल बेटावर पोहचला. मूर्तीसारखा निश्चल धर्म बसलेला होतो. नऊ रांजण... ते मडके त्याने पाहिले. मडक्याला छिद्रे... रांजणात रोज एकशे एक मडके पाणी घाली - पण तरीही रांजण कोरडाच... पाच वर्षांनी रांजणाची तहान भागली... सत्यपाल पाणी भरतच राहिला... हळूहळू नऊ रांजण भरले. धर्माचे मौन संपले - तो बोलू लागला,

धर्म :- "तू कोण ? कशासाठी आलास ?"

सत्यपाल :- "मी सत्यपाल, तुम्हास भेटण्यासाठी."

धर्म :- "भेट झाली ! पुढे काय ?"

सत्यपाल :- "धर्म म्हणजे काय ? ते सांगा."

धर्म :- "दुसऱ्यासाठी त्याग म्हणजे धर्म." "त्यागाचे फळ उशिरा मिळते पण ते टिकाऊ असते." "पाटलाचा मुलगा गेला... त्याला वेळ आली की फळ मिळेलच" "राजाने देऊळ बांधले" – त्याने धर्म साधत नाही... दानाने पुण्य मिळते... राजाने अद्याप कन्यादान केलं नाही." "गरीब भुजंग आंधळा, कारण तो मागच्या जन्मी कंजूष सावकार होता. लोभामुळे आंधळा झाला. धनावरचा

भुजंग!" "देवमासा दुःखी – रत्नमणी चोरला – दुसऱ्याचे दान चोरले. मण्याचा त्याग केला की मुक्त होईल." "रानटी जोडपे (विद्याधर) त्यांना नागाने दंश केला – तो विद्याधर दुसऱ्या जन्मात पाटलाचा पोर झाला आहे." एवढे सर्व सांगून धर्म पुन्हा ध्यानस्थ बसला.

सत्यपालची तपश्चर्या फळास आली.

देवमाशाने मणी सत्यपालास दिला – तो मासा गंधर्व रूपात पुन्हा आला – भुजंगाने भूमीगत धनाचा त्याग केला – त्याला दृष्टी आली – राजाने कन्यादान केले – लेक सत्यपालास दिली – मंदिराचा कळस स्थिर झाला. आईने सुनबाईचे मुख पाहिले – तिच्यात चैतन्य संचारले – पाटलाचा मुलगा तो विद्याधर झाला – त्याने धर्म केला उद्धार झाला. त्याची बायको विद्याधरी मात्र डुकरीण झाली. बकाबका खाते आन् भसाभसा पिल्लं देते... त्याग म्हणजे धर्म असे विचार सत्यपालास पटले. त्याचे तप फळास आले.

'त्याग'चे महत्त्व स्पष्ट करून समाजात कर्तव्य, देवधर्म, सत्याची कास धरणे, दुसऱ्याच्या उपयोगी पडणे, कष्टा–कर्मातून सत्यधर्माचा आणि शाश्वत जीवनमूल्यांचा संस्कार लोककथा देतात. लोकशिक्षण, लोकसमज आणि लोकरीतीची ही धर्म-प्रतिपादन करणारी कथा आहे.

### ३२) नागवंशी सातवाहनाची कथा (दंतकथा) :

गोदावरी काठी पैठण नगरीच्या राजाची आणि सुमित्रेची ही कथा आहे. गोदावरीच्या परिसरातील 'प्रतिष्ठान' (पैठण) या प्राचीन ऐतिहासिक नगरीच्या सातवाहन राजाची, ब्राह्मणकन्या सुमिथेची ही कथा दंतकथा असली तरी त्यातील ऐतिहासिक सत्य आणि त्यावर चढलेली लोकश्रद्धा, भावनेची पुटे पुढे लक्षात घेता, हा मौखिक इतिहास आणि भूगोल असतो. त्याची जाणीव या कथेतून होते.

गोदावरीत डोहात राजबिंडा नाग राहातो - पोरी नदीवर पाण्यासाठी जातात – सुमित्राची घागर पाण्यात नाग ओढून तिलाही घेऊन जातो – पोरी ओरडतात. सुमित्रा डोहात बुडाली... ब्राह्मण रडतो... कामाला लागतो.

नागानं सुमित्रेवर प्रेम छत्र धरलं – लग्न केलं – सारी दौलत तिच्या पायावर ओतली. सुमित्रा रमली नाही. राणी पद्मिनी आणि राणी सुमित्रा... पण नागलोकात सुमित्रेला भीती वाटे – जीव कोंडमारा होई - ती गंभीर झाली.

तिने राजाला म्हटले – "मला माहेरी जाऊ द्या."

शेवटी नागराजाने तिला मोठ्या कष्टाने परवानगी दिली. तो म्हणाला – "तुझ्या पोटी नागवंशाचा दिवा आहे. त्याला जपावे. त्याला मी विसरणार नाही – संकट समयी माझे स्मरण कर!" ती माहेरी आली. सर्वत्र सुमित्रा आल्याची बातमी पोहचली. ब्राह्मण घाबरला...

"सुमित्रेचं भूत आलं... असं बरळु लागला. नको गं बाई येऊ... मला नको छळु... जिथून आली तिथं जा... सुखात राहा!" असं म्हणू लागला.

ती शेवटी भटकता भटकता कुंभारवाड्यात आली. कुंभारानं धर्माची लेक म्हणून तिचा सांभाळ केला. तिच्या पोरानं मातीचं घोडदळ, पायदळ, सैन्य, उंट, रथ, घोडे, गाढवं अशी सात वाहनं तयार केली. हा राजबिंडा राजपुत्र कुंभाराच्या घरी वाढत होता.

उज्जैनचा विक्रम राजा... त्याला कळले तिकडे पैठण नगरीत एक राजपुत्र वाढतो आहे. कुंभारवाड्यात तो पुढे तुम्हास अडविल – सातवाहन राजा होईल – राजा बिथरला – सैन्य पाठवले. सातवाहनाने त्या सैन्यास परत पाठवले – मोठे सैन्य मग चाल करून आले – सुमित्रा घाबरली – तिला नागराजाची आठवण झाली. नागराजा अवतरला –"चिंता करू नको, ही अमृतकृपी घे, त्या बाळाच्या मातींच्या सैन्यावर शिंपड, सैन्य जिवंत होईल. बाळ नागवंशाचा राजा होईल. 'राजमाता' म्हणून तुला मान्यता मिळेल" – सुमित्रानं अमृतकृपीतलं द्रव्य शिंपडलं – सातवाहनाची सात दळं जिवंत झाली – विक्रमाच्या सैन्याची हार झाली, विक्रमाच्या राज्यातलं पैठणपासून झाडीमंडळापर्यंतच राज्य सातवाहनाचं झालं. तेव्हापासून सातवाहन शके (साल) सुरु झाले. गुढीपाडव्याला गुढी उभारली... नवे राज्य सुरू झाले.

पैठणच्या सातवाहनाची ही कथा दंतकथा असली तरी गोदावरी पैठणचा प्रदेश, तिथही सातवाहनांची राजधानी, तिचा इतिहास, नाग आणि लोक यांचा वर्णसंकर, ब्राह्मण आणि क्षत्रिय विवाह – विक्रम आणि सातवाहनांची लढाई - त्यांचा ऐतिहासिक संदर्भ या दृष्टीने लोकमानसात प्रचलित ही कथा अनेक दृष्टींनी अभ्यासता येते. भारतीय वंशांची आणि राजकीय स्थित्यंतराची दिशा अभ्यासल्यास दंतकथांचा आधार घेऊन इतिहासाची मूळ शोधण्याचा, मानववंशशास्त्रीय अभ्यासाचा तसेच कल्पना आणि वास्तवाचा शोध घेण्यासाठी उपयुक्त ठरणारी ही कथा वाटते.

### ३३) चोर तो चोर वरती शिरजोर (लोकोक्तीकथा) :

लोकसाहित्यात 'शाब्द लोकवाङमय' म्हणून मौखिक परंपरा निर्माण झाली. त्या लोकवाङमयातील 'लोकोक्ति'मधून लोकमताची, लोकाचाराची आणि अनुभवांची मांडणी कमीत कमी शब्दात केलेली दिसते. म्हणी, वाक्प्रचार, अपशब्द हे लोक + उक्तीचा आविष्कार असतात. लोक बोली आणि लोकतत्त्वाचा सार अल्पाक्षरी रचनेतून लोकांनी पिढ्यान्‌पिढ्या जतन केलेला असतो. "चोर तो चोर वरतून शिरजोर" या कथेतून व्यक्त होणारे विचार लोकोक्तिसारखे आहेत. त्यातून जीवनव्यवहार आणि विपर्यासाची मांडणी आहे. चतुरता, धुर्तता, साधेपणा, भपकेबाजवृत्ती, कुटीलवृत्ती, लबाडी आणि फसवेगिरीला 'लोक' कसे बळी पडतात. खोटरडा चातुयाने जे बोलतो ते खरेच असते असे नाही. "उलटा चोर कोतवाल को डांटे" अशीच स्थिती या लोकोक्तीतून कथेच्या माध्यमातून मांडली आहे. अशाच एका लफंग्याने फसवलेल्या सज्जन शेतकरी पाटीलबुवाला फसवण्याची ही कथा आहे.

तिरसिंग्या नावाचा चोर – अट्टल चोऱ्या करणारा – बोलण्यात चतुर आणि भन्नाट डोक्याचा... तो पाटीलबुवाची बैलगाडी, दागदागिन्यांनी मढलेली बायको चोरतो. अनेकांना लुबाडतो – राहायला झकपक – बोलायला ऐसपैस असतो.

पाटील आपल्याला बायकोसह बैलगाडीतून प्रवास करीत असतो. तिरसिंग्या चोर गोडीगुलाबीने त्याच्या गाडीत बसतो. पुढे पाटील (शेतकरी) लघवीसाठी खाली उतरतो. तिरसिंग्या बैलांचे कासरे हाती घेतो. बैलगाडी हाकू लागतो. गप्पा-टप्पांमध्ये पाटलबुवाला झुलवत ठेवतो.

पुढे एका गावाच्या चौकात गाडी थांबतो. पाटील कपडे घाण - अवतार एखाद्या मजुरासारखा. त्याला तिरसिंग्या गाडीतून उतर अशी धमकी देतो. तिरसिंग्याचे कपडे छान, दिसतो कसा मालकासारखा – जणू पाटलीनबाईचा नवराच! लोक जमा होतात... लोकांना तिरसिंग्या आणि पाटलीन हीच लक्ष्मीनारायणाची जोडी असा विश्वास वाटतो – तिरसिंग्या आपल्या डावात – कुटील कारस्थानात यशस्वी होतो. लोक पाटीलबुवाला नोकर समजतात... त्याची बाजू लोक ऐकून घेत नाही – तिरसिंग्या पाटलीनीला बोलू देत नाही. खानदानी स्त्री परक्यांसमोर तोंड उघडत नाही असा युक्तिवाद तिरसिंग्या करतो. तो चोरीत सफल होतो. पाटलीन आणि बैलगाडी घेऊन फरार होतो. पाटीलबुवास खाली ओढतो – लाथा बुक्यांनी मारतो... लाथा बुक्की खाता खाता पाटील म्हणतो – "अरेऽ चोर तो चोर वरती शिरजोर!"

'लोक'समज, 'लोक'वंदना, 'लोक'मानस आणि 'लोक'+उक्ती या संकल्पना बोलीभाषते मौखिक परंपरेत कशा रूढ होतात. त्याचे उत्तम उदाहरण या कथेतून प्रतिबिंबित होते.

### ३४) शालिनी झाली महिषासूर मर्दिनी (लोकगीतकथा) :

'लोककथांची' गद्यरचना ही जशी महत्त्वाची असते तशीच लोककथांची पद्यरचना ही 'लोककथागीत' म्हणून प्रचलित आहे. हिंदीतील लोकगाथा, इंग्रजीतील कथात्मक गीते म्हणजे Ballad (बॅलड) असे लोककथागीतांचेच प्रकार आहेत. 'लोककथागीत' हे गायनासाठी अनुकूल कथागीत असते. 'लोककथागीत' हे लोकसमूहात मौखिक पंरपरेने आलेले कथाप्रधान लोकगीत असते त्याची काही वैशिष्ट्ये असतात.

**वैशिष्ट्ये :-** गेयता, कथात्मकता, रचनाकार अज्ञात, रचनाकाल अज्ञात, मौखिक परंपरेची, सामूहिक जोपासना, आणि साधी अनलंकृत भाषेची रचना, वीरशूर किंवा देवादिकांची कथा सांगण्याची परंपरा ही लोककथागीताची वैशिष्ट्ये. नृत्य, संगीत आणि सादरीकरणाचा अभिनय यामुळे ती समूहाला आवाहान करतात आणि लोकांची होऊन जातात. सूत,चारण, बंदी, लवकुश, भाट, जोगी, भगत, मागते, लोकसंस्कृतीचे उपासक ही लोककथागीत गायकांची परंपरा प्रचलित आहे. कौटुंबिक, सामाजिक, पौराणिक, देवदेवताविषयक, पोवाडे (शूरगाथा), ओवी आख्याने, लौकिककथा गीते अशा विविध स्वरूपाच्या विषयावरील लोककथागीतांची समृद्ध परंपरा भारतीय तसेच मराठी लोककथांची शान आणि मान वाढवत असतात.

'शालिनी'ची ही कथा प्रस्तुत लोककथागीत माध्यमातून लोकजीवनात प्रचलित आहे. तिचे निर्णायक रूप शीलसंवर्धन करणारी, दुष्टांचे निर्दालन करणारी स्त्री-शक्ती देवता महिषासूर मर्दिनीच्या सारखीच वाटते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९५६च्या धर्मांतर चळवळीनंतर काही कथागीते स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झाली. ती लोकजीवनात, लोकमानसात रूढ झाली. लोकगायक ती गातात — प्रबोधन आणि परिवर्तनाचा संदेश देतात. 'शालिनी' ही नायिका शील रक्षणार्थ एक करीमशाँ जाहगिरदाराच्या कामांध वृत्तीचा चाकूने वार करून कसा शेवट करते याची ही कथा आहे. ही कथा 'लोकगीत' स्वरूपात, लय, गेयता आणि तालबद्ध अशी वाद्यांच्या साथीने सादर करण्याची कथा आहे.

करीमशाँची दादागिरी आणि सरंजामी दंडुकेशाही, लग्नाची पहिली रात्र गावातल्या नव्या नवरीनं त्याच्या माडीवर सजवावी असा त्याचा शिरस्ता असतो. सुखदेव आणि शालिनी ही नवदांपत्याची कहाणी या कथागीतात गुंफली आहे. शालिनीचे शील, चारित्र्यसंवर्धन आणि तिची धाडसी, करारी, तडफदारवृत्ती दाखवणारी गोष्ट गीतातून साकारते. शिकली — सवरली आणि बकरीपेक्षा वाघाचं जिणं मानणारी शालिनीची ही शौर्यकथा.

इच्चार केला शालिनीनं
चाकू हाती घेतला रागानं
अन् पोटातले आतडे दादाऽऽ
काढले बाईनं चाकवानंऽऽ
भीमाऽ जीऽ जीऽऽ जीऽऽ रे.
धन्य धन्य भीमा लेकरा नं दादाऽऽ
धावा बुद्धाचा मांडिलाऽ जीऽऽ रे जी जीऽऽ
तलवार खुंटीची काढली तिनं
त्याचं केलं शिरच्छेदनऽऽ
शिर घेतलं हाती, धड उडते बाजूनं
हाती मुंडकं घेतलं बाईनं
त्याच्या रक्ताचे घोट घेतले दोनं
तेव्हा झालं तिचं शांत मनं!
म्हनेऽऽ साऱ्या आई बहिणींचा
बदला म्याँ घेतला काढूनऽ!
अशी ही शालिनीची शौर्यगाथा, आदिशाक्तीची कथा,
तिच्याच पायी टेकवावा माथा

समाजातील आडदांड, सरंजाम, सावकार आणि गुंडागर्दी करणाऱ्या प्रवृत्ती विरोधात समाजमन जागृत करून बोध देणारी ही शूरतेची कथा-गायन-वादनासह अभिनयपूर्ण सादर होते. तेव्हा श्रोतेही या लोककथागीताचे सहभागी साक्षीदार बनतात. लोककथा गीतातील शांत-उदात्त भाव, तडफदार वीररस आणि पोवाड्याप्रमाणे असलेली लोकमनाला आवाहकवृत्ती यांचा सुंदर मिलाफ या कथेतून होतो. 'कथाकथन' आणि 'कथागायन' हे दोन्ही प्रकार मराठी लोककथा परंपरेतील मौखिक वाङमयाची साक्ष देतात.

### परिशिष्ट ३५) धामन खोका खाये त्याचा मया कुठी आहे (नाट्यरूपांतर) :

लोककथांचे जसे लोककथागीतात रूपांतर होते. तसेच लोककथामधील कथाबीजांचे लोकनाट्यीकरण केले जाते. तमाशातील 'वगनाट्य' हे दीर्घकथांचा नाट्यपूर्ण, संवादमय आणि

रंजक असा प्रकार आहे. लोककलांचा आविष्कार आणि त्यातील नाट्यमयता या माध्यमातून खडी गंमत, दंडार, लळीत, वगनाट्य (तमाशा) दशावतार, गोंधळ, जागरण वगैरे प्रकारांची निर्मिती आहे. प्रस्तुत संग्राहातील तीस क्रमांकाची कथा आणि परिशिष्टातील लोकनाट्य यांचे कथानक एक आहे.

'दंडार' ही झाडीपट्टीतील (विदर्भ) पारंपरिक नाट्यरचना आहे. या लोकनाट्याची स्वतंत्र परंपरा असून त्याचा पूर्वरंग हा धार्मिक-पौराणिक देवदेवतांचे नमन स्वरूपाचा असतो. तर उत्तररंग 'नाट्य' (कथा) सादरीकरणाचा असतो. त्यातून एक विनोदी (प्रहसन) लोकनाट्य रचले जाते.

"धामन खोका खाये..." या कथेतीलच पात्रे नाटकात येतात. सुपळा (नवरा), चिंधी (बायको), पाटील (शेतकरी), मावशी (शेजारीण) ही चार पात्रे, त्यांची वृत्ती-प्रवृत्ती स्वभाव, संवादशैली, सुष्टदुष्टता आणि कुटील-सज्जनता यांचा नाट्याविष्कार या रूपांतरात आहे. मूळकथा आणि हे नाट्यरुपांतर यातील 'कथाबीज' आणि कथावस्तु-पात्रे सारखीच असली तरी संवादांची फेक, चढउतार आणि भाषेचा सुंदर वापर दिसतो. प्रतिपाद्य विषयाचे नाट्यीकरण, विनोदशैली आणि बोलीभाषेचे नर्म विनोदी संस्कार या लेखनात अभ्यासता येतात. मराठी लोककथेतून लोकनाट्य (रूपांतर) कसे येते त्याचा हा उत्तम नमुना आहे. अभ्यासकांनी मूळ लोककथा अभ्यासल्यावर हे नाट्यरूपांतर वाचले तर त्यांना कथेचा गोडवा आणि नाट्यातील नाट्यमयता यांची तुलना करता येईल. डॉ. मधुकर वाकोडे यांनी प्रस्तुतचा प्रयोग मुद्दाम अभ्यासासाठी उपलब्ध केला आहे. लोकजीवनाची विविधता, लोकमानसातील वैचित्र्य, मानवी स्वभावाचे विविध पैलू, वृत्ती-प्रवृत्ती आणि श्रद्धा-अंधश्रद्धांसह, सण, उत्सव, परंपरांचे वहन मराठी लोककथांनी कसे समृद्ध केले आहे त्याचा अनुभव प्रस्तुत कथा अभ्यासताना येतो.

**मराठी लोककथांचे मूलघटक :-**

लोककथा (Folktale) म्हटली की, तिचे प्रमुख चार घटक लक्षात येतात.

१) कथेतील पात्रे २) कथेची अभिवृद्धी ३) अभिवृद्धीला पूरक साधने ४) संपूर्ण घटना.

**मराठी लोककथेतील पात्रे :-** ही लोकजीवन, लोकमानसातली आहेत. ती लौकिक पातळीवरील जीवन जगतात परंतु अलौकिकाची त्यांना ओढ जाणवते. काहीतरी भव्यदिव्य करण्याची ओढ असते. त्यांना पशू, पक्षी, प्राणी मदत करतात, भूत पिशाच्चे अडचणीत टाकतात. गंधर्व, यक्ष, विद्याधर, किन्नर, यांचे मानवी जगातील कल्पित सत्य स्वीकारून मनाचा आविष्कार करतात. नायक, नायिका कष्टाळू, मेहनती, हुशार, अडचणींवर मात करणारे. अशा व्यक्ती या कथांतून वावरतात.

उर्वशी, अहिल्या, सुकेतु, नागदत्त, कुंटीण, विक्रम-वेताळ, पुतळी, गाणारा पक्षी-गुलबक्षी, कोल्ह्याची चतुराई, बिरबल, बाणाई, खंडेराव मल्हारी, पद्मिनी, चौसष्ट योगिनी, आदित्य राणूबाई, महालक्ष्मी, कुत्री, निळावंती, हरिणी, चंद्रकला, अघोरपंथी साधू, जावई (अलबत्या), सातवाहन राजा, शालिनी अशी अनेक पात्रे त्यांची गुणवैशिष्ट्ये, स्वभावदर्शन आणि करामती यांचा परिचय लोककथांतून होते. त्यांची गाठ सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांशी

पडते. चमत्कार, अद्भुतरम्य घटनांना ते सामोरे जातात. लौकिक जीवन जगताना दुःख, दारिद्र्य, कष्ट, फसवेगिरी इत्यादींशी त्यांचा सामना होतो. त्यांना संकटात मदतीला भव्य-दिव्य व्यक्ती भेटतात. मानवी आणि अतिमानवी योनीतील अशा सर्व प्रकारच्या व्यक्ती या सर्वच मराठी लोककथांमध्ये आहेत.

'उर्वशी' आणि 'अहिल्या' यांच्या माध्यमातून स्त्री ही निर्मिती शक्ती, मातृत्व आणि पुरुषप्रधान व्यवस्थेतील भोगवस्तु आहे अशा भावनांचे चित्रण दिसून येते. 'कुंटीण'मधील नायिकेची कुटीलता, बाणाईमधील करारीबाण्याची स्त्री, निळावंती, शालिनी, राणूबाई, महालक्ष्मी या सर्व स्त्रीपात्रांमध्ये स्त्री सुलभता, मातृत्व, पत्नीधर्म, पुरुषसत्ताक पद्धतीतील स्त्रीजीवन, दैवीवृत्ती आणि कष्टांची जोपासना, संस्कारशीलता या गुणवैशिष्ट्यांची मांडणी कथेतून होते. स्वभावदर्शन, व्यक्ती-व्यक्तीतील संवाद-विसंवाद, स्वार्थ-परमार्थ, चमत्कृती आणि मात करण्याची वृत्ती, संघर्ष आणि मनोमिलन, वेश पालटणे, रूप बदलणे, साता समुद्रापार प्रवास करणे, पशूपक्ष्यांची भाषा बोलणे, सुष्टांचे पुनर्वसन आणि दुष्टांचे निर्दालन करणे या दृष्टीने यातील स्त्री-पुरुष, नायक-नायिका यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. धर्म परायणता आणि दैववादीवृत्ती, दानधर्माचे महत्त्व, लोकपरंपरा आणि रूढींचे पालन, नवससायस करणे, चमत्कारांना घडवणे आणि साथ देणे अशा बाबतीत या पात्रांना लोकमानसाने स्वतंत्र अस्तित्व दिले आहे. असे प्रस्तुत मराठी लोककथांतून जाणवते.

लोककथेतील दैवतांचे प्रकटीकरण महत्त्वाचे वाटते. 'उर्वशी' कथेतील चंद्र, बृहस्पती, तारा, शुक्राचार्य, शंकरपार्वती गुरु, बुध, शुक्रादी ग्रहांचे आणि दैवतांचे 'निसर्गरूप' मानवी मनातील गूढता, आदर, सृष्टीविषयीची भावना व्यक्त करणारी पात्रे ठरतात. उर्वशी आणि पुरुखा, च्यवनऋषीच्या मांडीतून जन्म घेणारी अलौकिक उर्वशी, यातील दैवीशक्तीच प्रकटते.

'गौतममुनी' आणि त्यांची पत्नी 'अहिल्या', श्रीराम आणि विश्वमित्र, 'इंद्राचे' पौरुषत्व आणि 'अहिल्येची' कामवासना या सनातन भावनांची मांडणी प्रस्तुत पात्रांच्या (व्यक्तिरेखा) माध्यमातून केली आहे ती प्राचीनतम भावनाच आहे.

नागाननाच्या दोन राण्या 'मोठी सुभद्रा' आणि 'धाकटी सुभद्रा' यांच्यातील स्वभावदर्शन, स्त्रीसुलभता आणि मत्सरवृत्तीचे दर्शन घडवतात. 'होळी'...मधील राजा हिरण्यकश्यपू आणि भक्तप्रल्हाद यांच्यातील बाप-लेक आणि आर्य-अनार्य भक्ती (विष्णू) यातील संघर्षाची अद्भुतकथा आणि व्यक्तिरेखांचे चित्रण करते.

'पंचतंत्र'मधील 'सुतार' आणि त्याचा 'उडणारा गरुड' (खेळणे) यातील चातुर्य, कारागिरीची प्रवृत्ती महत्त्वाची ठरते. 'इसापनीति' मधील 'कोल्हा आणि बगळा' ही धूर्तता आणि चातुर्यासह प्रामाणिकपणा व्यक्त करणारी पात्रे मानवीस्वभावाचे प्रतिबिंबच वाटतात. 'सुडभावना' ही मानवी व्यक्तिरेखातील स्वभावाचे मूळ असून 'बगळा' अपमानाचे उट्टे काढतो. ही लोकमानसाची कल्पना आहे. 'बिरबलाची' बौद्धिक वर्चस्वाची व्यक्तिरेखा, चांडाळचौकडीची कुटीलवृत्ती आणि राजाची 'न्यायवृत्ती', गरीब माणसाची कैफियत मांडण्याची भूमिका ही 'बिरबलची खिचडी' सारख्या कथेतील पात्रे लोकसंस्कृतीचे व्यावहारिक सत्य आहे. 'मूर्ख लाड' आणि 'धूर्त राऊत' ही दृष्टांत कथा माणसांच्या लोकजीवनातील शह-काटशह, सवाई (श्रेष्ठता) वृत्तीचा परिपोष करणारी पात्रेच या कथेत येतात. 'लोकदैवते' म्हणून 'बाणाई'-मेंढपाळ

(देवमल्हारी) आणि म्हाळसा देवी यांची पात्रे ही श्रद्धाभक्तीबरोबरच वीररस, प्रेम आसक्ती आणि वाणी, धनगर अशा वैश्य, कष्टकरी जमातींच्या व्यक्तिमत्त्वांची स्वभावधारा मांडतात.

'नीलमणी' आणि 'पद्मिनी' ही पाताळलोकातील राजा-राणी असली तरी त्यांचे लौकिक जीवनातील (पृथ्वी) व्यक्तिरेखा म्हणूनच कथेत स्थान आहे. मानवी स्वभाव आणि देवदैवते यांची छाप यांचे नाते सांगणारी पात्रे 'चौसष्ट योगिनी', झोटिंग, म्हसोबा, शंकर पार्वतीचा फेरा, राणूबाई, महालक्ष्मी, राणी-दासी, राजा, त्याच्या आवडत्या-नावडत्या राण्या, डोहाळे लागलेल्या स्त्रिया आणि कुत्री, 'निळावंती' (पाखरांची भाषा जाणणारी मुलगी) अशा सर्वच व्यक्तिरेखांतून लोकश्रद्धेचा आविष्कार घडतो. ही सर्वच मानवीमनातील, श्रद्धेतील पशू, पक्षी, माणसं, देवदैवतं इत्यादींच्या माध्यमातून मराठी लोककथाचा प्रपंच ठरतात.

**मराठी लोककथेतील वातावरण निर्मिती :-**

लोककथेचे कथाबीज, कथानक, घटना प्रसंग आणि व्यक्तिरेखा (पात्रे) यांना गुंफणारी भाषा तसेच पार्श्वभूमीचे वातावरण यांची निर्मिती या माध्यमातून 'कथा' निर्माण होत जाते. सकाळ, संध्याकाळ, रात्र, ऊन, वारा, पाऊस, नद्या, डोंगर, समुद्र, चंद्रसूर्य, ग्रहतारे, निसर्ग आणि स्वर्ग-मृत्यू-पाताळ लोक यांची पार्श्वभूमी ही वातावरण निर्मितीस पोषक ठरते.

१) "कैलास पर्वतावर शंकरपार्वती कामासक्त असताना शौनकाने जाणे. त्याचे स्त्रीमध्ये रूपांतर होणे." (उर्वशी कथा).

२) उर्वशी-पुरुखा संवादातील 'एक रात्र आणि एक पुत्र' देण्याचे वचन देऊन उर्वशी स्वर्गात निघून जाणे.

३) अहिल्या-इंद्राची संभोगावस्था पाहून तिचा पती गौतमाचा क्रोध - (वणव्यासारखा - अग्नी ज्वाळेप्रमाणे लखलखता) त्याची शापवाणी (तुझे वृषण गळून पडेल. तू षंढ होशील) या बाबी पार्श्वभूमी आणि वातावरण निर्मिती करणाऱ्या ठरतात.

४) वाळवंटातील निरस वातावरणाचा कंटाळा, भगभगीत रेताडातील भ्रमंती, पोटासाठी वणवण भटकणे, चारशे कोसांची लांब मान प्राप्त होणे, ब्रह्मदेवाने तथास्तु म्हणून उंटास वरदान देणे या सर्व घटना वातावरण निर्मितीस पोषक वाटतात.

५) "रणभेरी वाजल्या, तुताऱ्या फुंकल्या, लढाईस तोंड फुटले विष्णू साक्षात लढाई करणार ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली. (तोतयाची कामगिरी) यामुळे युद्धाचे वातावरण तयार होते."

६) परिझारने अंगणात गालिचा घातला, मधात पिंजरा आणि ताटवा ठेवला. जहाँपन्हा गालिच्यावर विराजमाने झाले. कुतुहलाने पाहू लागले. पिंजऱ्यातील गाणाऱ्या पक्षाने एक आलाप घेतला. (गाणारा पक्षी...)

७) बगळ्याने मस्त बासुंदी केली - मलईचा सुगंध दरवळला. मोठी उंच मानेची आणि अरुंद तोंडाची सुरई आणली. सुरईत बासुंदी शिगोशिग भरली... कोल्ह्याची जीभ सुरईत जाईना... अख्खी सुरई बगळ्यानं खाल्ली. ढेकर दिला! (कोल्हा... बगळा – इसापनिती.)

८) बारा वर्ष पूर्ण झाली... पद्मिनी उपवर झाली... कांतीमान दिसत होती - काठावर एक कमळ फुलले होते - पद्मिनी गाणं गुणगुणत कमळ तोडण्यास गेली... तळे दुभंगले... नीलमणी वर आला. पद्मिनीला घेऊन पाताळात गेला (पद्मिनी – पातळाची राणी)

९) मध्यरात्र झाली. प्रकाशाचे पुंजके शिवपिंडीकडे आले. पैंजणाचा चमत्कार आणि दिव्यत्वाचा चमत्कार घडला... अतिथी कोण? अतिथी कोणऽऽ? त्रिवार प्रश्न केला... 'ब्राह्मणाची सून म्हणाली – मी आहे' (चौसष्ट योगिनी पूजा)

१०) "काळी अवसेची रात्र वाढली. गावात सन्नाटा पसरला. सूनबाई पूजा साहित्य... गाठोड घेऊन तळ्यावर गेली. नागडी होऊन आंघोळ करू लागली..." (श्रावणसाखळी)

११) "तिच्या त्या दिव्य सौंदर्यावर आणि सूरांच्या भक्तीवर तो भाळला होता. रानफुलांच्या माळा एकमेकांची एकमेकांच्या गळ्यात घातल्या. दोघांचा विवाह झाला... वनराणी मोहरली." (वनराणी)

१२) एका झाडाखाली बसला असताना गवतात एक नागाचे जोडपे त्यास जुगताना दिसले. काय त्यांचे जुगणे? तो हळूहळू गेला. आणि खांद्यावरचा शेला त्या जोडप्यावर टाकला... (किलकिल्याचं डोके जादुचं मडकं.)

१३) "दुपारी नवल घडले. गावचा देशमुख तालेवार माणूस तो गलबत्त्याच्या घरी आला. सर्वांना अस्मान ठेंगणे झाले. देशमुखाच्या आल्यानं!" (जावई अलबत्या...)

१४) त्या दोघांनी रात्री जागून तो बोगदा बुजून टाकला. दोघांनी चिता रचून (न्हाव्याची) पेटवून दिली. न्हाव्याची धडपड... किंकाळ्या ऐकू येण्यापूर्वीच दोघांनी. गावचा रस्ता धरला. लालची न्हावी स्वर्गात गेला. (ठगास भेटला महाठग)

१५) "धर्म त्या सुंदर अशा साता समुद्रापलीकडे एका बेटावर राहातो. त्याच्या समोर नऊ रांजण आहेत. त्याच्या मांडीवरील मडक्याने ते भरणार त्याच्याशी धर्म बोलणार" (त्याग हाच धर्म)

१६) अटंग्या वनात बटंग्या डोंगरात एक नगरी होती. गोदा-गंगा वाहात होती. माणसं सुखी – घाटावर पोरी पाणी भरत होत्या... त्यात ब्राह्मणाची लेक... चांदण्यासारखी पांढरी फेक मोठी सुरेख - नागासारखी वेणी... नागाची गाणी गात होती. पोरींची जत्रा हसत होती. (नागवंशी सातवाहनाची कथा)

अशी काही ठळक उदाहरणे लक्षात घेतली तर वातावरणनिर्मिती ही लोककथेच्या निर्मितीस पोषक ठरते असे लक्षात येते. घटना, प्रसंग आणि व्यक्ती (पात्रे) यांच्या सोबत प्रवाही होणाऱ्या कथानकाला पुढे नेऊन कथेची रंजकता, उत्सुकता आणि अलौकिकता तसेच वास्तवपूर्ण वातावरणाची निर्मिती कथाकथन करणारे कसे करतात याची जाणीव होते. कथेतील 'काळ' आणि त्यासोबत प्रवास करणारी पात्रे, त्यांची मानसिकता, जीवनव्यवहार आणि भावनिक विश्व कथेतून गुंफले जाते. कालतत्त्व जिवंत करणारी वातावरणनिर्मिती या दृष्टीने महत्त्वाची ठरते. चमत्कार, अद्‌भुतता, रम्यता आणि सुंदरतेसह बीभत्सता आणि विविध रसांचा परिपोष करणारे 'वातावरण' हा कथेचा महत्त्वपूर्ण घटक ठरतो. लौकिक-अलौकिकता, विशाल संपन्नता, व्यापक समृद्धी, निसर्गातील सुंदरता, सुष्ट-दुष्टता आणि भावनिक विश्वातील आंतरिक मनाची मनस्विता जोपासण्याचे, कथानकाला प्रवाहित करण्याचे, लोकश्रद्धांना जपण्याचे रंजनासह बोधपरता स्वीकारण्याचे कार्य वातावरणनिर्मितीतून होत असते.

**मराठी लोककथा भाषा शैली :-**

लोककथांची परंपरा ही मौखिक-बोलीभाषेची कथनाची परंपरा असते. 'लोकबोली'तून अनुभवांचे, घटना प्रसंगाचे आणि कथावस्तुचे कथन करण्याची ही भाषा 'लोकांची बोली' (Folk

Language) म्हटली जाते. दर बारा कोसांवर भाषा बदलते. या सूत्रानुसार कोकणी, कोल्हापूरी, माणदेशी, सोलापूरी, मराठवाडी, खानदेशी, (अहिराणी), वऱ्हाडी, झाडीबोली, बागराणी, नागपूरी अशा किती तरी बोलीतून 'कथन' होणारी मराठी लोककथा तिच्या भाषिक वैशिष्ट्यांनी ओळखली जाते. भाषेचा गोडवा, साधी शब्दरचना, म्हणी वाक्प्रचारांचा वापर, सहज सुलभ वाक्यरचना, अर्थपूर्ण संवादांची पेरणी, विनोदी किस्से, अद्‌भूतरम्यता, प्रासादिकता आणि ओजस्वीता तसेच अनुभवनिष्ठ, शहाणपणा, भावनिक ओलावा या सर्वच गुणांमुळे मराठी लोककथांची भाषाशैली ही रसाळ, मधाळ आणि अंतरंगी जाऊन भिडणारी ठरते. डॉ. वाकोडे यांनी या कथा संग्रहित करताना ग्रामीण बोलींचा परिवेश त्यांना चढविला आहे. त्याचा अभ्यास या कथांच्या माध्यमातून करता येतो. या कथांतील शब्दसंपदा आणि शीर्षकांची समर्पकता सकृत्‌दर्शनी लक्षात येते.

**शब्द वैभव :-** दिव्यत्व, विकारी भावना, धिक्कार, शाप, उःशाप, मत्सर भाव, ताप, जन्म-मरण, प्रायोपवेशन, थैमान, पूर्वजन्म, महासत्व, स्त्री हट्ट, प्रसन्न होणे, गलेलट्ठ, मेंदूने मठ्ठ, कचाकचा लचके, शक्कल, मोहमाया, पुण्यहीन, पुण्यवान, पापी, शरीरसुख, कुंटिणी, चतुरता, मूर्खपणा, संकल्प सोडला, संतुष्ट केले, नैवैद्य, प्रसाद, आशीर्वाद, धुनीवाला, गाणारा पक्षी, द्धी गुलबक्षी, अलंकार, नागमणी, बासुंदी, मलई, खुषमस्करे, खजील होणे, चांडाळचौकडी, स्वर्ग, मृत्यू - पाताळ लोक, सात अप्सरा, चौसष्ट योगिनी, सूर्यनारायण, चंद्रदेव, कृपा-अवकृपा, गुळाची ढेप, कुत्रीचं बाळंतपण, डेरेदाखल होणे, काळीनिळी पडणे, शिरकमळ, सोनकमळ, श्रावणसाखळी, हडळ, देवपाखरु, अप्सरांचे नृत्य, राजस्त्रिया, शिवपार्वतीचा फेरा, दिवाळीसाठी बहिणीस आणणे, जादुचं मडकं, अघोरपंथी साधुच्या लीला, शागीर्द, कसांड्या (घंटा) – बैलजोडीच्या गळ्यातील, चांडाळीण, अलबत्या, गलबत्या, न्हाणीघर, सातवाहन, सातडोंगर, सातआसरा, सात समुद्र, पंचमंडळ, गुलाल-उदबत्ती, ठग-महाठग, पल्ला गाठला, गाठ पडली ठका ठका, झाकझूक करणे, मुडद्याचं सोंग, धामधूम, धामनखोका, गोड शिरा, तिखट शिरा, कणगी, हजामत, पोबारा, अमृताची कुपी, पंचशील, भीमराया, करीमशा, तिरसिंग्या, दंडुकेशाही इत्यादी. असे कितीतरी शब्द, मराठीची शब्दसंपदा आणि अर्थ वैभव वाढवणारे आहेत. म्हणी-वाक्प्रयोग आणि अपशब्दांचे भांडार या कथांमध्ये विखुरलेले आहे. भावना, कल्पना आणि विचार यातील लोकमानस, श्रद्धांचे वाहक बनून हे शब्द कथेला अर्थपूर्ण करतात.

**लोकोक्ती :-**

भाषेचे सौंदर्य, अर्थपूर्ण म्हणी, वाक्प्रचार, टोमणा मारणारे शब्द, अपशब्द इत्यादी लोकोक्तिंच्या माध्यमातून खुलत असते. कथेची भाषा अर्थसघन आणि अनुभूती संपन्न या लोकोक्तिंमुळे होते. कथागीतातील गेयता, छंद आणि लयबद्धता यांना ही शब्दसंपदा प्रवाही करते. वाच्यार्थापेक्षा लक्षार्थ आणि व्यंगार्थाचे प्रकटीकरण या लोकोक्तिंतून होत असते. कथनशैली आणि संवादशैलीला प्रवाही करून तिला चमत्कृती व अद्‌भुतरम्य करण्यासाठी ह्या लोकोक्ती म्हणजे लोकचार, लोकमानस, लोकधर्मीय लोकतत्त्वाच्या अर्थपूर्ण वाहक बनून येतात. कथा त्यामुळे वास्तवपूर्ण आणि रंजनासह बोधक होतात.

शाप देणे, खट्टू होणे, सवतीचा ताप होणे, प्रायोपवेशन करणे, आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन डोळे, कचाकचा लचके तोडणे, तृप्तीचा ढेकर देणे, तोंडाला पाणी सुटणे, तुला ना मला घाल कुत्र्याला, सुंबाल्या करणे, देव तारी त्यास कोण मारी, जीवास घोर लावणे, चमत्कार दाखवणे, शापमुक्त होणे, खुंटीने हार गिळणे, काळाची साथ असणे, पाचावर धारण बसणे,

देवदर्शन होणे, गोंधळ उडणे, हट्ट पूर्ण करणे, दुवा मागणे, शिळा होऊन पडणे, हरामखोरी करणे, चांडाळचौकडी जमणे, खजील होणे, सुतकी होणे, तीन तेरा वाजवणे, साकडे घालणे, डोहाळे लागणे, काळीनिळी पडणे, माहेरची माया मिळणे, नवकोट नारायण होणे, लुंग्या-सुंग्या, पोटच्या गोळ्यासाठी जीव झाला येडा, रंगेहाथ पकडणे, गर्दन उडवणे, पितळ उघडे पडणे, गोमुत्र प्याल्यासारखे तोंड करणे, नंगी तलवार घेणे, नाकाचा शेंडा कापणे, धूप दाखवणे, ढुंगणावर घाव असणे, कौशल्यपणास लावणे, अलबत्या-गलबत्या होणे, घातवेळ येणे, इस पार की उस पार करणे, तोफखान्यासमोर नरमणे, पोबारा करणे, प्राणापलीकडे जपणे, लाथा बुक्के खाणे इत्यादी लोकोक्तिंचा विचार करता मराठी लोककथांची भाषा समृद्ध वाटते. जीवनमूल्ये, नैतिक शिक्षण आणि आदर्श व्यवहार तसेच कुटीलकर्माची निर्भत्सना करणारी भाषा लोककथांतून 'मौखिक परंपरेने' (Oral Traditions) रूढ झालेली आहे. त्यातून रूढी, परंपरा, लोकोत्सव, शकुन अपशकुन, जीवनव्यवहाराचे चिंतन व्यक्त केलेले आहे. मराठी लोककथांचा संग्रह - (संकलन) आणि संपादन करून डॉ. मधुकर वाकोडे यांनी हा प्रचलित मौखिक वाङमयाचा खजिना मराठी वाचकांना अर्पण केला आहे. साहित्य - अकादमी - नवी दिल्ली या संस्थेचे हे प्रकाशन कार्य महत्त्वपूर्ण ठरते. अभ्यासकांना लोककथांच्या अभ्यासाचे दालन यामुळे खुले झाले आहे.

**सरावासाठी स्वाध्याय :- दीर्घोत्तरी प्रश्न :-**

१) 'मराठी लोककथा' या ग्रंथातील कथांचे स्वरूप लिहा.

२) 'मराठी लोककथा' या कथातील ग्रंथनिविष्ट कथांचा धावता आढावा घेऊन त्यांचा परिचय लिहा.

३) 'मराठी लोककथा' यातील 'मौखिक लोककथा' या विभागातील कथांचा परिचय सविस्तर व मुद्देसूद लिहा.

४) "मराठी लोककथा' ह्या रंजनासह समाजप्रबोधनाचे कार्य करतात" या विधानाची साधार चर्चा करा.

५) मराठी लोककथांचे विविध प्रकारे वर्गीकरण करून त्या आधारे कथांचे विश्लेषण साधार लिहा.

६) "लोककथा म्हणजे लोकसंस्कृती, लोकश्रद्धा आणि लोकमानसाचा आविष्कार असते" या विधानाची सोदाहरण मांडणी करा.

७) दैवतकथा, परीकथांचा 'मराठी लोककथा' या संग्रहाच्या आधारे परिचय लिहा.

८) चातुर्यकथा आणि बोधकथेतून लोकशिक्षण आणि लोकरंजन कसे होते ते तुम्ही अभ्यासलेल्या कथांच्या आधारे लिहा.

९) लोककथांची रचना, कथानक, निवेदन आणि भाषाशैली यांची साधार चर्चा करा.

१०) "लोककथांतील घटना – प्रसंग आणि व्यक्तिरेखा (पात्रे) यातून विविध प्रवृत्ती आणि स्वभाव दर्शन घडते." या विधानाची साधार चर्चा लिहा.

**टीपा लिहा :-**

१) लोककथेची मौखिक परंपरा.

२) लोककथांची वैशिष्ट्ये.

३) लोककथांचे कथन.

४) दैवतकथा.

५) परीकथा.

६) लोककथेतील अद्‌भुतरम्यता.

७) चातुर्यकथा – बोधकथा.

८) लोककथेतील विनोद.

९) लोककथा आणि लोकबोली.

१०) आवडती - नावडतीची मानसिकता.

११) लोकश्रद्धा आणि लोककथा.

१२) लोकमानस आणि लोककथा.

१३) लोककथेतील नायक-खलनायक.

१४) लोककथेतील नायिका-खलनायिका.

१५) लोककथा अभ्यासाचे महत्त्व.

१६) लोककथा आणि दैवाधिनता.

१७) लोककथा आणि लौकिकजीवन.

१८) लोककथेतील लौकिक आणि अलौकिकता.

१९) लोककथेतील लोकोक्ती.

२०) लोककथेतील वातावरणनिर्मिती.

❖❖❖❖

# ३

# रानभूल

## (डॉ. रमेश कुबल)

**डॉ. सूर्यकांत आजगांवकर**

नाटक ही संमिश्र कला आहे. ती सर्वांच्या सहकार्यातून आणि सहभागातून साकारत असते. म्हणूनच नाटकाला संयोगी प्रकटन म्हटले आहे. नाटकातून दृकश्राव्य वा अन्य कोणत्या ना कोणत्या प्रकारचा परिणाम साधला जातो. नाटकातून विशेष अनुभूती प्रेक्षकांना द्यायची असते.

नाटक गद्य असो वा पद्य (संगीत) असो, ते मूलतः प्रयोगजीवी असते. प्रयोगक्षम असते. नाटकाची संहिता लिखित अथवा अलिखित असली तर 'प्रयोग' हा नाटक ह्या साहित्यप्रकाराचा व्यवच्छेदक विशेष आहे.

नाटक हा दुहेरी पातळीवर नांदणारा कला प्रकार आहे. नाटककार विशिष्ट असा नाट्यानुभव प्रेक्षकांपर्यंत वास्तवाच्या आणि कल्पिताच्या पातळीवरून पोहोचवत असतो. पण तरीही 'नाटक' या कला प्रकाराचे स्वरूप अनेक पातळ्यांवर संमिश्र असते. चित्रकला, वास्तुकला (नेपथ्य), नृत्य, संगीत, नाट्य या कलांची मदत नाटकास होते.

शब्द, शब्दसंहिता, तिचे उच्चारण या भाषिक चिन्हांसरणीबरोबर नेपथ्य, प्रकाश, संगीत, रङ्गभूषा, वेशभूषा आदी अभाषिक चिन्हसरणीमधून नाट्यकलेचे संमिश्र रूप साकार होते. नाटक ही रङ्गचिन्हांची व्यवस्था एकसंध असली तरी ती एकपदरी नसते. भाषिक, अभाषिक, दृकश्राव्य अशा सर्व प्रकारच्या चिन्हांना महत्त्व दिलेले असते. या साऱ्यांच्या ऐक्यातून प्रेक्षकांना नाट्यार्थाची प्रतीती येते.

नाटकाचा साहित्यकृती म्हणून विचार करतो, त्यावेळी नाटकाच्या संहितेचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. नाट्यसंहितेतील नाट्यसूत्र, नाट्यकथानक, घटना-प्रसंग, पात्र, संवाद, भाषा आदी घटकांचा अभ्यास महत्त्वाचा असतो. कथानकाचा आद्य, मध्य आणि नाट्यसूत्राची मांडणी, त्याचबरोबर नाट्यगत संघर्ष ह्या महत्त्वाच्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. त्यातूनच नाट्य उलगडत जाते.

'रानभूल' हे डॉ.रमेश कुबल यांचे आदिवासींच्या वास्तव जगण्याची व्यथा मांडणारे नाटक आहे. प्रस्तुत नाटकाचा पहिला प्रयोग दि.२० डिसेंबर, २००६ रोजी यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा येथे ४६व्या राज्य नाट्यमहोत्सवात, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, अंधेरी संस्थेच्या नाट्यशाखेने सादर केला. पुस्तकरूपाने हे नाटक दि.९ ऑक्टोबर, २००९ रोजी प्रकाशित झाले.

'रानभूल' हे आदिम अशा लोकसमूहाचे नाटक आहे. हा लोकसमूह आदिवासी, कातकरी लोकांचा आहे. या आदिम लोकसमूहाच्या समोर उभा ठाकलेला आधुनिक व्यापारी, ठेकेदार, दलाल यांचा समूह आहे. हा समूह स्वतःला पुढारलेला, प्रगत समजणारा असला तरी तो भ्रष्ट आणि अप्रगतच आहे.

आदिवासी समूह हा आदिम परंपरा, आदिमत्त्व जपणारा समूह आहे. श्रद्धाशीलतेबरोबर त्याच्या ठिकाणी सहनशीलता आहे. आपल्या जीवनमूल्यांशी प्रामाणिक राहणारा आहे. तर आधुनिक लोकसमूह हा मूल्यनिष्ठेचे ढोंग करणारा, आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी दातृत्वाचे, सेवेचे नाटक करणारा असा दांभिक समाज आहे. हा समाज आदिवासी लोकसमूहाचे/समाजाचे शारीरिक, मानसिक व आर्थिक पातळीवर शोषण करतो. ह्या शोषणाचा पटच 'रानभूल' या नाटकामध्ये मांडलेला आहे.

'रानभूल' हे आदिवासींच्या शोषणाची कथा आणि व्यथा सांगणारे नाटक आहे. तसेच आदिवासी समाजाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारे हे शोकात्म नाटक आहे. आदिवासी जीवन हे नित्यनैमित्तिक समारंभ, उत्सव आणि विधिविधाने यांनी भरलेले असते. आदिवासींच्या गायन, नृत्य, नाटक, चित्र काढणे, शिल्प कोरणे आदी कलांमागे देवाधर्माविषयीचा सेवाभाव प्रबळ असतो. त्यांच्या क्रियाव्यापारात सर्जन आणि आस्वाद या क्रिया एकाच वेळी घडत असल्यामुळे आदिवासींचे विधी हे कलाविष्कार म्हणून ओळखले जातात.

आदिवासी कलाविष्कार हे केवळ मनोरंजनात्मक नसतात. त्यातून आदिवासींची जीवनधाटी, जीवनपद्धती साकार होते. निसर्गशरणता, संकेतव्यवस्था यांमुळे आदिवासींची यातुमय आचारसंहिता अस्तित्वात येते. त्यातूनच धर्मसंकल्पना, संस्कृती निश्चित झालेली असते. देवतापूजन आणि कलानिर्मिती यांचा अन्योन्य संबंध असल्यामुळे आदिवासी कलाविष्कार आदिवासी जीवनाचा आंतरिक व बाह्यजीवनाशी संबंधित असतो.

करमणुकीबरोबर समाजमान्य नियमांनी सर्व समाजघटकात एकत्वाची भावना बळकट करणे, पारंपरिक आचार-विचारांची प्रस्थापना करणे, ते टिकवून ठेवणे आणि समाजावर सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक संस्कार करणे हे नाट्यात्म कार्य कलाविष्कार करतात.

आदिवासी नाटक हे आदिवासी समाजसंस्कृतीतील सामूहिक कृती असून ते धर्मभावनेतून निर्माण झालेल्या नाटकाचा स्वतःच असा संकेतव्यूह असतो. उदा. आदिवासींचे दंडार, मादळ इत्यादी.

वर निर्देश केल्याप्रमाणे 'रानभूल' हे आदिवासी नाटक म्हणून त्यातून साकार होणारी आदिवासी जीवनसंस्कृती, आदिवासींचे होणारे शारीरिक, मानसिक, आर्थिक शोषण, तसेच या नाटकात नाटककाराने 'मादळ' या आदिवासी नाटकाचा वापरलेला 'फॉर्म' आदी सगळ्या गोष्टींचे विवेचन इथे करावे लागेल.

**रानभूलचे नाट्यसूत्र :-**

सत्ताधाऱ्यांच्या पाठबळामुळे धनदांडग्या व्यापाऱ्याचा, शेठजीचा वाढलेला मस्तवालपणा, शासकीय यंत्रणेतील बोकाळलेला भ्रष्टाचार, त्यामुळे 'जंगल' या राष्ट्रीय संपत्तीची दिवसा-ढवळ्या राजरोस होणारी लुटमार आणि त्यातून आदिवासी, कातकरी लोकसमूहाचे होणारे

शारीरिक, मानसिक व आर्थिक शोषण यांचे उघड दर्शन घडविणे हे ‘रानभूल’ या नाटकाचे नाट्यसूत्र आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील वनविभागातील सरकारी आणि खाजगी जंगल परिसरात बेकायदा जंगलतोड करून कोळशाच्या भट्ट्या लावल्या जातात. या बेकायदा जंगलतोडीस शासकीय वनविभागातील भ्रष्ट वनअधिकारी, कर्मचारी मदत करीत असतात. त्यामुळे ठेकेदार, व्यापारी अवैध जंगलतोड करतात. भट्ट्या लावण्यासाठी, कोळसा तयार करण्यासाठी ठाणे, रायगड जिल्ह्यातील कातकरी, आदिवासींना कंत्राटी पद्धतीने काम करण्यासाठी जंगलात आणले जाते. 'भट्टीप्रमाणे मजूरी' असा मजूरीच्या कामाचा वर्षभराचा करार केला जातो. पण कराराप्रमाणे मजूरी मात्र या आदिवासींना मिळत नाही. त्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन शेठ, व्यापारी, दलाल, मुकादम त्यांचे आर्थिक शोषण करतात, त्याचबरोबर शारीरिक शोषण करतात. ही शोषणाची कथा-व्यथाच ह्या नाटकात मांडली आहे.

**कथानक :-**

रत्नागिरी जिल्ह्यातील जंगल परिसरातील सरकारी आणि खाजगी वनक्षेत्रातील झाडांची, बेकायदा तोड करून व्यापारी, ठेकेदार कोळशाच्या भट्ट्या लावतात. या कोळशाच्या भट्ट्यांवर काम करण्यासाठी ठाणे, रायगड या जिल्ह्यांमधील आदिवासींना, कातकऱ्यांना आणले जाते. भट्ट्यांवर काम करणाऱ्यांमध्ये ठाणे जिल्ह्यातील सहा-सात कुटुंबे होती. त्यात नवश्या, बायो व त्यांची मुलगी बकुळा व तिचा भाऊ असे एक कुटुंब आहे. या कुटुंबाची कथा आणि व्यथाच 'रानभूल' नाटकाच्या मध्यवर्ती आहे.

कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या बायोच्या स्थलांतरित कुटुंबाबरोबर इतर आदिवासी कुटुंबांचे शोषण कोळसाभट्टीचे मालक (शेठ), पोलीस, वनाधिकारी, ठेकेदार आदी करतात. शारीरिक शोषणाबरोबर आर्थिक शोषण सुरू असते. शेठ तर विहित मजुरीपेक्षा कमी मजुरीत आदिवासी मजूरांकडून काम करून घेतो. मजुरीच्या दराप्रमाणे मजूरांना त्यांच्या कामाचे पैसे शेठ देत नाही. अधिक कष्ट करूनही आदिवासींना तुटपुंज्या मजुरीत काम करावे लागते. प्रारंभी बायो दिल्या जाणाऱ्या या मजुरीबद्दल 'शेठ'च्या समोर नाराजी व्यक्त करते.

आदिवासींची ह्या आर्थिक शोषणातून मुक्तता करण्यासाठी ॲड.सुरेखा आणि प्रकाश हे कोळसा कामगारसंघटनेने कार्यकर्ते प्रयत्न करतात. आदिवासींना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून देतात. 'बायो'मुळे आदिवासी अन्यायाचा प्रतिकार करण्यास तयार होतात. दरम्यान 'प्रकाश' या कार्यकर्त्याचा शेठजीचे गुंड खून करतात. शेठच्या आर्थिक बळामुळे हे खुनाचे प्रकरण दडपले जाते. या घटनेमुळे आदिवासींना शोषणमुक्त करण्याच्या प्रक्रियेला थोडी खीळ बसते. अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्याला शेवटी अन्यायाला बळी पडावे लागते. मानवी नैतिक अध:पतनाचे चित्रच डोळ्यासमोर येते.

आर्थिक शोषणाने आदिवासी अधिक संतापतील म्हणून धूर्त शेठजी त्यांचा अर्धा हिशेब ताबडतोब चुकता करतो. पण त्याचवेळी मुकादम देवराम बायोच्या मुलीवर 'बकुळा'वर बलात्कार करतो. बकुळा हे 'रानभूल'मधील रानफूल, पूर्ण उमलण्यापूर्वीच चोळामोळा होते. बलात्काराच्या घटनेने तिच्या जीवनाचा पालापाचोळा होतो. शाळा शिकून मोठे होण्याचे बकुळाचे स्वप्न विरुन जाते.

आदिवासी हे अज्ञानी, अशिक्षित असले तरी ते आपल्या कर्तव्याविषयी प्रामाणिक असतात. अन्न देणारा महत्त्वाचा. आपल्याला अन्न देणारा आपला शोषक आहे असा त्यांच्या मनात विचार येत नाही. म्हणूनच वरील बलात्काराच्या घटनेनंतर एकटी 'बायो' सोडली तर कुणीही पेटून उठत नाही.

बलात्काराच्या घटनेनंतर बायो ॲड.सुरेखा मळवीच्या मदतीने पोलीस स्टेशनवर तक्रार नोंदविते. त्यानंतर सरकारी चौकशीचा फार्स होतो. बायोने पोलीस स्टेशनमध्ये केलेली तक्रार मागे घ्यावी म्हणून शेठ समजूत घालण्याचा प्रयत्न करतो. पण बायो जेव्हा ऐकत नाही तेव्हा शेठजी बायोशी अतिप्रसंग करतो. तिला मिठीत घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा बायो शेठजीच्या डोळ्यात बोटे खुपसते व स्वतःची सुटका करून घेते. बायोने प्रतिकार केला नसता तर बकुळेसारखे तिलाही शेठजीच्या वासनेला बळी पडावे लागले असते. अत्याचाराचा जाब विचारणाऱ्यांना अत्याचारांनाच बळी पडावे लागते, ही वस्तुस्थिती संवेदनशील मनाला चटका लावते.

शेवटी शेठजीकडून होणारे संभाव्य शोषण लक्षात घेऊन बायो आपल्या कुटुंबियांसमवेत पळून जाण्याचा प्रयत्न करते. पण शेठजीचे गुंड तिला पकडून आणतात. नवश्याच्या पायाचा चवडा भट्टीत जाळतात आणि बायोच्या पायांना जळत्या लाकडाचे चटके दिले जातात आणि याही अवस्थेत बायोच्या डोक्यावर कोळशाची गोणी दिली जाते. तर बकुळाला शेठच्या झोपडीत नेले जाते. शोषकांची अमानुषताच इथे स्पष्ट होते.

'रानभूल'मध्ये नाटककाराने अंक, प्रवेश या नाट्यरचना तंत्राना नकार देऊन घटना-स्थळांच्या आधारे नाट्याशयाची मांडणी केलेली आहे. तसेच 'मादळ' या आदिवासी नाटकातील गायन-कथन या नाट्यतंत्राचाही वापर केलेला आहे. त्यामुळे 'रानभूल' नाटकाची संहिता नेहमीच्या नाट्यसंहितेपेक्षा वेगळी आहे.

'रानभूल' या नाटकात अंक नाहीत, प्रवेश नाहीत. तर रानातला बांध, भट्टी परिसर, आदिवासींची पाले, शेठची हट, या चार स्थळांवर आठ ते दहा दिवसात घडणाऱ्या ठरावीक घटना-प्रसंगांमधून नाटक आकारास येते. या नाटकाची नायिका बायो नवश्या नडगे ही उत्तम गाणारी, कलावंत मनाची आणि हुशार धीराची स्त्री आहे. ती नाटकामध्ये आख्यान सादर करते. (गायन-कथन) त्यातून आदिवासी जीवनसंस्कृतीचे स्वरूपच साकारते.

लोकनाटकातील अनुभव कल्पनापातळीवरील व वास्तवाच्या पातळीवरील असा दोन पातळ्यांवरचा असतो. या नाटकात जसे घडले तसे सांगितले आहे व प्रभावीपणे अभिव्यक्त केलेले आहे. त्यामुळे या नाटकाला वास्तवाचा एक पदर आहे. दुसरा पदर आदिवासी नाटकाचा आहे. आदिवासी जीवनपरंपरा याचा शोध घेणारा आहे. कल्पित वास्तवाचा आहे. त्यामुळे त्यातून आदिवासी जीवनसंस्कृतीचे दर्शन घडविणारे आदिवासी नाटक आणि लोकनाट्य मिळून अशी नाट्यसंहितेची वीण आकारास आलेली आहे. नेहमीच्या नाट्यरचनेपेक्षा (फॉर्म) वेगळी रचना झालेली आहे.

**घटना-प्रसंग :-**

'रानभूल' मधील पहिली घटना रानातल्या बांधावर घडते. कोळशाचा ट्रक भरल्यावर शेठजी मजूरांना 'खर्ची' वाटतो. तेव्हा 'बायो' अधिक पैशाची मागणी करते. पण शेठ पुढच्या

महिन्यात पैसे घेऊन जा, आपण पळून जाणार नाही असे सांगतो. तेव्हा बायो 'हिसाबाला हिसाब बेस रेहतो दादू' असे शेठला सांगते. त्यावेळी शेठ चरफडत जातो. या घटना-प्रसंगातून बायोची हिशेबी वृत्ती आणि तिचा स्पष्टवक्तेपणा साकार झालेला आहे.

दुसरी घटना आदिवासी पालावर घडते. रात्रीच्या वेळी 'बायो' कंदिलाच्या उजेडात गाते व कथा सांगते आणि इतर आदिवासी तिला 'कोरस' देतात. गायनामधून धरतरी देव, कनसारी देव, वाघुबा देव, नारनादेव यांना गाऱ्हाणे घातले आहे. त्यांचा धावा केला जातो.

**उदा.** **कथेकरी**- धेना गायल्या रे ऽ आप धरतरी देवा ऽ
**कोरस** - धेना गायल्या रे ऽ आप धरतरी देवा ऽ
**कथेकरी**- धेना गायल्या रे ऽ आप नारना देवा ऽ
**कोरस** - धेना गायल्या रे ऽ आप नारना देवा ऽ

देवदेवतांच्या प्रार्थनेनंतर आदिमाया पार्वतीने माजलेल्या दैत्यांचा कसा नाश केला याचे कथेकरी कथन करतात. या कथनामधून अन्याय, अत्याचार करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी, शोषकाचा बिमोड करण्यासाठी आदिमाया पार्वतीसारखी शक्ती इथे अवतरावी, असा आशावाद व्यक्त केलेला आहे. तर कथनानंतरच्या खालील गायनातून काही विशेष स्पष्ट केले आहेत.

**उदा.** **कथेकरी**- आय तुझ्या गुलुल्या डोंगर गो ऽऽ
**कोरस** - गुलुल्या डोंगर ऽऽ
**कथेकरी**- आय तुझ्या दारासी आबुली गो ऽऽ
**कोरस** - दारासी आबुली ऽऽ (पृ.११)

वरील गायन-कथनकरिता आदिवासी बोलीचा वापर केलेला आहे. या गायन-कथनामुळे 'मादळ' आदिवासी नाटकाचे विशेष स्पष्ट झाले आहेत.

आदिवासी जीवनातील संकेत, रूढी, परंपरा, आदिवासी संस्कृती, कला यांचेही दर्शन गायन-कथन यांमधून घडते. आदिवासींना स्वसंरक्षण करणे, वंश टिकविणे, परंपरांची जपणूक करणे यामुळे निसर्गातील विविध शक्ती, पंचमहाभूते त्याबद्दलची भीती वाटते. या भीतीमुळे या यात्वात्मक शक्तींचे, पंचमहाभूतांचे तुष्टीकरण करतो. या तुष्टीकरणातून विविध प्रतीके आणि प्रतीकरूपानं देवता आल्या. कणसारी देवता, नारना देवता, वाघुबा देवता या निसर्गातील सुष्ट-दृष्ट प्रवृत्तींचे प्रतीक होत. या प्रतीकांची पूजा आणि स्मरण सुरू केले. या सर्वांचा आविष्कार वरील गायन-कथनामधून केला आहे. शक्ती आणि शिव यांची रूपे तसेच देवसभा, इंद्रसभा, पांडवसभा भरली असल्याचा उल्लेख हे देवसभा म्हणूनच येतात. कथनामध्ये दैत्यांनी माणसे व गुरे-ढोरे खाल्ल्याचा उल्लेख येतो. ही अतिशयोक्ती असून ती लोकनाट्याशी नाते सांगणारी आहे.

आदिवासी मादळ खेळाचे विशेष 'रानभूल'मधील आणखी एका घटना-प्रसंगामधून स्पष्ट झालेले आहे. निळू राजा व तामताय राणीची कथा बायो गायन करते, कोरस साथ देतो.

**उदा.** **बायो** - निळूरं ऽ राजाचं नीळं तं रा ऽ ज ऽऽ
**कोरस** - निळूरं ऽ राजाचं नीळं तं रा ऽ ज ऽऽ (पृ.१८)

नाटकातील आशयानुसार मादळ नाटकातील गायन-कथन नाट्याचा उपयोग नाटककाराने करून घेतला आहे. सृजनशक्ती जशी तारक आहे तशी मारक आहे, असा नाट्याशय या घटना-प्रसंगामधून प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याचे नाट्यात्म कार्य वरील घटना-प्रसंगामुळे साधले आहे.

या नाटकातील कोळसाभट्टीवर काम करणाऱ्या आदिवासी कातकऱ्यांचे आर्थिक शोषण थांबविण्यासाठी कोळसा कामगार संघटनेचे कार्यकर्ते ॲड.सुरेखा मळवी व प्रकाश लवेकर प्रयत्न करतात. पण एक बायो सोडली तर कुणीही आदिवासी शेठच्या विरोधात बोलायला तयार होत नाही. बायो इतरांना 'घाबरत रहेलू तर केले कामाचा एक पयसा मिलायचा नीही. ' असे सांगते (पृ.१५) यातून बायोचा निर्भीडपणा साकार झालेला आहे.

फॉरेस्ट खात्याची परवानगी घेऊन आलेल्या सुरेखा व प्रकाश यांना शेठचे गुंड पकडून नेतात व प्रकाशला ठार मारतात. ह्या घटनेतून शेठचा क्रूरपणा, राक्षसी वृत्ती स्पष्ट झालेली आहे. खूनाच्या घटनेची चौकशी करण्यास आलेला फॉरेस्ट ऑफीसर सुरुवातीला प्रामाणिकपणाचा, नैतिकतेचा आव आणतो, शेठच्या अन्याय, अत्याचाराचा पाढा वाचतो. पण शेठने शासनव्यवस्थेतील भ्रष्टाचाराचा पाढा वाचल्यानंतर गप्प होतो. शेठने आपण लाच कशी देत नाही हे पटवून दिल्यावर तडफदारपणाचा, बाणेदारपणाचा आव आणणारा ऑफीसर पैसे व दारुची बाटली घेऊन जातो.

वरील घटना-प्रसंगातून भ्रष्ट शासकीय अधिकाऱ्यांमुळेच व्यापारी, दलाल मस्तवाल झालेले आहेत, कायद्याचा धाकच उरलेला नाही, पैशाने सर्व काही खरेदी करता येते अशी वृत्ती बळावली आहे असे ह्यातून स्पष्ट होते. एकामागून एक कार्यकारणभावाच्या आधारे घडणाऱ्या घटना-प्रसंगातून कथानकाची गतिमान रचना झालेली आहे. शेठ आपल्या कार्यपद्धतीत अडसर ठरू पाहणाऱ्या ॲड. सुरेखा मळवीना आदिवासी मजूरांपासून तोडण्यासाठी कांगावा करतो. कोळसा कामगार संघटना – सुरेखा मळवीच कोळसाभट्टी बंद करण्यास सांगते असे आदिवासींना सांगतो. त्यामुळे आदिवासी मजूर चिडतात व ॲड. सुरेखा यांना परत जाण्यास सांगतात. बायोलाही तिच्या आठ हजार रुपयांपैकी पाच हजार देतो व तीची नाराजी दूर करतो. ह्या घटना-प्रसंगातून शेठची कार्यपद्धती, हुशारी व्यक्त झालेली आहे.

'बकुळा' घरी एकटी असताना, दारुने बेहोष झालेल्या वामन्याच्या उपस्थितीत देवराम तिच्यावर बलात्कार करतो. या घटनेने तिचे शाळा शिकून मोठ होण्याचे स्वप्नंच विस्कटून जाते. बकुळाचे आयुष्य विस्कटून जाते. पण ही घटना माणसांमधील हिंस्त्रतेचे, राक्षसी वासनेचे दर्शन घडविते. तसेच नाटकाच्या कथानकाला चालना देण्याचे कार्य करते.

वरील बलात्काराच्या घटनेनंतर आदिवासी पालावर आदिवासींना बायो आदिवासीकथा सांगते. ही कथा एका परीने माणसातला माणूस संपल्याचे, सगळीकडे अनागोंदी वाढल्याचे सांगून, ह्यावर काहीतरी उपाय योजावा असे सूचित करते. (पृ.३०)

नाटककाराने नाट्यगत कथनाचा (मादळ नाट्यतंत्राचा) वापर करून एका परीने नाट्यगत घटना-प्रसंगांवर भाष्य केले आहे. पण त्याचबरोबर प्रेक्षक व वाचकांना आदिवासी समाजाच्या शारीरिक, मानसिक व आर्थिक शोषणाच्या संदर्भात अंतर्मुख होण्यास भाग पाडले आहे.

वामन्याने बकुळावरील बलात्काराच्या घटनेची माहिती दिल्यानंतर बायो पेटून उठते. ती कोयता घेऊन देवरामला मारायला निघते तेव्हा नवश्या तिला अडवितो. बकुळेचा बाप असून तो शांत राहतो. कारण शेठच्या स्वभावाची व संभाव्य कारवायांची त्याला जाण आहे. म्हणून 'कुणा संग झगडा करायचा ना कोन्चे हारी न्याय मागायचा' असे नवश्या म्हणतो व गप्प राहतो. पण बायो मात्र ॲड.सुरेखा मळवीच्या मदतीने देवरामने बकुळावर केलेल्या बलात्काराची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये नोंदविते. तर अन्य आदिवासी मजूर देवरामबद्दल फक्त संताप व्यक्त करतात. पोलीस स्टेशनवर बायोबरोबर येण्यास तयार होत नाहीत. या शासनयंत्रणेवर त्यांचा विश्वास नसल्याचे ते सांगतात.

सदर बलात्काराच्या घटनेने आदिवासी स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन स्पष्ट होतो, तसेच आदिवासींमधील ऐक्याचा अभाव दिसून येतो. ह्या घटनेमुळे नाट्यकथानकाला गतिमानता प्राप्त होते, तसेच आदिवासी समाज, पोलीसयंत्रणा आणि शेठजीसारखे भांडवलदार यांच्यावर प्रकाश टाकण्याचे नाट्यात्मकार्य साधले आहे.

आदिवासी मजूरांना बोलवायला पालावर आलेल्या देवरामला नवश्या बकुळावरील बलात्काराच्या संदर्भात जाब विचारतो, तेव्हा देवराम नवश्याला मारतो. धनदांडग्यांबरोबर त्यांच्या साथीदारांना, बगलबच्च्यांना अन्याय-अत्याचाराचा जाब सामान्य, कष्टकरी माणसाने विचारायचा नसतो. जाब विचारण्याचे धाडस करणाऱ्यांना अत्याचाराने त्याचे उत्तर दिले जाते, हे वरील घटनेतून स्पष्ट होते.

शासनव्यवस्था, राज्यकर्ते इतके संवेदनाशून्य, भ्रष्ट बनले आहेत की, त्यांना कशाचेच काही वाटत नाही. त्यामुळे भांडवलदार, धनदांडगे उन्मत्त झाले आहेत, मुजोरी करू लागले आहेत. सरकारची मालमत्ता लुटणारे शेठजीसारखे 'चोराच्या उलट्या बोंबा' अशा तऱ्हेने वागतात. फॉरेस्टरने कोळसाभट्ट्या बंद करण्याची भाषा करताच शेठ 'दारुबंदी'चा प्रश्न उपस्थित करतो व सरकारने कोळसाभट्ट्या बंद केल्या तर मोर्चा काढू अशी वल्गना करतो.

बलात्काराच्या घटनेची चौकशी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यासमोर 'शेठ' आपल्याला बदनाम करण्यासाठी संघटनावाल्या बाईनं डाव आखल्याचा कांगावा करतो. शेठच्या कांगावाखोर स्वभाव, पैसा आणि दारु याला फॉरेस्ट अधिकारी बळी पडतो. शेठ सत्ता, संपत्ती आणि दमनशक्तीच्या जोरावर न्यायच दडपून टाकतो.

बायो आपल्यावरील अन्याय-अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी आपल्याला न्याय मिळावा म्हणून धडपड करते. पण बायोचे हे वर्तन म्हणजे शेठच्या दृष्टीने आपले नर्तन आहे असे वाटते. बायोची धडपड शेठला कळत नाही. शेठला बायो आपल्याला नामशेष करायला निघाली असे वाटते. म्हणून शेठ बायोला आवर घालण्यासाठी 'हट' वर बोलवितो. सुरेखा मळवी विरुद्ध बायोला भडकविण्याचा प्रयत्न करतो. पण ती शेठच्या कारवाईला बळी पडत नाही. त्यावेळी शेठ बायोला 'समजी करु', 'कंप्लेट मागे घ्या' असा तडजोडीचा मार्ग सुचवितो. पण बायो कुठल्याच पर्यायाला तयार होत नाही. उलट ती बकुळावरील अत्याचाराच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करते व 'आदिवासी' स्त्रियांनाही इज्जत असते असे सूचित करते.

साम-दामाच्या गोष्टी सांगून बायो ऐकत नाही, तेव्हा शेठ तिच्यावर बळजबरी करतो. तेव्हा ती त्याच्या डोळ्यात बोटं खुपसते आणि स्वतःची सुटका करून घेते. या घटनेतून बायोचा

निर्भीडपणा स्पष्ट झालेला आहे. या घटना-प्रसंगाने पुढील घटना-प्रसंगांना चालना देण्याचे, तसेच कथानकाला चालना देण्याचे नाट्यात्म कार्य केले आहे.

आदिवासी पालांवर संध्याकाळी बायोचे कथा-कथन-गायन सुरू असते.

**उदा.** "दैत्याला वाटला –
आथा अख्खे जगावं माजाच राज"

वरील कथनातून शेठच्या पाशवी मनोवृत्तीचं दर्शन घडविले आहे. 'मनी' आणि 'मसल'च्या बळावर शासनयंत्रणेवर काबू मिळविला म्हणजे आपण 'काहीही' करायला मोकळे आहोत, आदिवासी स्त्रियां म्हणजे आपलीच मालमत्ता अशी मनोधारणा असल्याने शेठजी बायोवर बळजबरी करतो. वरील कथेमध्ये "पारबती मातेने जसे दैत्याचा दगडावर आपटून चुरा केला व त्यानंतर सर्व देव आनंदी झाले, त्याचप्रमाणे शेठ नामक दैत्याचा कुणीतरी येऊन नाश करावा." त्यामुळे आदिवासी समाज अन्याय-अत्याचारातून मुक्त होईल असा आशावाद व्यक्त झालेला आहे.

प्रत्यक्ष जीवनात अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी प्रत्यक्षात येण्याची अपेक्षा लोकमन करीत असते. बायोच्या कथन-गायन यामधून हेच लोकमन प्रकट झालेले दिसून येते. तसेच नवनिर्मिती करणारी सृजनशक्ती ही सृष्टत्वाची तारणहार असते, तशी ती दृष्टांचा संहार करणारी असते हा कल्पनाबंध 'रानभूल' मध्ये कथन-गायनामधून आलेला आहे.

प्रस्तुत कथन-गायनानंतर सर्व आदिवासी शेठची 'हट' पेटविण्याची भाषा बोलू लागतात. 'बायो' तर संघर्षात अग्रभागी आहे. पण नवश्या मात्र नशिबावर भार ठेवून माघार घेतो. इथे बायो व नवश्या या नवरा-बायकोमधील विरोधाभास स्पष्ट झालेला आहे.

शेठचा एक डोळा फोडल्याने संतापलेला शेठ यापुढे आणखी आपल्या कुटुंबावर अन्याय, अत्याचार करणार त्याला आपण एकटी प्रतिकार करू शकणार नाही आणि कोणी आदिवासी मदतीला येणार नाही याची बायोला खात्री पटलेली आहे. म्हणून ती आपल्या कुटुंबासह रात्रीच्या वेळी पळून जाण्याचा निर्णय घेते.

रात्रीच्या वेळी पळून गेलेल्या बायो, नवश्या, बकुळा ह्यांना शेठचे हस्तक/गुंड पकडून आणतात. पण त्याही अवस्थेत शेठला न घाबरता बायो आपल्याला तिथे रहायचे नाही असे परखडपणे सांगते. त्यावेळी शेठ बायोला मारतो. शेठच्या कृत्याचा, अन्यायाचा निषेध करणाऱ्या नवश्यालाही शेठ कोळशाच्या भट्टीत घालण्यास टाकतो. नवश्याचा एक पायच भट्टीत जाळला जातो. तर बायोच्या तोंडाला व पायाला जळत्या कोलिताने चटके दिले जातात. या घटना-प्रसंगातून शेठच्या अमानुष वृत्तीचे दर्शन घडते. आदिवासींच्या या छळाचा, अन्याय-अत्याचाराचा उच्चांक म्हणजे बायोच्या पायांना चटके दिल्यानंतर उभं राहू न शकणाऱ्या बायोच्या डोक्यावर कोळशाची गोणी दिली जाते. या शेवटच्या घटनेतून अन्याय, अत्याचाराविरुद्ध लढणाऱ्यांची अवस्था अशीच होणार आहे हे अधोरेखित होते. पण त्याचबरोबर आपल्या कुवतीनुसार अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार करणाऱ्या आदिवासींच्या तना-मनाचा शेठजीच्या भट्टीत कोळसा होतो. ह्या आदिवासी कष्टकऱ्यांना शेवटी त्याच व्यवस्थेला शरण जावे लागते हेही स्पष्ट होते.

अन्याय, अत्याचार, छळ यांनी भरलेल्या जीवनातून आदिवासी बाहेर पडण्याचा मार्ग शोधत आहेत. पण या परिस्थितीच्या, अडचणीच्या रानात वावरतांना त्यातून बाहेर पडण्याची पायवाट सापडत नाही. त्यांना रानभूल पडते. शासनव्यवस्था, भांडवलदारीव्यवस्था ह्यांनी सुरू ठेवलेले शोषणाचे असंख्य वणवे पेटते ठेवल्याने आदिवासी, कष्टकरी यांना अन्यायापासून मुक्ती मिळत नाही की मुक्तीचा मार्ग सापडत नाही. आदिवासींना रानभूल पडावी इतके गडद जंगलच शोषणकर्ते त्यांच्यासमोर उभे करतात. त्यामुळे त्यांचा रानभूलीचा भोग संपत नाही. आदिवासींचे हे भोग संपवायचे असतील तर प्रस्थापित सुसंस्कृत समाजाने या शोषित समाजाला अन्याय, अत्याचार व शोषणाचे भान करून दिले पाहिजे. शासकीय भ्रष्टाचार आणि धडदांडग्यांची सत्ता आणि संपत्तीतून आलेल्या मस्तवालपणाविरुद्ध आवाज उठविणे गरजेचे आहे. तरच वरील परिस्थितीत बदल घडेल असे शेवटी नाटककाराने अधोरेखित केलेले आहे.

**पात्रविचार :-**

'पात्र' हा नाटक या साहित्यप्रकाराचा अनन्यसाधारण घटक आहे. पात्रांच्या आधारानेच नाटक रङ्गभूमीवर आकारास येते. नाटकातील 'पात्र' हे नाट्यसंहितेचा अंगभूत घटक असते. त्यामुळे त्या पात्रांना विशिष्ट अर्थ प्राप्त होत असतो.

लोकनाटकातील पात्रे ही लोकसमाजातील वास्तव पात्रे नसतात. त्यातील काही पात्रे समाजासमोरचा आदर्श असतात, तर काही पात्रे विकृतीचे दर्शन घडविणारी असतात. आपल्या सत्-असत्, उक्ती-कृतींमधून सुविहित आचारांचे व दुराचारांचे दर्शन घडवित असतात.

'रानभूल' या नाटकात एकूण २० पात्रे आहेत. यात बायो, नवश्या, शेठ ही मध्यवर्ती पात्रे आहेत. तर उरलेली देवराम, शिवराम, परड्या, सावल्या, बुध्या, वामन्या, फॉरेस्टर, बकुळा आणि ॲड. सुरेखा मळवी ही दुय्यम पात्रे आहेत.

**बायो :-**

हे 'रानभूल'मधील मुख्य पात्र आहे. एका परीने 'बायो' या नाटकाची नायिका आहे. नवश्याची ती पत्नी आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील वनक्षेत्रातील कोळसाभट्टीवर इतर आदिवासींबरोबर 'बायो'ही काम करते. पण इतर आदिवासी स्त्री-पुरुषांपेक्षा 'बायो' वेगळी आहे. ती संवेदनशील मनाची आहे. ती प्रवाहाबरोबर वाहत जाण्यापेक्षा प्रवाहाविरुद्ध पोहण्याचा प्रयत्न करते. शेठजीकडून तिचे व आदिवासी बांधवांचे होणारे आर्थिक शोषण तिला मान्य नाही. म्हणून ती शेठला "जव्हांचा तंव्हा हिसाब केला का तुम्हालाहू बेस ना आम्हालाहूं बेस ! " असे बजावते आणि आदिवासींच्या आर्थिक शोषणाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या कोळसा कामगार संघटनेच्या ॲड. सुरेखा मळवीच्या बरोबरीने उभी राहाते. 'बायो' ह्या पात्राच्या उक्ति-कृतींमुळे नाट्यगत घटनांना चालना मिळते.

बायोला अन्यायाची चीड आहे. बकुळावर देवरामने बलात्कार केल्याचे समजताच ती पेटून उठते आणि ॲड.सुरेखा मळवीच्या मदतीने पोलीस स्टेशनमध्ये बलात्काराची तक्रार नोंदविते. 'बायो' हे लढाऊ वृत्तीचे पात्र आहे. एकाच वेळी ती आदिवासींच्या आर्थिक, शारीरिक शोषण करणाऱ्या शोषणकर्त्यांविरुद्ध आणि भ्रष्ट शासनयंत्रणेशी लढते. त्याचवेळी शेठकडून होणाऱ्या तिच्या शारीरिक शोषणाचा प्रयत्न स्वहिकमतीने, प्रसंगावधान राखून ती हाणून पाडते. शेठजीशी उघड संघर्षाचा पवित्रा घेतल्यानंतर आपला एकटीचा निभाव लागणार नाही हे तिच्या

लक्षात येते, तेव्हा ती 'पाल' सोडून जाण्याचा निर्णय घेते. शेठच्या गुंडांनी तिला व तिच्या कुटुंबीयांना पकडून आणल्यानंतर होणाऱ्या शारीरिक छळाला व मानसिक छळाला जिद्दीने सामोरी जाते. 'बायो' ही व्यक्तिरेखा वास्तवदर्शी, निर्भिडपणा असलेली, संवेदनशील आणि संघर्षशील, बाणेदार वृत्तीची अशी आहे.

**नवश्या :-**

'नवश्या' हा बायोचा नवरा आहे. 'नवश्या' हे पात्र आदिवासी पुरुषांचा प्रतिनिधी आहे. शेठजीकडून आदिवासींच्या होणाऱ्या आर्थिक, शारीरिक शोषणाचे तो समर्थन करीत नाही. पण त्याला परखडपणे विरोधही करीत नाही. शेठजीच्या कारवाया आणि त्यांना साथ देणारी भ्रष्ट शासनयंत्रणा यामुळे अन्यायाविरुद्ध आवाज उठवूनही पदरी काही पडणार नाही याचे नवश्याला भान आहे. तत्कालीन नाट्यगत वास्तवाची त्याला पूर्ण जाणीव आहे.

आदिवासी समाजामध्ये स्त्रीला अधिक महत्त्व आहे. त्यामानाने पुरुषांना गौण स्थान आहे. आदिवासी कुटुंबात स्त्री ही केंद्रबिंदू असते. तसेच ती कष्टाचाही केंद्रबिंदू असते. स्त्रीच्या श्रमशक्तीवर कुटुंब उभे असते. तुलनेने पुरुष कमी कष्ट करणारा, आर्थिक परिस्थितीमुळे आलेले पिचलेपण, तसेच दारुचे व्यसन यामुळे त्याला गौणत्व प्राप्त होते. त्यामुळे 'नवश्या' ह्या पुरुषपात्राचे गौणत्वच साकार झाले आहे.

नवश्या बायोसारखा शोषणाविरुद्ध पेटून उठत नाही. मग मुलीवरील बलात्कार असो की बायोशी शेठजीने केलेला अतिप्रसंग असो. "तो आपला पोट त्याचे हातानं आहां. आपू आदिवासी जल्माचे उपासी, त्यालं राग क्या कामाचा, रागच आपल्याला गिलून ना टाकल" अशी सबब पुढे करतो. प्राप्त परिस्थितीशी जुळवून घ्यावे, तडजोड करावी असेच नवश्याला वाटते. परंतु बायो जेव्हा ठामपणे काही निर्णय घेते तेव्हा मात्र तो तिला साथ देतो. तिच्या म्हणण्याला होकार देतो.

स्वयंनिर्णयाची क्षमता नसलेली, प्रवाहाबरोबर वाहत जाणारी, परिस्थिती शरण अशी ही नवश्याची व्यक्तिरेखा आहे.

**शेठजी :-**

रानभूल नाटकातील 'शेठ' हे मुख्य खलपात्र असून ते पारंपरिक खलपात्रासारखे आहे. 'शेठजी'च्या कृती-उक्तीमधून त्याचे खलत्व स्पष्ट झालेले आहे. कोळसाभट्टीचा मालक शेठ असो वा भांडवलदार असो, त्याची वृत्ती ही शोषकाची असते. पण शोषणाच्या तऱ्हा मात्र वेगवेगळ्या असतात. 'शेठ' हासुद्धा सर्व भ्रष्ट, अनैतिक मार्गांचा अवलंब करून आर्थिक, शारीरिक आणि मानसिक पातळीवर शोषण करतो. ह्यामध्ये त्याला शासनाच्या भ्रष्ट यंत्रणेची साथ लाभते. त्यामुळे तो एकापेक्षा एक खलकृत्ये करत जातो. उकिरड्यावर एखादं रोपटे नुसते भरकटल्यासारखे वाढावे तसे आपण वाढलो, माणूस म्हणून घडलो नाही की कुणी घडवलं नाही. म्हणून आपण चुकीच्या मार्गाला लागलो अशी चुकीची कबुली शेठ शिवरामकडे देतो. याचा अर्थ शेठला 'स्व'चे भान आहे. पण एकदा का माणसाला स्वैराचाराची, अधिकार गाजवण्याची चटक लागली की माणूस त्यातून बाहेर पडत नाही, तो भरकटत जातो. शेठच्याबाबतीत तसेच घडते. शेठ आदिवासींवर अधिकाधिक आर्थिक, शारीरिक अत्याचार करीत राहातो. राक्षसी कृत्ये करीत राहातो.

लोकनाटकातील कल्पना व वास्तव पातळीवरील अनुभव पात्रसंबद्ध असतो व तो पात्रांच्या कृती-उक्तींमधून व्यक्त होतो. लोकनाटकातील पात्रे ही पुराणातील असली तरी त्यांना एक वर्तमान संदर्भ लाभत असतो. हे लक्षात घेतले तर गीत-कथनातील 'दैत्य' हा शेठच आहे.

**देवराम :-**

'देवराम' हे शेठच्या खलप्रवृत्तीला मदत करणारे दुसरे खलपात्र आहे. शेठच्या प्रत्येक कट-कारस्थानामध्ये त्याचा प्रत्यक्ष सहभाग आहे. 'बकुळा'वर देवरामने केलेला बलात्कार, तसेच बलात्काराचा जाब विचारला म्हणून नवश्याला तो नाहक मारहाण करतो. या त्याच्या कृत्यातून त्याच्या ठिकाणच्या खलवृत्तीचा प्रत्यय येतो. 'देवराम' या पात्राला सहवर्ती खलपात्र म्हणूनच अस्तित्व आहे.

**बकुळा :-**

'बकुळा' हे रानभूलमधील सहपात्र आहे. हे पात्र अल्लड, निरागस स्वभावाचे आहे. भाकऱ्या बडवताना ती गीत गाते, भावाबरोबर खेळ खेळते. तिच्या ह्या वर्तनातून निरागस, निर्मळ, भाबड्या व्यक्तिमत्त्वाचाच अनुभव येतो. तिला शिक्षणाचा ध्यास लागलेला आहे. शाळा शिकून तिला मोठं व्हायचं आहे. ह्या कळीला फूल व्हायचं आहे, पण कळीचं फूल होण्याअगोदर, कळी उमलण्याआधी तिचा चोळामोळा होतो. देवराम तिच्यावर बलात्कार करतो. ह्या घटनेने तिचे जीवन उद्ध्वस्त होते.

'रानभूल'मधील सावल्या, वामन्या आणि इतर पात्रे ही नाट्यार्थाच्या दृष्टीने तितकी महत्त्वाची नाहीत असे नाही. पण फार मोठा नाट्यानुभव ही पात्रे देत नाहीत. 'शिवराम' या सहपात्रामुळे 'शेठ' या खलपात्राच्या खलत्वाकडे का प्रवास झाला आहे, हे प्रेक्षक-वाचकांना स्पष्ट होते. अन्यथा 'शेठ' या पात्राचे एकांगी भान आले असते.

**संवाद :-**

संवाद हा नाटकाचा महत्त्वाचा घटक आहे. 'संवाद' हे नाटकाचे माध्यम आहे. स्थल-काल, अभिनय, नेपथ्य, प्रकाश, रंगभूषा आणि रङ्गचिन्हांच्या आधारे निर्माण केलेल्या वातावरणात व विशिष्ट प्रसंगात पात्रे परस्परांशी संभाषण करतात. त्या संभाषणाला नाट्यसंवाद असे म्हणतात. नाटकातील संवाद, नाट्यबीज, कथानक, प्रसंग, आदी नाट्यघटकांना मूर्तरुप करण्याचे कार्य करतात.

नाट्यविषयाची जाणीव वाचक-प्रेक्षकांना करून देणे, नाट्यगत संघर्ष प्रकट करणे, पात्रस्वभाव प्रकाशात आणणे, नाट्यसंविधानकाला गती देणे ही नाट्यसंवादाची प्रमुख कार्ये होत.

नाट्यगत संवाद नाट्यसूत्राचे, नाट्यगत संघर्षाचे सूचन करतात. उदा. खालील संवाद पाहा –

**बायो** - आम्ही कोठं सांगू तू पलसी असां, पन हिसाबाला हिसाब बेस रेहतो दादू.

**आदिवासी** - हवंहव्...

**शेठ** - ये बाय, लई त्वांड वाजवते ! (देवराम येतो, शेठ चवताळतोय) कंच्या गाढवानं आनली तुला ? आपली इज्जत काढली का तोल जातो आपला (पृ.१०)

बायो व शेठमधील या संवादामुळे नाट्यसूत्र/नाट्यबीज उलगडते. तसेच पुढे घडणाऱ्या नाट्यगत संघर्षाची जाणीवही वाचक-प्रेक्षकांना होते.

धनदांडग्यांच्या, सत्ताधाऱ्यांच्या कारभाराविषयी विचारणा करणे म्हणजे गुन्हा आणि बाईने हिशेब विचारणे म्हणजे पुरुषीसत्तेचा अपमानच. बायो परखड स्पष्टवक्ती असल्याने ती कुणाचाच मुलाहिजा ठेवत नाही. शेठच्या संभाव्य कारवायांना घाबरून आदिवासी स्त्री-पुरुष ॲड.सुरेखा मळवीना साथ देत नाहीत. नवश्यालाही बायोने साथ देऊ नये असे वाटते. पण ती नवऱ्याला जुमानत नाही. ॲड.सुरेखा मळवींना साथ देते.

**नवश्या** - आख्खी लोकां गप रेहतान, ना, तू क्याला मंधे मधे टोंड करस.

**बायो** - आपली अख्खी लोखां हिजडी, म्हून मान मोडून काम करतान्, आपू काय सेठचं गुलाम नींही, अंगावं काम करताव.

**नवश्या** - आथा ती बाय अर्जी लीवंल, ती वाचून सरकारी मानूस येल, सेठ कोठावू रागं भरंल, पेजपानी मिलत आहां त्या तुलां बेस नींही वाटं ......

**बायो** - तुमचे सरक्या मुद्दाड लोखांही सेठला चढवेल. मी घाबरत नींही. घाबरत रेहलू तर केले कामाचा एक पन पयसा मिलायचा नींही. तू नीज कर ...... करुन करुन सेठ क्या करल. काम बन करल ...... अथी म्हेनत करायची ती बिसरीकं करु ......

वरील संवादामधून बायोच्या स्वभावातील स्पष्टवक्तेपणाबरोबर निर्भिडपणा व्यक्त झालेला आहे.

अन्याय, अत्याचार करणाऱ्या शक्तींना त्याचा जाब विचारला नाही तर त्या अधिकच अन्याय करणार हे भाष्य ह्या संवादातून केले आहे असे दिसून येते.

नाट्यगत संवादांमधून पात्रांच्या वृत्ती-प्रवृत्तींवर प्रकाश टाकला जातो. शेठजी धूर्त आहे. म्हणून तो 'संघटना' वाल्यांना रानात येण्यास हरप्रकारे मज्जाव करण्याचा प्रयत्न करतो. उदा.

**शेठ** - ऐकरे गधड्या त्या बायला रानात येऊ देऊ नका. ते पार्टीवाले लोक हैत यकदा का ती कीड रानात घुसली, की समद्या रानाचं समश्यान केल्याबगर सोडायचे नाही...... पन त्या बायावर नीट ध्यान ठिवा ......

शेठच्या धूर्तपणाबरोबर दुटप्पीपणा ही संवादातून व्यक्त झालेला आहे. उदा. खालील संवाद पाहा -

**शेठ** - आता मला सांगा, आपल्या महाराष्ट्रात फॉरिस्ट किती ? डोंगर बोडकं झालं, कुपं बोडकी झाली, तुमच्या सारखी इनामदार मानसं असतानां हे कसे झाले ?

**फॉरेस्टर** - हे बघा फॉरेस्ट डिपार्टमेंटचं जाऊ द्या. तुम्ही काय करता ते बघा -

**शेठ** - आं ! जावद्या कसं ? पाईंट तर त्योच हाय, अगदी टाप पासून बॉटमपासून खान्याचा धंदा चालल्याबगर का झाले हे समदं. शेठचा हा दुटप्पीपणा (कृती-उक्तीतील) अधोरेखित झालेला आहे.

शेठ शासकीय अधिकाऱ्यांना, वनाधिकाऱ्यांना लाचलुचपत देणाऱ्या आपल्या कृतीचे समर्थन करतो. आपण लाच कशी देत नाही याची सफाई देतो.

**शेठ** - घाबरु नका, तं आम्ही तुम्हालां पैसं दिलं म्हंजी लाच दिल्याली न्हाई. आमच्या ताटातलं वाईच तुमच्या ताटात टाकलं पाहिजे. साहेब, कंच्या बी हापिसात जा, मंत्रालयात जा, कलेक्टर म्होरं जा, मामलेदारा म्होरं जा, पट्टेवाला आशेने बघतो. (प.२३)

शेठने आपल्या कृतीचे समर्थन देताना शासनयंत्रणेचे वाभाडेच काढले आहेत.

आजकालचे व्यापारी, भांडवलदार, ठेकेदार कसे समाजसेवेचा बुरखा घालून वावरत असतात, हे खालील संवादातून पाहाता येईल.

**शेठ** - संघटनावाले म्हन्तेत आमी तुमाला तरास करतो. तुम्हाला फशवितो (आदिवासी अस्वस्थ) आम्ही यसा जंगलात आलो कशा करतो ? चार पैसे म्हेन्तीनं मिळतील, चार मान्स पेज-पान्याला लागतील.

शेठच्या शारीरिक आर्थिक शोषणाबरोबर शासनयंत्रणा, पोलीसयंत्रणा आदिवासींशी कसे वर्तन करतात ह्याचे दर्शन खालील संवादातून घडते.

**नवश्या** - कोन्हालं इचारायचा जाब. इचारला तर कुटतील, नींही भट्टीनं टाकतीन.

**सुरेखा** - पोलीसात तक्रारही केली नसेल तुम्ही ?

**नवश्या** - तक्रार करुन क्या होल् ? पोलीस आम्हालाच बन करुन टाकतीन. (पृ.३६)

शेठच्या व शासनयंत्रणेच्या कारभारावरचं हे भाष्य आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक व शारीरिक शोषणाचं प्रतिबिंब आहे. तसेच या संवादातून नाट्यबीज/सूत्रही उलगडते.

नाट्यगत संवादामध्ये कृतिप्रवणता असते. उदा.

**देवराम** - माझ्या पोरीला नासवली असती तर मी काय केलं असतं ? असच ना ? मी म्हनलं असतं शाब्बास रं पठ्ठ्या तुझ्यात खरा दम आहे. तू खरा मर्द गडी आहेस वा वा ! (देवराम नवश्याला लाथाबुक्क्यानी मारतो.) तुझ्या मायची उलट उत्तरे करतो.

नाट्यसंवादामध्ये कृतिप्रवणतेबरोबर अभिनयमूल्य असते. उदा.

**शेठ** - मग काय म्हनलं आमी. मानूस एकदम गुनाचा हाये. कंदी कुनाच्या भानगडीत न्हाई का लपड्यात न्हाई. (देवरामाला फटका मारतो.)

फॉरेस्टरच्या समोर फटके मारणारा शेठ देवरामला विचारतो –

**शेठ** - फार लागलं काय रे तुम्हास्नी ? ...... अरं पन तुम्ही केवढं. ती पोर क्यवढी......

या संवादामधून शेठच्या कृती-उक्तीमधील नाटकीपणाच साकार झालेला आहे.

नाट्यगत संवादांमधून संभाव्य घटनांची जाणीव वाचक-प्रेक्षकांना होते. उदा.

**शेठ** - (देवरामला) रेप क्येला न्हवं तुमी ? जावा, ही पार्टीवाली बायी भारी पडणार आन् बायोबी. पयलं त्या बायोला बघाय लागल......

बायो बलात्काराची केस मागे घ्यायला तयार होत नाही तेव्हा शेठ तिच्यावर बळजबरी करतो.

बायो आदिवासी, कष्टकरी, गरीब स्त्री असली तरी शील, चारित्र्य आदी गोष्टींची तिला चाड आहे. म्हणूनच ती नवश्याला सांगते –

**बायो** - तू माझं सतीव घेसरं. तुझे नावाचा कुकू लावेल. भुकं मरन, पन माझं कुकू दुसऱ्यालं दियाचू नाही.

बायोची ही पतीनिष्ठाच वरील संवादातून व्यक्त झालेली आहे.

**भाषा :-**

नाटकातून मानवी जीवनाचे घडणारे प्रतिरूप दर्शन 'संवाद' या नाट्यमाध्यमातून होत असते. पण नाट्यसंवादांचे माध्यम भाषा होय. दृश्य आणि श्राव्यरूपात प्रगट होणाऱ्या नाट्यकलेचे माध्यम अभिनय हे असते. पण अभिनयाला लिखित शब्दांचा आधार असतो. नाट्यसंवादांचे माध्यम भाषा असल्याने संवाद व भाषेचे कार्य अनेकदा एकसारखे असलेले दिसते.

नाटकाची भाषा एकाच वेळी पात्रमनावर, पात्रांच्या उक्ति-कृती, वृत्ती-प्रवृत्ती व पात्रांच्या भावनिक, वैचारिक, भूमिका यांवर प्रकाश टाकते. नाटकाची भाषा ही भाववाही, अलंकारिक, प्रासादिक, प्रतिमा, प्रतीक, मिथा-कथा, वाक्प्रचार, म्हणी इत्यादींनी समृद्ध असते. तसेच नाट्यगत भाषा प्रसंगी उपहास, उपरोध गर्भ असते. बहुविध पर्यायांनी समृद्ध भाषा नाटकातील पात्र, वाचक, प्रेक्षक यांच्या मनावर प्रभाव टाकते.

'रानभूल'मधील आदिवासींच्या जीवनाचे, त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक संकेतांचे, रूढी-परंपरांचे जिवंत दर्शन घडविण्यासाठी नाटककाराने आदिवासी बोलीभाषेचा वापर केलेला आहे. नवश्या, बायो, परश्या, बकुळा ही आदिवासी पात्रे असल्याने त्यांची संवादभाषा ही

आदिवासी बोलभाषा आहे. परंतु शेठ, देवराम, फॉरेस्टर, ॲड. सुरेखा मळवी ही शहरी (मध्यमवर्गीयांची) पात्रे असल्याने त्यांची भाषा ही मराठी आहे.

'रानभूल'मध्ये नाटककाराने एकाचवेळी प्रमाण मराठीभाषेचा व आदिवासी बोलीभाषेचा वापर करून दोन समाजजीवनामधील दरी दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आदिवासी पात्रांची संवादभाषा बोलीभाषा असली तरी तिच्यात परखडपणा आहे. उदा.

**बायो** - तुमचे सरक्या मुद्दाड लोखांही सेठला चढवेल. मी घाबरत नींही, घाबरत रेहलू तर केले कामाचा एक पै पन पयसा मिलायचा नींही. तू नीज कर......करुन करुन सेठ क्या करल ? काम बन करल...... अथी म्हेनत करायची ती बिसरीकं करु......

वरील संवादातून बायोच्या जिद्दी स्वभावाबरोबर नाट्यसंघर्षाचे दर्शन घडते.

पात्रांच्या स्वभावाप्रमाणे भाषा आक्रमकरूप धारण करते. उदा.

**बायो** - अस्सल वारलयाची बाय हाय् मी. माझी पोयरी फसली म्हून माझी पन इज्जत लुटाया पाहस. वाघा संघट झूज करुन ना आमचा जलम गेल्हा. (पृ.४७)

या संवादातून भाषेची आक्रमकता दिसून येते.

पात्रांच्या स्वभावाचे, वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन भाषेतून घडते. उदा. शेठची संवादभाषा पाहा -

**शेठ** - संघटनावाले म्हन्तेत आमी तुमाला तरास करतो. तुम्हाला फशवितो (आदिवासी अस्वस्थ) आम्ही यसा जंगलात आलो कशा करतो ? चार पैसे म्हेन्तीनं मिळतील, चार मान्स पेज-पान्याला लागतील.

शोषण करणारा शेठ जणू काही आपण आदिवासी कष्टकऱ्यांच्या कल्याणासाठीच कोळसाभट्टी चालवतो असे भासवतो. हा स्वभावातील दुटप्पीपणा या संवादभाषेतून मुखरीत झालेला आहे.

'रानभूल'मधील कथनामध्ये व गीतांमध्ये आलेल्या प्रतिमा-प्रतीकांमुळे भाषेला काव्यात्मकता प्राप्त झालेली दिसून येते. त्याचबरोबर आदिवासी जीवनसंस्कृतीचे दर्शनही घडते.

**उदा.** आय तुझे दारासी आंबुली गो ऽऽऽ
दारासी आंबुली ऽऽऽ
आय तुझे दारासी सोनचाफा गो ऽऽऽ
दारासी सोनचाफा ऽऽऽ
आय माझी आदिमाया पारबती गो ऽऽऽ
आदिमाया पारबती ऽऽऽ

कथन-गीतांमधील प्रतिमा, प्रतीकांमुळे भाषा भाववाही तशीच काव्यात्मरूप धारण करते. त्यामुळे नाटकात वातावरण निर्मितीबरोबर नाट्यकृतीला काव्यात्म सौंदर्य प्राप्त करून देण्याचे कार्य नाट्यभाषा करते.

**वातावरण :-**

नाटकातील भाववृत्ती जशी असेल त्याप्रमाणे वातावरण निर्मिती होत असते. नाट्यगत पात्रांच्या कृति-उक्ती वातावरणनिर्मितीस पोषक ठरतात. नाटकातील प्रसंग सुखात्म किंवा दुःखात्म असतील त्याप्रमाणे वातावरण निर्मिती होते. नाटकातील घटना, स्थल, काल, नेपथ्य, प्रकाश, संगीत, वेशभूषा हे सारे घटक नाट्यगत वातावरण निर्मितीस पोषक ठरतात.

प्रस्तुत 'रानभूल' नाटकाचे जंगल हे मुख्य स्थळ असून आदिवासी पाल आणि शेठची हट आणि कोळसाभट्टी परिसर, रानातील बांध ही इतर स्थळे आहेत. मुळात ही वरील सर्व स्थळे जंगलातील स्थळे आहेत. या स्थळांचा नाट्यकृतीत केलेला वापर वातावरणनिर्मितीस पोषक ठरला आहे. उदा. कोळसाभट्टी परिसर, रानातला बांध व शेठची हट या ठिकाणीच आदिवासींचे शारीरिक, आर्थिक शोषण होते.

नाटकातील सर्व घटना रानातील विविध स्थळी घडतात. रानात माणसांचा वावर नसल्यामुळे आदिवासी-कातकऱ्यांचे आर्थिक, शारीरिक शोषण करणे सहज शक्य होते. या शोषणाविरुद्ध आवाज उठविणारे कोणी आदिवासींच्या मदतीला जंगलात धावून आले तर त्यांना जंगलातून बाहेर जाण्याचा मार्गच सापडत नाही. रानातील वाटाच बंद केल्या जातात. 'रान' या स्थलामुळे नाटकात अन्याय, अत्याचार, जुलूम-जबरदस्तीचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे नाट्याशय प्रभावीपणे साकार होतो.

आदिवासी पालांच्या ठिकाणी संध्याकाळच्या वेळी आदिवासी स्त्री बायो व इतर आदिवासी कथन, गीतगायन करतात. देवादिकांचे स्मरण, धावा आणि त्यांच्या पराक्रमाच्या वर्णनाने पौराणिक वातावरणाची निर्मिती साधली आहे.

शेठकडून भविष्यात होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला घाबरून 'पाल' सोडून जाणाऱ्या बायोच्या कुटुंबाला शेठचे गुंड पकडून आणतात. त्यावेळी शेठचा धिक्कार करणाऱ्या नवऱ्याचा एक पाय भट्टीत जाळला जातो. तर बायोच्या पायांना चटके दिले जातात आणि त्याही अवस्थेत बायोला उभी करून तिच्या पाठीवर गोणी दिली जाते. या शेवटच्या घटना-प्रसंगामुळे शोकात्म वातावरणाची निर्मिती झालेली दिसून येते.

शोषणाविरुद्धची 'बायो' ची सुरू झालेली लढाई लढताना तिला पुन्हा शोषणालाच बळी पडावे लागते. शोकाकडून पुन्हा शोकाकडे होणारा प्रवास वाचक-प्रेक्षकांना सुन्न करणारा आहे. 'रानभूल' नाटकातील रान, आदिवासी पालं, बांध, हट ही स्थळे नाट्यार्थाला पोषक अशीच वातावरणनिर्मिती करतात.

एकूणच 'रानभूल' हे आदिवासी, कातकरी समाजाच्या शोषणाने भरलेल्या जीवनाचे दर्शन घडविणारे नाटक आणि लोकनाट्य आहे. लोकनाटकात कथन, गीत, संवाद यांमधून लोकनाटकाची कथा सादर होते. तसेच त्यातून नाट्यगत आशय साकार झालेला आहे.

कोळसाभट्टीवर काम करणाऱ्या आदिवासींची पालं आणि त्यांचे पालावरचे जीवन/जगणं ह्यामधून लोकजीवनच उभे केलेले आहे. नाटकातील बायो, नवश्या, बकुळा, परश्या, हुबळ्या ही आदिवासी पात्रे आहेत. या पात्रांचे संवाद हे आदिवासी बोलीभाषते आहेत. तसेच गीते, खेळगीते ही आदिवासी बोलीतूनच सादर झालेली आहेत.

बायो हे पात्र संध्याकाळच्या वेळी पालावर कथन-गायन करत असते, त्यावेळी इतर आदिवासी कोरस म्हणून साथ देत असतात. हे कथन-गायन बोलीभाषेतच असते. संवाद, कथन-गायन हे बोलीभाषते असल्यामुळे 'रानभूल' लोकनाटक म्हणता येईल.

'रानभूल'मधील कथन-गायन मधून सृष्ट-दृष्ट शक्तींच्या प्रतीक असलेल्या देवदेवतांचे वाचक-प्रेक्षकांना दर्शन घडते. तसेच शक्तीदेवतेचा डोंगर गुलालाने माखला आहे. शक्तीदेवतेच्या दाराशी आंबोलीचे झाड, सोनचाफ्याचे झाड असल्याचे येणारे उल्लेख आदिवासी लोकजीवनाचा, संस्कृतीचा आविष्कार होतो. कथन-गीतगायन आणि कोरस (कथेकरी-कोरस)मधून घटना-प्रसंगाचे वर्णन करणे हे मादळ नाटकाचे तंत्र इथेही वापरले आहे.

आदिवासी समाजात स्त्री ही कुटुंबाचा केंद्रबिंदू असते. तिच्या श्रमशक्तीवर कुटुंब उभे असते. स्त्रीच्या तुलनेत पुरुष दुबळा असतो. त्यामुळे कुटुंबाचे कर्तेपण स्त्रीकडे जाते. या नाटकातील बायो ही अशीच कर्तबगार स्त्री आहे. तीच कुटुंबातील कर्ती म्हणून निर्णय घेते. तिचे त्यानुसार नाट्यगत वर्तन घडते.

एकूणच आदिवासी बोलीभाषेचा नाटकात केलेला वापर, आदिवासी समाजजीवन, संस्कृतीचे, कला-परंपरेचे घडविलेले दर्शन, यामुळे 'रानभूल' हे लोकनाटक आहे असे म्हणता येईल.

लोकनाटकात लोकरंजनाला प्राधान्य दिलेले असते. पण त्याचबरोबर लोकसमाजाच्या नीतीशिक्षणाला महत्त्व दिलेले असते. त्यामुळे नाटक सुखात्म असते. पण 'रानभूल' हे लोकनाटक याला अपवाद आहे. संपूर्ण नाटकात दुःख भावाचाच आविष्कार होताना दिसतो.

कोळसाभट्टीवर काम करणाऱ्या आदिवासींना शेठ कामाचे पूर्ण पैसे देत नाही. बायो धीर करून शेठला हिशेबाचे विचारते तेव्हा शेठ चिडतो व थोडे थोडे (खर्ची) पैसे देतो. आर्थिक शोषणाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या ॲड. सुरेखा मळवींना आदिवासींनी साथ द्यावी असे 'बायो' ला वाटते, पण बायोखेरीज कुणीही साथ देत नाही. 'बायो' एकाकी पडते. त्यानंतर कोळसा कामगार संघटनेच्या कार्यकर्त्याचा खून शेठचे गूंड करतात. ह्या शोकात्म घटनेनंतर देवराम बकुळावर बलात्कार करतो. 'बकुळा' ह्या निरागस मुलीवर बलात्कार होऊनही देवरामला सजा होत नाही. तर बकुळाला न्याय मिळत नाही. केवळ आदिवासी स्त्री असल्याने तिला शारीरिक शोषणाला बळी पडावे लागते. बकुळावरील अत्याचाराविरुद्ध जाब विचारणाऱ्या नवश्यालाच देवराम लाथा-बुक्क्यांनी तुडवितो. एकामागून एक घडणाऱ्या या दुःखद, करुण गंभीर घटनांमुळे नाटकात शोक निर्माण होतो.

शेठ बायोला 'समजी' करण्यासाठी 'हट' वर बोलावतो पण ती बकुळावरील बलात्कार प्रकरणी 'समजी' करण्यास तयार होत नाही. तेव्हा तिच्याशी अतिप्रसंग करतो. ही घटना 'बायो'सारख्या संवेदनशील स्त्रीला दुःख देणारी आहे. आदिवासी स्त्रियांना इज्जत असते, त्यांना

शील, चारित्र्य असते ह्याचे शोषणकर्त्यांना भान नसते. म्हणूनच ते बिनदिक्कत शारीरिक अत्याचार करतात. ही जाणीव बायोला व्यथित करते.

नाटकाच्या प्रारंभापासून शेवटपर्यंत बायो आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषणाविरुद्ध संघर्ष करीत राहाते. पण ह्या संघर्षात तिला आदिवासींची हवी तशी साथ लाभत नाही. हीच तिची शोकांतिका आहे. शेठच्या भविष्यातील शोषणाला/कारवायांना आपण एकटी तोंड देऊ शकत नाही याची जाणीव झाल्याने बायो पाल सोडून जाते. पण शेठचे गुंड तिला व कुटुंबाला पकडून आणतात व सर्व आदिवासींसमोर बायो-नवश्याच्या पायांना चटके देतात. जळत्या पायांवर बायोला उभे करून तिच्या पाठीवर गोणी दिली जाते. ही घटना तर अमानुषतेचा कळस गाठणारी, शोकात्म घटना आहे. ह्यातून आदिवासींची अगतिकता, असहाय्यता साकार झालेली आहे.

थोडक्यात, कोळसाभट्टीवरील आदिवासी स्त्री-पुरुषकामगार शेठच्या आर्थिक शोषणाला बळी पडतात. पुढे आर्थिक शोषणाबरोबर आदिवासींचे शारीरिक शोषण केले जाते. या शारीरिक शोषणाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या बायोला पुन्हा शारीरिक शोषणालाच बळी पडावे लागते. शोषणमुक्त होण्यासाठी धडपड करणाऱ्या बायोला पुन्हा जळक्या पायांवर उभे राहून कोळशाची गोणी पाठीवर घ्यावी लागते, ही बायोची शोकांतिका आहे. एकूणच 'रानभूल' हे सुरुवातीपासून शेवटपर्यंत शोकभावाने भरलेले/दुःखद घटनांनी भरलेले शोकगर्भ, शोकात्म नाटक आहे.

❖❖❖❖

# प्रश्नपत्रिकेचे स्वरुप
# एम्, ए, भाग-२, मराठी अभ्यासपत्रिका क्र.८
# लोकसाहित्य

(Revised Course)

**वेळ ३ तास** **मार्क १००**

**सूचना :** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. (अ) विल्यम बास्कन यांच्या लोकसाहित्याच्या व्याख्येच्या आधारे लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'लोक' आणि 'लोकसंस्कृती' या संकल्पना स्पष्ट करून त्याआधारे लोकसाहित्याचा विचार कसा करता येईल ते सांगा.

२. (अ) 'लोकगीत' म्हणजे काय ते सांगून लोकगीते समूहमनाचा आविष्कार असतात असे तुम्हांस वाटते का?

**किंवा**

(ब) 'दंडार' आणि 'मादळ' या लोकनाट्यप्रकाराचे स्वरूप विशद करून लोकजीवनातील त्याचे महत्त्व सांगा.

३. (अ) 'मराठी लोककथा' मध्ये व्यक्त झालेल्या अनुभवविश्र्वाच्या आधारे समाजसंस्कृतीच्या विविध अंगांचे दर्शन कसे घडते ते लिहा.

**किंवा**

(ब) 'लोककथा' प्रकाराचे स्वरूपविशेष स्पष्ट करून त्याआधारे 'मराठी लोककथा' चे परीक्षण करा.

४. (अ) "रानभूल हे आदिवासी वेदनेबरोबरच त्यांच्या परंपरांचा शोध घेणारे नाटक आहे." कसे ते सांगा.

**किंवा**

(ब) 'लोकरंगभूमी' ही संकल्पना स्पष्ट करून त्याआधारे 'रानभूल' या नाटकाच्या संहितेचे परीक्षण करा.

५. (अ) 'लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते' मधून सागरसंस्कृतीचे दर्शन कसे घडते ते सोदाहरण सांगा.

**किंवा**

(ब) "प्रत्येक लोकसमूहाच्या वैशिष्ट्यपूर्ण धारणा व लोकाचार असतात." हे विधान लोकमानसातील कोळीगीते च्या आधारे स्पष्ट करा.

**(Revised Course)**

**वेळ ३ तास** **मार्क १००**

**सूचना :** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. (अ) "लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे." या विधानाच्या आधारे लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'लोकधर्म' आणि 'लोकदैवत' यांचे परस्परसंबंध स्पष्ट करा.

२. (अ) "लोकगीतांतून जीवनाच्या साऱ्या अंगांचा आविष्कार झालेला असतो." हे विधान साधार स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'गोंधळ' किंवा 'तमाशा' या लोकनाट्यप्रकाराचे स्वरूप सांगून त्याचे लोकजीवनातील महत्त्व विशद करा.

३. (अ) 'मराठी लोककथा' मध्ये लोककथेची कोणकोणती वैशिष्ट्ये प्रकट झालेली आहेत, ते उदाहरणांसहित सांगा.

**किंवा**

(ब) 'मराठी लोककथा' मधील कथाविश्र्व विविधांगी कसे आहे ते सोदाहरण स्पष्ट करा.

४. (अ) 'रानभूल' या नाटकात आदिवासींचे शोषण आणि आदिवासी परंपरा यांचे चित्रण कसे केले आहे, त्याचा साधार परामर्श घ्या.

**किंवा**

(ब) राष्ट्रीय संपत्तीची राजरोस लूट आणि परिणामी आदिवासींच्या वाट्याला आलेले उभे जळणे 'रानभूल' मधून कसे व्यक्त होते ते उदाहरणे देऊन लिहा.

५. (अ) कोळी समाजाचे वैशिष्ट्यपूर्ण सणवार, धारण आणि त्यांचे लोकाचार लोकमानसातील पारंपरिक कोळीगीते मधून कसे व्यक्त झाले आहेत ते सांगा.

**किंवा**

(ब) 'लोकमानसातील पारंपारिक कोळीगीते' या संग्रहातील लोकगीतांचे रचना विशेषांच्या पार्श्र्वभूमीवर परीक्षण करा.

❖❖❖❖

**M.A. (PART-II)**
**MARATHI- (PAPER-VIII)** **APRIL- 2016**
**LOK SAHITYA**

**QP Code : 21636**

(३ तास) (एकूण गुण : १००

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
(२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. (अ) लोकसाहित्याचे स्वरूप समजून घेताना लोकजीवनाशी निगडित कोणकोणत्या गोष्टींचा विचार करावा लागतो ते सविस्तर सांगा.

किंवा

(ब) लोक साहित्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जाणीवांचे स्वरूप विशेष सविस्तर स्पष्ट करा.

२. (अ) लोककथा ही संकल्पना स्पष्ट करा व लोककथेचे विशेष लिहा.

किंवा

(ब) 'दशावतार' व 'जागर' या लोकनाट्यप्रकारांचे स्वरूप स्पष्ट करा.

३. (अ) 'मराठी लोककथा' या संग्रहातील लोककथांचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

(ब) 'मराठी लोककथा' या संग्रहातील लोककथांचा समाजाच्या अंतर्लक्ष्यी व बहिर्लक्ष्यी संबंध स्पष्ट करा.

४. (अ) 'रानभूल' या नाटकातून आदीवासी लोकांच्या शोषणाच्या कथा आणि व्यथा कशाप्रकारे साकार झाल्या आहेत ते सांगा.

किंवा

(ब) 'रानभूल' हे नाटकाच्या संहितेचे स्वरूप विशेष स्पष्ट करा व या नाटकातील संघर्षाचे स्वरूप सांगा.

५. (अ) 'लोकमानसातील पारंपारिक कोळीगीते' या संग्रहातील सागरसंस्कृतीचे विशेष सोदाहरण लिहा.

किंवा

(ब) 'लोकमानसातील पारंपारिक कोळीगीते' या संग्रहातील कोळीगीतांच्या संरचनेची वैशिष्टये सोदाहरण स्पष्ट करा.

................